# मुद्राधारा

प्रथमेश डहाळे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# मुद्राध्यास

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन मेल करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# मुद्राध्यास

(दिर्घकथा)

## लेखक : प्रथमेश डहाळे

# मुद्राध्यास

## लेखक प्रथमेश डहाळे

**मेल – prathameshdahale1@gmail.com**

**पत्ता – स्वामी समर्थ अपार्टमेंट , अशोक नगर , सातपूर , नाशिक.**

Phone/ Whatsapp: 9921230876

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.


प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com
esahity@gmail. com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : १० डिसेंबर २०२१,
( मार्गशीर्ष शु. सप्तमी शके १९४३ )

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



नमस्कार , मी प्रथमेश डहाळे.

सध्या नाशिक येथे राहत असून इलेक्ट्रॉनिक या शाखेतून इंजिनिअरिंग पूर्ण करत आहे.

तशी मला लहानपणापासूनच वाचनाची आवड होती. पण लिखाणाची सुरुवात गेल्या एक-दीड वर्षांआधीपासून झाली. लॉकडाऊनच्या काळात वाचनासाठी वेळ मिळाला. नवनवीन कथा , लेख वचतानाच मग आपणही काहीतरी लिहण्याची इच्छा निर्माण झाली. मग स्वतःचे विचार कागदावर किंवा मोबाईलमध्ये उतरवायला सुरुवात केली. हळूहळू नवीन काहीतरी सुचायला लागले. लिखाण चांगले व्हायला लागले तसा स्वतःवरचा विश्वास वाढू लागला.

मला रहस्यकथा वाचण्याची आणि लिहण्याची आवड आहे. त्यामुळे सतत काहीतरी वेगळं , आणि गूढ असणार लिखाण करायला मला आवडतं.

त्याचबरोबर आजोबा आणि नातू यांच्या नात्याबद्दल लिहायची इच्छा माझ्या मनात होती. आणि मग यातूनच या कथेने माझ्या मनात जन्म घेतला.

या सगळ्या प्रवासात मला ई-साहित्य या वेबसाईटबद्दल माहित झाले. मग आपली कथा ई-साहित्य वर प्रकाशित करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावी अशी इच्छा मनात आली.

माननीय सुनील सामंत आणि ई-साहित्य टीमने मला पुस्तक प्रकाशित करण्याची संधी दिली याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच ही माझी ई-साहित्य वरील पहिली कथा सगळयांना आवडेल अशी आशा करतो. कथा कशी वाटली याबद्दल नक्की अभिप्राय द्यावा अशी मी वाचकांना विंनती करेल.

धन्यवाद.

प्रथमेश डहाळे.

मुद्राध्यास

लेखक – प्रथमेश डहाळे

Mail ID – prathameshdahale1@gmail. com
What's App No. – 7620261068

# प्रस्तावना

नमस्कार मी प्रथमेश डहाळे. मुद्राध्यास ही माझी ई-साहित्य वरील पहिलीच कथा. आजोबा आणि नातू. या दोघांचं नातं असतं प्रेमाचं आणि मायेचं.

तर ही कथा आहे अशाच आजोबा- नातू यांच्या प्रेमाची.

आपल्या कितीतरी वर्षांआधी घर सोडून गेलेल्या आजोबांना शोधणाऱ्या तरुणाचा प्रवास या कथेत आहे. आपल्या आजोबांना पुन्हा एकदा पाहण्याचा, भेटण्याचा तो जणू ध्यास घेतो. आजोबा कुठे असतील या रहस्याचा उलगडा करण्यासाठी तो काय प्रयत्न करतो , त्याला मिळणाऱ्या मित्रांच्या साथीने मध्ये येणारी आव्हाने पार करून तो आजोबांना शोधेल का हे सगळं तुम्हाला मुद्राध्यास या कथेत बघायला मिळेल.. ही कथा आपल्याला आवडेल अशी अपेक्षा करतो.

# मुद्राध्यास – भाग १

## आठवण

---------------------------------------

“मला? का?”हातातले पुस्तक बाजूला ठेवत प्रशांतने समोर उभ्या असलेल्या विराटला विचारलं.

“ते मला माहित नाही, पण तुझ्या मम्मीने लगेच बोलावले आहे. विराट प्रशांतकडे बघत म्हणाला.

प्रशांतने नाराजीने हातातले पुस्तक बॅग मध्ये ठेवले आणि बॅग पाठीवर लटकवून विराटच्या रुमबाहेर पडला.

“नाही. अभ्यास अजिबात करत नाही. त्याला फक्त बाहेर फिरायला आवडते. प्रशांतची मम्मी समोर सोफ्यावर बसलेल्या विराटच्या मम्मीकडे नाराजीने बघत म्हणाली.

“हो ना, आमचा विराट बघा. नेहमी टॉपला असतो! अभ्यासात आता बारावीलाही टॉपलाच येईल!” विराटची मम्मी आपल्या मुलाचे कौतुक करत म्हणाली. मात्र प्रशांतच्या मम्मीला ते काही आवडलेले दिसले नाही.

आतल्या रूममधून येणाऱ्या प्रशांतच्या कानावर दोघांचे बोलणे पडले. मात्र आपण काही ऐकले नाही अशा अविर्भावात तो शांतपणे सोफ्यावर त्याच्या मम्मीशेजारी येऊन बसला.

“काय? झाला अभ्यास?”प्रशांतच्या मम्मीने त्याच्याकडे बघत रागाने विचारले.

“नाही!” प्रशांत शक्य तितक्या शांततेत दुसरीकडे बघत म्हणाला.

“तुझ्याकडून काही अपेक्षा ठेवणेच चुकीचे आहे! उद्या पेपर आहे त्याच काय?”प्रशांतची मम्मी वैतागत म्हणाली.

“हे चुकीचं आहे बेटा. विराटला बघ, अभ्यास न करता पास होतोय. विराटच्या मम्मीने पुन्हा आपल्या मुलाचे कौतुक केले. प्रशांतच्या मम्मीच्या चेहऱ्यावर नाराजी अजूनच वाढली.

“चला येतो आम्ही. प्रशांतची मम्मी सोफ्यावरून उठत म्हणाली.

“हो हो, या परत घराचे काम पूर्ण झाल्यावर बघायला!” विराटची मम्मी हसत म्हणाली. प्रशांत आणि त्याची मम्मी काहीही प्रतिक्रिया न देता घराबाहेर पडले.

रस्त्याने चालताना प्रशांत नेहमीप्रमाणे त्याच्या विचारात गुंतलेला होता. त्याची मम्मी अजूनही त्याला अभ्यासावरून बोलणे देत होती.

“बारावीचं वर्ष आहे. काही वाटायला पाहिजे! "

“मला नाही इंटरेस्ट शिकण्यात!” प्रशांत रस्त्यावरील दगडाला लाथ मारत बोलला.

“मग? आयुष्यभर बापाच्या पैशांवर भटकत बसणार?”

आता मात्र प्रशांत मनातून संतापला.

सारख काय ते अभ्यास? मला नाही आवडत अभ्यास करायला. प्रशांतच्या मनात चलबिचल सुरूच होती.

प्रशांत एक शांत आणि अंतर्मुख असा अठरा वर्षांचा तरुण मुलगा. त्याला भटकंतीची प्रचंड आवड. नवनवीन ठिकाणी जाणे त्याच्या प्रचंड आवडीचे होते. अभ्यासात त्याला तसूभरही रस नव्हता. ना त्याला त्याच्या वडिलांच्या कापड व्ययसायात काही घेणेदेणे होते. मात्र एकुलता एक असल्याने त्याचे आईवडील त्याला अभ्यासावरून सतत बोलत असत. त्याला जेव्हा वेळ

मिळेल तेव्हा निसर्गाची सफर करायला त्याला आवडायचे, या गोष्टीला त्याचे आईवडील कधीकधी विरोधही दर्शवायचे.

त्याला मित्रही मोजकेच. पण सर्वांपेक्षा त्याचे विराटशी चांगले जमायचे. दोघेही प्रत्येक गोष्टीत सोबतच असायचे. विराट कधीकधी प्रशांतसोबत बाहेर फिरण्यास जायचा, मात्र विराटचे प्रशांतच्या उलटे होते. विराटला फिरण्यापेक्षा अभ्यासात रस होता. असं असूनही दोघांची मैत्री अजूनच घट्ट होत चालली होती.

प्रशांत घरी येऊन जेवण आटोपून आपल्या रूममध्ये गेला आणि नेहमीप्रमाणे लॅपटॉपवर वेगवेगळया ठिकाणचे वॉलपेपर आणि लोकेशन सर्च करू लागला.

वॉलपेपर किंवा निसर्गाची सुंदरता टिपलेले फोटो जमवून ठेवण्याचा त्याचा लहानपणापासूनचा छंद. त्याच्या लॅपटॉप मधील सगळी मेमरी तर फक्त या सगळ्यांनीच भरलेली होती. त्याचा मूड खराब असल्यावर निसर्गाची किमया दाखवणारी छायाचित्रे बघून न कळत त्याच्या मनाला शांतता लाभत असे. आजही त्याचा मूड खराब असल्याने तो वॉलपेपर बघत बसला होता.

जवळपास तीन तासांपर्यंत प्रशांत लॅपटॉपवर छायाचित्रे बघण्यात मग्न होता. त्याला वेळेचे काही भानच राहिलेले नव्हते. त्याच्या लॅपटॉपमधील जवळपास सर्वच छायाचित्रे त्याने पाहिली होती. शेवटचा फोटो पाहून झाल्यावर निसर्गाचे रूप न्याहाळण्यात हरवलेला तो भानावर आला. त्याने लॅपटॉप च्या स्क्रीनवर वेळ पाहिली. संध्याकाळचे पाच वाजून गेले होते. त्याने आपले दोन्ही हात वर करून आळस देत अंग मोकळे केले. लॅपटॉप ठेवण्याचा विचारात असतानाच त्याचे लक्ष एका फोटोकडे गेले. तो त्याच्या आजोबांचा फोटो होता. जवळपास 10 वर्षांपुर्वीचा. आजोबांच्या कडेवर सात-आठ वर्षांचा तो. आजोबांच्या चेहऱ्यावरचे हास्य पाहून प्रशांतच्या चेहऱ्यावर नकळत हास्य पसरले.

त्याचे आजोबा जवळपास 8 वर्षांपूर्वी कौटुंबिक वादामुळे घर सोडून गेलेले होते. ते कुठे गेले, याचा कोणालाही पता नव्हता. प्रशांतच्या आईवडिलांनी त्यांना शोधण्याचा कधी प्रयत्नही केला नाही. प्रशांतला मात्र अधूनमधून त्यांची आठवण येत असे. आज मात्र त्याला आजोबांची नेहमीपेक्षा जास्त आठवण येऊ लागली. लहानपणीचे आजोबांबरोबरचे अनेक प्रसंग त्याच्याडोळ्यासमोर तरळू लागले. दरवाजावर झालेल्या टकटकने तो आठवणीतून बाहेर आला.

“प्रशांत.. चहा घ्यायला ये. त्याच्या मम्मीने त्याला चहाचे आमंत्रण दिले. प्रशांत नाराजीने उठला. त्याला परत मम्मी आणि पप्पाचे बोलणे ऐकावे लागणार याची जाणीव होती. लॅपटॉप चार्जिंगला लावून तो रुमबाहेर आला. हॉलमधून त्याच्या मम्मी आणि पप्पांचा बोलण्याचा आवाज येत होता. बहुतेक ते प्रशांतबद्दलच बोलत होते.

प्रशांत शांतपणे हॉलमधील सोफ्यावर येऊन बसला. समोर बसलेल्या त्याच्या आईवडिलांवर त्याने हलकेच नजर टाकली. दोघेही शांत होते.

“प्रशांत.. वडिलांच्या आवाजाने प्रशांतने त्यांच्याकडे पाहिले.

“तुला जर शिकायचे नाही आहे... तर तू करणार तरी काय आहेस आयुष्यात!” प्रशांतच्या वडिल मोठ्याने मात्र काळजीने बोलत होते.

“फक्त फिरणे म्हणजे आयुष्य नसते बाळा. माणसात जाणे, मित्र बनवणे आणि पोटापाण्यासाठी कमावणे, यासारख्या अजून अनेक गोष्टी असतात आयुष्यात.. प्रशांतचे वडील काळकुतीने त्याला समजावण्याचा प्रयत्न करत होते. प्रशांत वर मात्र त्याचा काही फरक पडताना दिसत नव्हता.

“पप्पा, मला नाही आवडत अभ्यास! मला शांतता आणि एकटेपणा यातच सुख वाटते. प्रशांत आपल्या मनातलं बोलला.

“हो का! मग याचा अर्थ असा तर नाही होत की, तू बाकी काहीच नाही करायचं.. तुला एकट्याला राहायला आवडत हे आम्हालाही मान्य आहे. पण भविष्याचा विचार केलाय कधी? नाही ना?”प्रशांतची मम्मी काळजीत बोलत होती. चहा पिऊन होईपर्यंत कोणी काहीच बोलले नाही. प्रशांत आपल्या विचारात गढला होता. त्याच्याकडे बघून त्याच्या मम्मीने त्याच्या पप्पांकडे बघत” याचे काही खर नाही” अशा अर्थाने मान हलवली.

“आजोबा कुठे गेले असतील?”प्रशांतने त्याच्या आईवडिलांना अनपेक्षित प्रश्न विचारला. मम्मी आणि पप्पांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव पसरले.

“आजोबा..! तुला अचानक आजोबा का आठवले?”त्याच्या पप्पांना काही कळत नव्हते.

“आज त्यांचा जुना फोटो पाहिला, म्हणून”प्रशांतचा आवाज जड झाला होता. हे त्याच्या मम्मीच्या लक्षात आले. पुन्हा शांतता पसरली.

“ते घर का सोडून गेले? परत का आले नाही? आता कुठे असतील? सांगा पप्पा.. प्रशांतने डोळ्यातील पाणी हाताने पुसले.

“ते कुठे गेले हे मला माहित नाही. का गेले ते मी सांगणार नाही! तू त्यांचा विचार सोडून दिला तर बरं होईल. प्रशांतचे पप्पा उठून निघून गेले.

“मम्मी, सांग ना!” प्रशांतने आशेने त्याच्या मम्मीकडे पाहिले.

“तू त्यांचा विचार मनात आणू नको! पेपरचा अभ्यास कर!” त्याची मम्मी त्याच्या आशेवर पाणी टाकून निघून गेली. प्रशांतला मनातून चिड आली. वाईटही वाटले. डोळे पुसत तो पुन्हा त्याच्या रूममध्ये निघून गेला. आतून रुमचे दार लॉक करून घेतले.

प्रशांतला दचकून जाग आली. आपण कुठं आहोत हे कळायला त्याला बराच वेळ गेला. आपल्या टेबलवर जुना फोटो अल्बम बघत असतानाच त्याला झोप लागली होती. ती आजोबांच्या आठवणीतच.

डोळे किलकिले करत त्याने मान वळवून पाठीमागच्या भिंतीवर लटकवलेल्या घड्याळावर नजर टाकली. आठ वाजायला पाच मिनिटे बाकी होती. आपला झोपाळलेला चेहऱ्यावरून हात

फिरवत त्याने समोरच्या अल्बमकडे पाहिले. त्याला आवडलेला आजोबांचा एक जुना फोटो त्याने हळूच अल्बम मधून बाहेर काढला. हाताचे दोन्ही कोपरे टेबलवर ठेऊन दोन्ही हाताने पकडून त्याला निरखून बघत होता. त्यांच्या अंगातील राखाडी कलरचे जॅकेट, जे त्यांच्या प्रचंड आवडीचे होते. हलकी वाढलेली पांढरी दाढी, प्रेमळ भाव असलेले डोळे जणू जिवंत असल्यासारखे भासत होते. चेहऱ्यावरील निर्मळ हास्य त्या फोटोची शान अजून वाढवण्यास पुरेसे होते. कितीतरी वेळ तो फोटो बघत असतानाच त्याला अचानक काहीतरी त्या फोटोमध्ये दिसले. काहितरी मोठी गोष्ट होती लागावे, तसे भाव त्याच्या चेहऱ्यावर होते. घाईने खुर्चीतून उठत त्याने तो फोटो आपल्या बॅगमध्ये ठेवून दिला. अल्बम जागेवर ठेऊन तो कपाटातील कप्पे चाळू लागला. एखाद्याने खजिना शोधावं तसा तो त्या ड्रॉवर मध्ये चाचपत होता. त्या ड्रॉवर मध्ये त्याने साचवलेल्या जुन्या नाण्यांचा ढीग होता. जे नाणे वेगळ्या प्रकारचे होते, ते प्रत्येक नाणे तो पुढून मागून अगदी निरखून बघत होता. शेवटी त्याला जे पाहिजे ते मिळालेच. एक जुणे गंज लागलेले नाणे हातात घेताच त्याच्या मुद्रेवर एक मोठं हास्य पसरलं, जसे की एखादी सोन्याची  मुद्रा त्याच्या हाती आली असावी!

पेपरचा शेवटचा दिवस. प्रशांत आणि विराट कॉलेजवरून परतत होते. दोघेही आपापल्या विचारात गुंग होते.

“तू काय करणार आहेस पुढं?”विराटच्या प्रश्नावर प्रशांतने त्याच्याकडे पाहिले. त्याने विराटचे बोलणे ऐकले नव्हते.

“हं? काय?”

“म्हणलं, तू काय करणार आहेस बारावीनंतर? "

यावर प्रशांत निरुत्तर. विराटच्या प्रश्नाचे उत्तर त्यालाच माहीत नव्हते.

“मी तर विचार करतोय, मस्त इंजिनिअरिंगला ॲडमिशन घ्यावं. म्हणजे पप्पांसारखी आयटी कंपनीत नोकरी लागेल. मग लाईफ सेट!” विराट बोलत होता, मात्र त्यातील एकही शब्द प्रशांतच्या कानी पडत नव्हता.

“मला वाटतं तू...”

“तू येशील माझ्यासोबत? प्रशांत मधेच बोलला.

“कुठे?”विराट गोंधळला. दोघे चालत विराटच्या घरापर्यंत पोहोचले होते.

“ते माहीत नाही!” प्रशांतच्या वाक्यावर विराटच्या गोंधळात अजून भर पडली. प्रशांत एकदम स्पष्ट बोलणार नाही, हे विराटला माहीत होते. तो कंटाळून घरात निघून जाणार तोच प्रशांतच्या बोलण्याने त्याचे घराकडे वळलेले पाय थांबले.

“आजोबांना शोधायला!”

“आजोबा?”

“माझे आजोबा!”

“पण तुझे आजोबा तर...

विराट त्याच्या जवळ येऊन उभा राहिला.

“काय बोलतोय तू? डोकं तर ठिकाणावर आहे ना तुझं?” विराटने त्याच्या डोक्यावर हळूच टपली मारली.

“तू येणार की नाही ते सांग!” प्रशांत चिडून बोलला. विराटने वैतागत त्याच्याकडे पाहिले.

“एक काम कर, आपण संध्याकाळी त्या मंदिरात भेटू, मग बोलू” विराट विषय टाळण्याचा प्रयत्न करत म्हणाला. प्रशांत अजून काही बोलणार होता, पण त्याच्या मनातील शब्द ओठांवर उमटले नाहीत. त्याने काहीश्या रागाने घराकडे जाणाऱ्या विराटकडे पाहिले आणि आपल्या घराचा रस्ता धरला.

“पेपर कसा गेला?” प्रशांतच्या मम्मीने ताटातील पावभाजी संपवणाऱ्या प्रशांतला विचारले. प्रशांतने काही उत्तर दिले नाही. त्याच्या शांततेत मम्मीला उत्तर मिळाले.

टीव्हीवर कोण्या एका डोंगरातील जागेचे फुटेज दाखवण्यात येत होते. प्रशांत ते पाहत लक्ष देऊन ऐकू लागला.

“असं सांगितलं जातं , की या ठिकाणी फार मोठा खजिना तसेच जुन्या काळातल्या सोन्याच्या मुद्रा आहेत. काही लोकं असं सुध्दा सांगतात, की या ठिकाणी कोणी वयस्कर माणूस राहतो, जो गेल्या कित्येक वर्षांपासून खजिना शोधतोय”

त्या माहिती देणाऱ्या अँकरचा एक एक शब्द प्रशांत लक्षपूर्वक ऐकत होता.

“काय मग? कसा गेला पेपर?”प्रशांतचे पप्पा खुर्ची सरकवत त्यावर बसले. प्रशांतचे टीव्हीवरील लक्ष विचलित झाले.

“जाऊद्या, त्याला विचारण्यात काही अर्थ नाही”प्रशांतची मम्मी पप्पांना जेवण वाढत बोलली.

प्रशांत जेवण संपवत टेबलवरून उठला. हात धुवून तो थेट स्टोर रूमच्या दिशेने पळाला.

स्टोर रूमचे दार उघडून तो आत शिरला. धुळीमुळे मोठ्याने शिंकत त्याने लाईट्स चालू केल्या. संपूर्ण रूमवर नजर टाकताना त्याला जुन्या तुटल्या फुटलेल्या वस्तू सोडून काहीच दिसले नाही. काहीवेळ तसाच उभा राहत तो काहीतरी विचारात पडला.

रूमच्या उजव्या बाजूला पडलेल्या एका मोडक्या टेबलकडे तो वळला.

सगळया बाजूने तो टेबल मोडकळीस आलेला होता. एकदा कशाने तरी प्रहार केला असता, तर त्याचे तुकडे झाल्याशिवाय राहिले नसते. टेबलाच्या वरच्या भागावर मधूनच मोठा तडा गेला होता. टेबलवर उजव्या बाजूच्या एका कोपऱ्यात त्याला पेनाने काहीतरी लिहिलेले दिसले.

' सुदर्शन जोशी 'आणि त्याखाली एक सही, जिच्याखाली तारीखही होती. ' ८-६-२००७ '

नाव वाचून प्रशांतच्या डोळयासमोर आजोबांची प्रसन्न मुद्रा उमटली. टेबलवरून हात फिरवत त्याने धूळ साफ केली. तो त्याच्या आजोबांचा टेबल होता. ह्याच टेबलवर बसून त्यांनी कितीतरी पुस्तके लिहिली होती. कोणत्याही वस्तूंवर तारीख आणि नाव लिहिण्याचा त्यांचा छंद. त्यांच्या जवळजवळ प्रत्येक वस्तूंवर

तारीख हमखास असायचीच. ती पुस्तके असो व इतर कोणत्याही वस्तू असो. हा टेबल त्याचेच एक उदाहरण.

प्रशांतने त्या टेबलचा ड्रॉवर उघडण्याचा प्रयत्न केला, पण ते सहज उघडले गेले नाही. त्याने अजून जोर लावत ते उघडले. आत मध्ये त्याला जे हवं होतं ते, त्याच्या आजोबांच्या डायऱ्या एकावर एक ठेवलेल्या होत्या. त्याने हळूच त्या डायऱ्या बाहेर काढल्या. ते ड्रॉवर पुन्हा बंद करून त्याने बाकीचे ड्रॉवर्स चाळायला सुरुवात केली. पण त्यात जुनी नाणी आणि एक बनावट वाटणारी जुन्या काळातली मुद्रा सोडले तर अजून काही मिळाले नाही. घाईघाईने लाइट्स बंद करत प्रशांत त्या रुमबाहेर पडला. आपल्या रूममध्ये शिरायच्या आधी त्याने एकदा हॉलमध्ये पाहिले. मम्मी पप्पांचे जेवण चालू आहे, हे पाहून तो लगेच आपल्या रूममध्ये शिरला. दार लॉक करून त्याने त्या डायऱ्या आपल्या टेबलवर आपटल्या. पटकन खुर्चीत बसत त्याने सर्वात वरची डायरी हातात घेतली. डायरीवर वरच्या उजव्या कोपऱ्यात ६ लिहिलेला होता. तो डायरी नंबर होता. प्रशांतने लगेच बाकीच्या डायऱ्यावर नंबर पाहायला सुरुवात केली. एकूण आठ डायऱ्यांपैकी पहिल्या नंबरची डायरी सर्वात शेवटी होती.

त्या डायरीच्या कव्हर पेजवर त्याच्या आजोबांचे नाव आणि त्यावेळचा पुण्यातील जुना पत्ता सुरेख अक्षरात लिहिलेला होता. प्रशांतने डायरी उघडली. पहिल्याच पानावर सुरुवातीला त्याला अनेक देवांची नावे लिहिलेली दिसून आली. प्रशांतने पुन्हा पान पलटले. त्या पानावर चार दिवसांची तारीख आणि काही नोंदी होत्या.

पहिली नोंद -

' १ जानेवारी २००४

आज माझा ५४ वा वाढदिवस... चला बरं झालं आयुष्य एक वर्षाने कमी झालं.. '

पहिली नोंद वाचून प्रशांतला धक्का बसल्यासारखे झाले. त्याच्या आजोबांनी शब्दांमध्ये मांडलेले दुःख त्याला जाणवत होते. पण का? का आजोबा एवढे दुःखी होते? कसलं दुःख होतं त्यांना? आपलं वय झाल्यामुळे त्यांनी असं लिहिलंय का? प्रशांतला पुढच्या नोंदी वाचेनाश्या झाल्या. त्याच्या मनात अनेक प्रश्न उठले होते. ज्यांची उत्तरे या डायऱ्यांमधून मिळणार होती. त्याने आता एकेक पान पालटून वाचायला सुरूवात केली, पण त्यात

रोजच्या जीवनात घडलेल्या गमतीजमती, काही इतर सामान्य नोंदी सोडल्या तर विशेष असे काहीच नव्हते. ती डायरी अर्ध्यातच बंद करून प्रशांतने ८ नंबर असलेली डायरी हातात घेतली. ती उघडणार तोच तो मधेच थांबला. काहीतरी विचार करत त्याने थेट डायरीचे शेवटचे पान उघडले. शेवटची काही पाने कोरी होती. बरीचशी पाने पलटल्यावर एक पानावर सुंदर अक्षरात त्याला काहीतरी लिहिलेलं दिसलं. तो हळूहळू ते वाचू लागला.

' १२ जून २०११

आज शेवटी ठरवलच. या नरकातून मुक्त व्हायचं. आज माझ्या मुलाने कळसचं गाठला. आपल्या बायकोच्या म्हणण्यावरून तो इतक्या वर्षांपासून असलेलं नातं सुद्धा विसरला. शेवटी आज वैतागून मी निघालोय ' रहस्यमय ' जागेकडे. जिथे मी फार आधीच जायला पाहिजे होतं.

२००२२१२१

- सुदर्शन जोशी. '

पानावरचा मजकूर वाचून प्रशांत काही वेळ स्तब्ध झाला. नरक? आजोबांना नरक म्हणजे काय म्हणायचंय? प्रशांतचं डोकं थोडावेळ सुन्न झालं. आपल्या आईवडिलांच्या त्रासामुळे आपले आजोबा घर सोडून गेले, याच्या जाणिवेने त्याला प्रचंड दुःख झाले. पुन्हा एकदा त्याने पानावरुन नजर फिरवली. शेवटी लिहिलेल्या नंबर पाहून त्याला काही कळेनासे झाले. हा कसला नंबर? आणि ती रहस्यमय जागा कोणती? विचार करतचं त्याने मागची पाने पालटली. मात्र त्यावर काही विशेष नव्हते. प्रत्येक तारखेपुढे लहानग्या प्रशांत सोबतचे अनेक गमतीदार किस्से दिसत होते. आपल्या मुला किंवा सुनेसंबंधी एक शब्दही त्यांनी लिहिलेला दिसत नव्हता.

काही सापडत नाही म्हणून प्रशांतने डायरी बंद केली. आपले डोके दोन्ही हातात धरून त्याने डोळे मिटून घेतले. पुन्हा त्याच्यासमोर आजोबांची फोटोतली प्रसन्न मुद्रा झळकली.

नेमकं काय झालं असेल? ती रहस्यमय जागा कुठे असेल? तिथे काय असेल? आजोबा तिथेच का गेले असतील?

विचार करता करता त्याने सर्व डायऱ्या उचलून आपल्या बॅगमध्ये ठेवून दिल्या. खिशातील जुने नाणे त्याने आपल्या ड्रॉवर मध्ये ठेवले आणि घराबाहेर पडला.

प्रशांत गणपतीच्या मंदिराबाहेर असलेल्या नदीच्या किनाऱ्यावर बसून विराटच्या प्रतीक्षेत होता. नदीच्या संथ वाहणाऱ्या पाण्याकडे एकटक असणारी त्याची नजर त्याने आजूबाजूला वळवली. दुपारची वेळ असल्याने आजूबाजूला कोणी नव्हतेच. मंदिरात स्पीकरवर लावलेल्या भक्तीगीतांनी त्याच्या मनात एक वेगळाच आनंद मिळत होता. आणि त्यात आजूबाजूला कोणी नसल्यामुळे असणारी शांतता, त्याला अजूनच समाधान देणारी होती. हळूच त्याने आपला हात खिश्याकडे नेत त्यातून जुने नाणे बाहेर काढत समोर धरून ते न्याहाळू लागला.

१ पैशांचे ते नाणे आजच्या काळात फार दुर्मिळच. हे तेच नाणे जे त्याच्या आजोबांनी लहानपणी त्याच्या एका वाढदिवसाला दिलेले होते. जे त्याने आजपर्यंत सांभाळून ठेवले होते.

"बोल रे.. मागून विराटने येऊन त्याच्या डोक्यात टपली मारली. आणि त्याच्याशेजारी बसला. प्रशांतने नाण्यावरची नजर त्याच्याकडे वळवली.

“बोल, काय येड्यासारखा बोलत होता मघाशी?”विराट बोलला. प्रशांतने ते नाणे खिशात ठेवले. विराटकडे पाहून तो बोलू लागला.

“माझे आजोबा काही वर्षांपूर्वी घर सोडून गेले होते. ते कुठे गेले आहेत माहीत नाही”

“आणि तू त्यांना शोधायचं म्हणतोय? हॅ!” विराट उपहासाने बोलला.

“ते कुठे असतील, तेही मला माहित नाही, पण मी काहीही करून त्यांना शोधेनच!” प्रशांत आत्मविश्वास दाखवत बोलला.

“अरे पण कसं शोधाणार तू त्यांना?”विराट आता वैतागला.

“ते मला माहित आहे, कसं ते. जिकडे जावं लागेल तिकडे जाईल, पण जोपर्यंत आजोबांना शोधणार नाही, तोपर्यंत पुन्हा घरी येणार नाही!” प्रशांत पुन्हा आत्मविश्वासाने बोलला. विराटला हा अति आत्मविश्वास वाटला.

“आणि मला त्यासाठी तुझी मदत हवी आहे”प्रशांतने मोठ्या आशेने विराटकडे पाहिले.

“पण मी..” विराट विचारात पडला.

“तुला फक्त माझ्या सोबत चलायचे आहे, हे सगळं मी एकटा नाही करू शकत.”

“नेहमी तर एकटा राहायला आवडतं! मग आता जा की एकटा!” विराट त्याला डिवचत म्हणाला. यावर प्रशांत काही बोलला नाही.

“तुला वाटत का हे एक दोन दिवसांचा काम आहे? अरे कितीतरी महिने लागतील... आणि तरीही आपल्या हाती काही लागलं नाही मग?”

“कितीही दिवस लागू दे! आणि मला विश्वास आहे की आजोबा भेटतीलच!”

“पण जर तुझे आजोबा या जगात नसतील तर!” विराट सावधपणे हळूच बोलला. प्रशांतला याचा राग आला.

“तू काहीही बोलू नकोस! आजोबा आहेत, माझं मन मला सांगतंय” प्रशांत दुखावलेल्या स्वरात बोलला. त्याला पाहून विराटलाही थोडे दुःख झाले.

“पण माझी मम्मी मला जाऊ देणार नाही. जर तिने परवानगी दिली तरचं मी येईन”विराट प्रशांतच्या गळयात हात टाकत बोलला.

“उद्या मम्मीला विचारतो, मग बघू.

“कुठं चाललोय ते सांगू नको”प्रशांत त्याला सूचना दिल्यासारखा बोलला.

"मग काय सांगू?"

"खोटं!"

"पण काय?"विराट हातवारे करत बोलला.

"सांग की फिरायला चाललो"प्रशांत विचार करत बोलला.

"कुठे?"

"शिमला!"

"काय? शिमला?"विराट मोठ्याने ओरडलाचं. काहीवेळ तोही विचारात पडला.

"ते काय सांगायचं सांग, पण तू माझ्या सोबत आलाच पाहिजे!" प्रशांत नदीचे पाणी ओंजळीत घेत बोलला.

"आता यावंच लागेलं असं वाटतंय!" विराट उठून उभा राहिला. प्रशांत तोंडावर पाणी मारत स्वतःशीच हसला.

विराट राजी झाल्याने त्याला आनंद झाला होता.

"चल, दर्शन घेऊन निघुया" विराट मंदिराकडे नजर टाकत बोलला. दोघेही मंदिराच्या दिशेने चालते झाले.

“काय बोलतोय तू विराट? आताच बारावी झालीये आणि तू फिरायला जायचं म्हणतोय!” विराटच्या मम्मी त्याच्यावर ओरडली.

“मग काय झालं? थोडे दिवस जाऊदे की फिरायला” विराट मम्मीला समजावण्याचा प्रयत्न करत होता.

“काय बावळटपणा आहे!” त्याच्या मम्मीने डोक्याला हात लावला.

“त्या प्रशांत सोबत राहून भरकटू नको! तू अभ्यासाकडे आणि करिअरकडे लक्ष दे!” मम्मी हॉलमधील पसारा आवरत बोलणे देत होती.

“अगं फक्त दहा पंधरा दिवसांची तर गोष्ट आहे, असं पण सुट्टीमध्ये काय करणार मी?” विराटचे प्रयत्न चालूच होते.

“तू उगाच शहाणपणा करू नको!.. अरे जवळ असते तरी पाठवलं नसतं, तू तर थेट शिमला?”

“प्रशांतची इच्छा आहे जायची. त्याला सोबत म्हणून मी चाललो आहे, तू उगाच वाद घालू नको मम्मी, जाऊदे मला!” विराट आता चिडून बोलला.

“मी तुला जाऊ देणार नाही विराट!” मम्मी मोठ्याने ओरडली तसा विराट अजूनच चिडला. आवाज ऐकून त्याचे पप्पा बाहेर आले.

“काय झालं?” पप्पांनी विराटकडे पाहत विचारलं.

“सांगा जरा समजावून याला!” मम्मी वैतागाने बोलली.

“पप्पा, मी थोडे दिवस प्रशांत सोबत शिमलाला चाललो आहे. पण मम्मी नाही म्हणतेय” विराट नाराजीने सोफ्यावर बसला. त्याचे पप्पा त्याच्याशेजारी बसले. आता पप्पा काय बोलणार याकडे त्याचे लक्ष होते.

“अरे फिरायला जायचं आहे तर बिनधास्त जा!” पप्पांनी हसत त्याच्या मांडीवर हात मारला. पप्पांनी परवानगी देताच विराटच्या चेहऱ्यावर मोठे हास्य पसरले.

“येस!” जणू काही मोठी स्पर्धा जिंकल्यासारखा तो ओरडला.

“अरे हेच तर वय आहे, फिरायचं आणि मजा करायचं!” पप्पा विराटकडे पाहून बोलले. मम्मी तोंड वाकडं करत किचनमध्ये निघून गेली.

“जा! जितकी मजा करायची तेवढी तरुण वयातचं करून घ्या!” पप्पा असं बोलताच विराटला अजूनच उत्साह चढला. तो

आनंदाने उठत आपल्या रूममध्ये गेला. त्याने पटकन प्रशांतला फोन लावून त्याबद्दल सांगून टाकले.

प्रशांतने अजून त्याच्या मम्मी पप्पाला याबद्दल काही सांगितले नव्हते. काहीतरी खोटं सांगून जायचं म्हणलं तर त्याच्या मनाला पटत नव्हतं; पण दुसरा पर्याय नव्हता. आजोबांचे नाव काढताच त्याचे मम्मी पप्पा वाकडे तोंड करत असत. त्यात आजोबांना शोधायला चाललो असं सांगितलं तर काय होईल याचा प्रशांतला अंदाज आला होता. खूप विचार करून त्याने शेवटी खरं सांगण्याचं ठरवलं. काहीही झालं तरी आजोबांना शोधायला जायचंच असा त्याचा निर्धार होता.

सकाळच्या मनाला प्रसन्न करणाऱ्या वातावरणात प्रशांत एका गार्डनमध्ये फेऱ्या मारत होता. आजूबाजूला असलेल्या सुंदर मनमोहक फुलांवरून त्याची नजर हटण्यास तयार नव्हती. त्या फुलांचे फोटो काढण्याचा मोह त्याला आवरला नाही. खिशातून मोबाईल काढून त्याने जवळपास दहा फोटो क्लिक केले.

मोबाईल खिशात ठेवत तो समोर असणाऱ्या रिकाम्या बाकड्यावर जाऊन बसला. आपल्या डाव्या खिशातून त्याने एक

पॉकेट डायरी बाहेर काढली. त्याची दोन तीन पाने पालटून एका पानावरुन नजर फिरवली. पुन्हा पुढची दोन पाने पालटून जे लिहिलेले होते ते वाचले. लगेच डायरी बंद करत त्याने आजूबाजूला नजर फिरवली. डाव्या बाजूला गार्डनला लावलेल्या तारेच्या जाळीतून त्याला काहीतरी दिसले. लगेच उठून तो गार्डन बाहेर आला. डायरी हातातचं होती. पटापट पावले टाकत तो गार्डनच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला वळला.

तिथे एक चहाचे दुकान गर्दीने भरले होते. काही जण बाकड्यावर चहाचा आस्वाद घेत होते, तर काही उभे राहून. त्याच्याशेजारीच एक रद्दीचे दुकान होते. प्रशांतची नजर त्या दुकानावरचं होती. घाईघाईने त्या रद्दीच्या दुकानजवळ येऊन थांबला. आतमध्ये जुन्या वर्तमानपत्र, पुस्तक, मासिक यांचा खच दिसत होता. एक वयोवृद्ध व्यक्ती वरच्या कोपऱ्यात लावलेल्या देवाच्या फोटोला अगरबत्ती ओवाळत काहीतरी मंत्र पुटपुटत होते. त्यांचा धार्मिक नित्यक्रम पूर्ण होईपर्यंत प्रशांत फक्त त्यांच्याकडे बघत उभा होता.

त्या वृद्ध व्यक्तीची वाढलेली पांढरी दाढी आणि मिशी पाहून प्रशांतला त्याच्या आजोबांची आठवण झाली. म्हातारपणाची जाणीव करून देणाऱ्या चेहऱ्यावरील सुरकुत्या स्पष्ट दिसत होत्या.

अगरबत्ती देवासमोर लावत त्यांनी प्रशांतकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. तो मात्र त्यांचा चेहऱ्याकडे बघतच होता.

"बाळा, काय पाहिजे?" त्यांनी दुकानातल्या छोट्या बाकड्यावर बसत विचारले.

प्रशांत थोडा पुढं येऊन उभा राहिला. त्याने हातातली डायरी उघडली. त्यात काहीतरी शोधू लागला. ती वृद्ध व्यक्ती त्याच्याकडे गोंधळलेल्या चेहऱ्याने बघतच होती.

"तुम्ही पंडित काका?"प्रशांतने डायरीत वाचत विचारलं.

"हा!"

"काका, मला तुमच्याकडून मदत हवी आहे" प्रशांत विनंतीच्या सुरात बोलला.

"कसली मदत?"

"आपण सुदर्शन जोशी यांना ओळखत होतात ना?"

पंडित काका काहीतरी आठवू लागले. त्यांच्या चेहऱ्यावर हलकी अस्वस्थता पसरली.

"पण तू कोण? आणि त्यांच्याबद्दल का विचारतोय?"पंडित काकांनी अस्वस्थपणे विचारले.

"मी त्यांचा नातू, प्रशांत!" प्रशांतने आपली ओळख करून देताच पंडित काका अजून अस्वस्थ झाले.

“त्यांचा नातू?”

“हो”

पंडित काका हळूच उठले. उजव्या बाजूला ठेवलेली पाण्याची बाटली उघडून त्यांनी दोन घोट पिले. बाटली ठेऊन ते पुन्हा अस्वस्थपणे बाकड्यावर बसले. हळूच त्यांनी प्रशांतकडे पाहिले. प्रशांत मोठ्या आशेने त्यांच्याकडेच बघत होता. इशारा करत त्यांनी त्याला आपल्या जवळ बोलावले.

“बस..

प्रशांत त्यांच्याजवळ बसला. काकांनी त्याच्या पाठीवरून हात फिरवला.

“तू खरंच जोशींचा नातू आहेस?”

“हो”

“तुला माझ्याकडून काय मदत पाहिजे?”

“तुम्हाला तर माहीतच असेल, माझे आजोबा काही वर्षांपूर्वी कुठेतरी निघून गेले ते.. प्रशांत काहीसा दुःखाने बोलला.

“हा.. फार विचित्र आहे तुझे आजोबा!” काका प्रशांतच्या पाठीवरचा हात मागे घेत बोलले. यावर प्रशांत गोंधळला. काका नेमकं काय सांगतात याची उत्सुकताही त्याला होती.

“असं अचानकपणे न सांगता निघून जातं का कोणी?” काकांचा आवाज आता जड झाला होता.

“तुम्ही दोघे फार जुने मित्र होता? "

“खूप जुने आणि जवळचे मित्र होतो आम्ही! अगदी भावासारखे!” आजोबांच्या आठवणीने काकांचे मन भरून आले होते. त्यांना बघून प्रशांतला वाईट वाटले.

“पण तुला काय मदत हवीये?”

“मला आजोबांना शोधायचं आहे, त्यासाठी तुम्ही मला मदत केली तर त्यांना शोधणं अजून सोपं होईल” प्रशांत बोलला.

“शोधायचं? म्हणजे?”

“आजोबा कुठं गेले मला माहित नाही, घरी कोणाला विचारलं तर सांगत नाहीत.. मला त्यांची खुप आठवण येते”प्रशांत जड आवाजात बोलला.

“त्यामुळे मी आता काहीही करून त्यांना शोधणार आहे!” प्रशांत बोलला.

“हे काय बोलतोय बाळा! तुझ्या आजोबांना शोधणं काय सोपं आहे?”

“काका, तुम्हाला माहीत आहे का ते कुठे गेले?”

"माहीत असतं तर कधीच त्याच्याकडे गेलो असतो! साला अचानक गायब झाला!" काका काहीश्या रागाने आणि निराशेने बोलले. काहीवेळ दोघेही शांत होते.

"माझे मम्मी पप्पा त्यांना त्रास द्यायचे का?" प्रशांतने विचारले. यावर काका चमकले.

"न.. नाही बाळा.." काका गोंधळलेल्या आवाजात बोलले.

"काका, तुम्हाला जे माहीत आहे ते सांगा. माझ्यापासून लपवू नका प्लिज!" प्रशांत विनंती करत बोलला.

"तुला हे सगळं सांगणं बरोबर नाही.." काका टाळण्याचा प्रयत्न करत होते. पण प्रशांत त्यांना बोलतं केल्याशिवाय शांत बसणार नव्हता.

"तुम्हाला नाही वाटत का माझे आजोबा परत यावे? तुम्हाला त्यांना भेटायची इच्छा आहे ना?... तुम्ही जर आता मला सांगितले नाही, तर मी आजोबांना कसा शोधणार काका?" प्रशांत त्यांना बोलतं करण्यासाठी भावनेचा आधार घेत म्हणाला. काका पुन्हा अस्वस्थ झाले.

"तुझे आजोबा परत भेटले, तर मी आनंदाने मरणाला सामोरे जाईल. जीवनात तीच एक शेवटची इच्छा राहिली आहे!" काका डोळे पुसत बोलले. काका आणि आजोबांची मैत्री किती घट्ट

असेल, याचा अंदाज त्यांच्या बोलण्यातून येत होता. काका शांत होईपर्यंत प्रशांत काही बोलला नाही.

“तुझ्या आईवडिलांनी त्यांना खुप त्रास दिलाय! शेवटी म्हातारं माणूस कसं सहन होईल? रोज आपलं दुःख कमी करण्यासाठी यायचा माझ्याकडे.. बोलता बोलता सगळं दुःख विसरून जायचा.. आम्हा दोघा आधार नसलेल्या जीवांना आमच्या मैत्रीचाचं एक आधार होता!... रोज इथं बसून रद्दीतली पुस्तकं वाचता वाचता वेळेचं भान राहायचं नाही त्याला!.. एक दिवस जेवढी मिळतील तेवढी पुस्तकं घेऊन गेला. तो कायमचाचं!... जाताना एक पत्र इथं सोडून गेला. तीच एक आठवण!” काका डोळे भरून येताच बोलायचे थांबले. प्रशांतला आपल्या आईवडिलांचा राग येत होता. ते असं वागू शकतात यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. सोबतच आजोबा आणि पंडित काकांचे वाईटही वाटत होते.

“ते पत्र?”त्या पत्रात काहीतरी सापडेल अशी प्रशांतला धूसर आशा होती.

“जपून ठेवलंय अजून!” काका उठून दुकानाच्या एका कोपऱ्यात असलेल्या लाकडी टेबलजवळ गेले. त्याचे ड्रॉवर उघडून त्यातून त्यांनी त्या पत्राच्या कागदासोबत अजून एक कागद

आणि पेन घेतले. बाकड्यावर बसत त्यांनी ते पत्र प्रशांत समोर धरले. प्रशांतने उत्सुकतेने ते पत्र हातात घेतले.

“हे काय?”प्रशांतने काकांच्या हातातल्या कागदाकडे बघत विचारले.

“तुझ्या आजोबांनी पत्रात काहीतरी कोडं लिहून ठेवलंय, ते या सोडवण्याचा प्रयत्न करता करता इतकी वर्षे गेली, पण याचा अर्थ काही उलगडला नाही!” काकांनी तो कागद प्रशांतकडे सोपवला. पूर्ण कागदावर काही आकडे लिहून खाडाखोड दिसत होती.

“ओ काका, या चहा घ्यायलाss” बाहेरून एका माणसाने काकांना आवाज दिला.

“तू पत्र वाच बाळा, मी आलोच”काका उठून बाहेर गेले.

प्रशांतने तो कागद बाजूला ठेवत पत्र उघडून वाचायला सुरुवात केली.

' प्रिय मित्रास सप्रेम नमस्कार,

माझ्या मित्रा राघव, मला आशा आहे, की हे पत्र तुला सापडलेचं असेल. तुला प्रश्न पडलाच असेल, की मी आज असं

अचानक पत्र कसकाय.. पण विषय तसा आहे, की पत्र लिहीणेच योग्य वाटले.

तुला धक्का बसेल, पण मी हे सगळं सोडून चाललोय. घर, पैसा, तुझ्या सारखा मौल्यवान मित्र आणि लेखन क्षेत्रात कमावलेले नाव सुद्धा!

कारण सांगायची तुला काही गरज वाटत नाही. गेल्या काही दिवसांपासून सुनेकडून छळ होतोय, तो आता मला सहन होईनासा झालाय! कारण तिला वीट आहे माझ्या या पुस्तकांचा आणि लिखाणाचा! रोजरोज सुनेचे आणि मुलाचे विनाकारण बोलणे ऐकून माझे कान थकले आहेत आता!

मी कुठं चाललोय हे मी सांगू इच्छित नाही, पण तू इतका जवळचा मित्र आहे म्हणून तुला या पत्रात सांगतोय. तू इतर कोणाला सांगणार नाहीस अशी अपेक्षा आहे.

मी चाललोय रहस्यमय जागेवर. जिथे मी उरलेले आयुष्य सुखाने जगेल, यात शंका नाही.

२००२२१२१

- सुदर्शन जोशी

१३-०८-२०११ '

पत्र वाचून प्रशांतच्या डोळ्यात नकळत अश्रू जमा झाले.

डोळे पुसत त्याने पत्रात दिलेला नंबर पुन्हा वाचला. तसा तो चमकला. त्याला काहीतरी आठवले. त्याने पटकन आपली पॉकेट डायरी बाहेर काढत ती उघडून त्यात काहीतरी पाहिले.

पत्रात लिहिलेला आणि आजोबांच्या डायरीतील शेवटच्या पानावर असणारा नंबर एकच होता. म्हणजे या नंबर मध्ये नक्कीच काहीतरी रहस्य होतं. पण हा नंबर नेमके काय असू शकते? ठिकाणाचे नाव?

प्रशांतने तो आकडेमोड असलेला कागद पुन्हा हातात घेतला. काकांनी त्यावर बराच आकड्यांचा खेळ केलेला दिसत होता. प्रशांतला ते काही समजले नाही. त्याने तो कागद पुन्हा बाजूला ठेवला. तो पुन्हा पुन्हा तो नंबर वाचू लागला. नेमकं तो नंबर काय सांगतो, हे त्याला कळत नव्हते. तो डोकं हातात धरून विचारात गढला.

“बाळा!” काकांच्या आवाजाने तो विचारातून बाहेर आला.

“काय झालं?”त्याचा चिंताग्रस्त चेहरा पाहून काकांनी विचारलं.

“या नंबरचा विचार करतोय!” प्रशांतने तो आकडेमोड केलेला कागद हातात घेतला.

“हे काय आहे काका?”प्रशांतने गोंधळलेल्या स्वरात विचारलं. त्याच्या गोंधलेल्या चेहऱ्याकडे बघून पंडित काका स्वतःशीच हसले. प्रशांत शेजारी बसत त्यांनी त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. त्यांच्या हाताच्या स्पर्शात मायेची ऊब होती. प्रशांतला त्यांच्या स्पर्शाने एक वेगळीच जाणीव झाली.

“मी एकेकाळी गणिताचा प्राध्यापक होतो! त्यामुळेच ही अशी आकड्यांचा खेळ करायची सवय आहे मला.. पंडित काका हसत बोलले. त्यांना हसताना बघून प्रशांतच्या चेहऱ्यावर सुद्धा एक मोठं हास्य पसरलं.

“सुदर्शन लाही माहीत होतं हे, म्हणून मला वाटलं की हे आकडे म्हणजे त्याने सोडलेलं माझ्यासाठी एक कोडं असेल... आता वाटत की हे फक्त त्याने मला येड्यात काढण्यासाठी लिहिलं असेल.. काका गमतीने म्हणाले. त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य अजूनचं वाढलं.

“हे नक्कीच गमतीसाठी लिहिलेलं नसेल!” प्रशांत गंभीर होत बोलला. काकांना काही कळलं नाही.

“म्हणजे? "

“आजोबांनी हाच नंबर त्यांच्या पर्सनल डायरी मधेही लिहिलेला आहे. शेवटच्या पानावर!” प्रशांत बोलताच काका चमकले. त्या नंबर मध्ये काहीतरी गूढ आहे, याची त्यांना पुन्हा खात्री वाटू लागली.

“पण काय रहस्य असेल?”

“काय असेल ते मी शोधूनच राहील! त्या नंबर वरूनच मी आजोबांपर्यंत पोहोचू शकतो!” प्रशांत आत्मविश्वास दाखवत बोलला.

“काका, तुमच्याकडे अजून काही आहे, जे मला आजोबांपर्यंत पोहोचवू शकते? आजोबांच्या बोलण्यातून कधी त्या रहस्यमय जागेचा उल्लेख आला होता?”

प्रशांत अधीरतेने बोलला.

“नाही असं काही बोलला नाही सुदर्शन.. काका आठवत बोलले.

“अरे हा.. ते पुस्तक!” काकांना अचानक काहीतरी आठवले. ते पटकन उठून पुस्तकांच्या रद्दीकडे गेले. एकावर एक रचून ठेवलेली पुस्तकांमधील वरची पुस्तके बाजूला करत त्यांनी थेट खालच्या पुस्तकांमधून एक एक पुस्तक उचलून त्यावरचे नाव वाचायला सुरू केले. प्रशांत उठून त्यांच्याजवळ जाऊन उभा

राहिला. उत्सुकतेने आणि काहीश्या गांभीर्याने तो काकांकडे बघत होता.

फाटक्या पुस्तकांच्या ढिगात एक नवंकोरं पुस्तक काकांच्या हाती लागलं. जे पाहिजे ते सापडल्यावर काकांच्या चेहऱ्यावर हलकं हास्य उमटलं. त्यांनी उठून मागे उभ्या प्रशांतकडे पाहिलं.

“यात नक्की काहीतरी सापडेल!” हातातले पुस्तक त्यांनी प्रशांतसमोर धरले. प्रशांतने उत्सुकतेने ते हातात घेतले.

' आठवणीतला स्वर्गीय प्रवास... लेखक - सुदर्शन जोशी '

मुखपपृष्ठावर रेखाटलेल्या आकर्षक निसर्गचित्राच्या वर असलेले नाव वाचून प्रशांतच्या चेहऱ्यावर समाधानी हास्य पसरले.

“तुझ्या आजोबांनी हे फार पूर्वी लिहिलं होतं. कदाचित तुझ्या जन्मानंतर ते प्रवासाला गेले होते तेव्हा.. काका जे आठवत होते ते सगळं प्रशांतला सांगत होते.

“मला त्यानी त्याची सगळी पुस्तकं वाचायला दिलेली.. पण मी फक्त एक आठवण म्हणून जपून ठेवली आहेत.. काही वाचली तीही आणि जी वाचली नाहीत तीही!” काका बोलत होते. मात्र प्रशांतचं त्यांच्या बोलण्यापेक्षा पुस्तकाकडे जास्त लक्ष होतं. कधी ते पुस्तक उघडून वाचतो असं त्याला झालं होतं. याआधी त्याने आजोबांचं एकही पुस्तक पाहिलं किंवा वाचलेलं नव्हतं.

आजोबांच्या प्रेमापोटी त्याला ते पुस्तक वाचण्याची खुप इच्छा होत होती. दुसरं म्हणजे या पुस्तकातचं आजोबा कुठं आहेत याचा पुरावा मिळण्याची शक्यता होती. त्या ' रहस्यमय ' जागेबद्दल काहीतरी असेलचं याची त्याला खात्री वाटत होती.

“ही अजून काही पुस्तके.. काकांनी त्याच्या आजोबांची सगळी पुस्तके काढत त्याच्यासमोर धरली. त्याने ती हातात दोन्ही हाताने पकडत हळूच बाकड्यावर ठेवली.

“ही आता मी काहीही वाचू शकणार नाही.. त्यापेक्षा तूच घेऊन जा बाळा.. काका बोलले.

“तुम्हाला वाटतं यात त्या रहस्यमय जागेबद्दल काही असेल?” प्रशांतने प्रश्न केला.

“रहस्यकथा लिहिण्यात तुझ्या आजोबांना फार रस होता.. या प्रवास वर्णनात देखील अनेक रहस्य असतील बघ.. काका गमतीने मात्र काहीसे दुःखी होत बोलले.

“आता तुझ्या आजोबांना शोधण्याची जबाबदारी तुझी आहे बाळा.. काकांनी आशेने त्याच्याकडे पाहत त्याच्या डोक्यावरून मायेने हात फिरवला.

“पण सध्या माझ्याकडे ही पुस्तकं आणि तो नंबर सोडून काहीच नाही काका.. प्रशांत काहीसा निराश होत बोलला.

“काका मी तूमच्याकडे या आशेने आलो होतो की, तुम्हाला आजोबाबद्दल सगळं काही माहित असेल.. आजोबा आणि तुम्ही जवळचे मित्र होतात, तरी आजोबांनी तुम्हाला काही संगितले नाही..” प्रशांत निराश मनाने बोलला. यावर काका काही बोलले नाहीत.

“मी जेवढं सांगू शकतो, तेवढं सांगितलं बाळा! आता यावरूनच तुला माझ्या मित्राला शोधायचं आहे! तू त्यात नक्की यशस्वी होशील!” काकांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवत धीर देण्याचा प्रयत्न केला.

“हो, मी त्यांना शोधेनच! मी नक्कीच तुमच्या मित्राला तुमच्यजवळ घेऊन येईल”प्रशांत आत्मविश्वासाने बोलला. त्याच्या दृढ आत्मविश्वासाचे काकांना कौतुक वाटले. त्याच्यावर विश्वास वाटू लागला. आपल्या मित्राची नक्की पुन्हा भेट होईल याची त्यांना खात्री आणि विश्वास होता.

प्रशांत आपल्या आजोबांची सर्व पुस्तके नीट जमा केली. काकांनी दिलेल्या पिशवीत त्याने सर्व पुस्तके भरली. सोबत ते पत्रही घेतले. सर्व घेऊन तो जाण्यास निघाला.

“काका, येतो मी. पुढच्या वेळेस आजोबांना घेऊनच येईल!” प्रशांत त्यांच्याकडे पाहून हसत बोलला.

“माझा आशीर्वाद आहे तुझ्यासोबत!” काकांचा आशीर्वाद घेऊन तो निघाला.

“थांब बाळा!” काकांनी त्याला थांबवले. प्रशांतने मागे वळून त्यांच्याकडे पाहिले.

“पण तुला माझ्याबद्दल कसं माहीत?” काकांनी प्रश्न केला. प्रशांतला लक्षात आले, तो याबद्दल सांगायचं विसरलाच होता.

“हा.. मला तुमच्याबद्दल आजोबांच्या डायरीतून कळाले. तुमच्या दुकानाचा पत्ता त्यात होता” प्रशांतने स्पष्ट केले.

“तुमच्या मैत्रीबद्दलही खुप काही लिहिलं आहे आजोबांनी..”

पंडित काका आपल्या मित्राच्या आठवणीने पुन्हा दुःखी झाले.

“आपण जी मदत केली त्यासाठी धन्यवाद काका!... येतो.” प्रशांत त्यांचे आभार मानत जाण्यास निघाला. काकांनी कसंतरी हसत त्याच्याकडे पाहिले. प्रशांतमुळे त्यांना आपल्या मित्राला पुन्हा भेटण्याची आशा निर्माण झाली होती. प्रशांतला काकांमध्ये जणू आपल्या आजोबांचे प्रेम, आपुलकी जाणवली होती. जितका तो इतक्या दिवसात कोणाशी सहजपणे बोलला नसेल, तेवढं तो पंडित काकांशी बोलला होता. त्यांचा निरोप घेण्याची त्याची इच्छा होत नव्हती. तरी जड मनाने तो तिथून निघाला. जाताना त्याने

एकदा वळून त्यांच्याकडे पाहिले. एक समाधानी स्मित चेहऱ्यावर घेऊन तो निघाला.

"अरे बोल काहीतरी!" प्रशांतची मम्मी त्याच्यावर ओरडत होती. प्रशांत अबोलपणे खाली पडलेली पुस्तके उचलत होता.

"कोणी दिली ही पुस्तके तुला?"

प्रशांत काहीही न बोलता खाली पडलेली पुस्तके पिशवीत भरून ती घेऊन आपल्या रूममध्ये निघून गेला. जे त्याला नको होतं तेच घडलं होतं. चुकून त्याच्या हातातून पिशवी खाली पडली आणि त्याच्यातून बाहेर पडलेली पुस्तके मम्मीने पाहिली. त्यावर आजोबांचे नाव बघून मम्मीचा संताप झाला असावा. म्हणूनच ती प्रश्न विचारत प्रशांतच्या मागे पडली होती.

दार आतून लॉक करून त्याने सर्व पुस्तके बाहेर काढून टेबलवर मांडली. इतकी सारी पुस्तके आजोबांनी स्वतः लिहिली आहेत, यावर प्रशांतचा विश्वास बसत नव्हता. त्याने सर्व पुस्तके व्यवस्थितपणे टेबलवर मांडली. एकएक पुस्तकाचं निरीक्षण करत प्रशांत खुर्चीत बसला. एकूण ३० पुस्तके होती ती. सर्व पुस्तके

मुखपृष्ठवरील चित्रांमुळे आकर्षक वाटत होती. यातली बरीचशी पुस्तके मर्डर मिस्ट्री या विषयावर कादंबऱ्या होत्या. तर काही इतर वेगळया विषयांवरील रहस्यमय कथा दिसत होत्या. या सगळयातून वेगळी भासणारी तीन पुस्तके त्याने बाजूला काढली. एक पुस्तक म्हणजे काकांनी सगळ्यात पहिले दाखवलेलं प्रवास वर्णनाचे. दुसरे पुस्तक होते ते आकडेमोडी वर असणारी एक गूढकथा. ही कादंबरी जणू पंडित काकांसाठी लिहिली असावी, असे प्रशांतला वाटून गेले. तिसरे पुस्तक हे अजूनच वेगळे होते. ' खजिना स्वप्नातला.. ' अशा शिर्षकाचे ते पुस्तक एक कादंबरीच होती. त्याचे मुखपृष्ठ म्हणजे एक गुहेचा खरोखरचा फोटो असावा असे होते. इतर पुस्तकांपेक्षा हे पुस्तक फारचं वेगळे भासत होते.

प्रशांतने ती तीन पुस्तके बाजूला काढत बाकीची पुस्तके आपल्या बॅगमध्ये ठेवली.

पॉकेट डायरी आणि एक पेन घेऊन तो पुन्हा खुर्चीत बसला. प्रवास वर्णनाचे पुस्तक हातात घेत त्याने वाचायला सुरुवात केली.

अनुक्रमणिका चाळत असतानाच एके ठिकाणी तो चमकला. त्या पुस्तकात जे तो शोधत होता, ते त्याला सापडलं. घाईघाईत त्याने ते पान नंबर उघडले.

' रहस्यमय जागा - एक अद्भुत स्वर्ग!' या शीर्षकाखाली बाकीचा मजकुर होता.

अधीर होत प्रशांत वाचू लागला.

' तो दिवस मी कधी विसरणार नाही, ज्या दिवशी मी या जागेवर पहिल्यांदा गेलो. ' सिसिरोहा ' या गावात असताना मला त्या जागेबद्दल माहीत झाले. आणि मग जराही उशीर न करता त्या स्वर्गासरख्या जागेची अनुभूती घेतली. त्या जागेबद्दल मी कोणालाही सांगू इच्छित नाही. त्यामागचे कारणही सांगणे योग्य नाही. पण मी हे एवढ्यासाठीच लिहीत आहे, कारण मला तुमच्यासोबत माझा आनंद साजरा करायचा आहे. आणि मलाही वाटतं की कोणीतरी या जागेत येऊन माझ्यासारखं तृप्त व्हावं! माणूस ज्या सुख, पैसा या सगळ्याकडे धावत असतो, ते या जागेत आहे!

तो माझ्या आयुष्यातील सर्वात चांगला आणि समाधानकारक दिवस होता. तारीख होती - १२/१२/२००२. '

शेवटची तारीख वाचून प्रशांत थबकला. त्याने पटकन बाजूला पडलेलं काकांनी दिलेलं पत्र उघडलं.

त्या पत्रात दिलेला नंबर म्हणजे या तारखेतील अंक उलटे लिहिलेले होते. म्हणजेच १२/१२/२००२ चे २००२२१२१!

ही एक तारीख असू शकते याचा विचार प्रशांतने केलाच नव्हता. ना-ही पंडित काकांनी!

प्रशांतने पत्र बंद करत पुन्हा पुस्तकात पाहिलं. सिसिरोहा या गावाचा त्यात उल्लेख होता. जे गाव मुंबई पासून बरेच लांब होते. त्याबद्दल प्रशांतने ऐकलेले होते. त्या गावाच्या आजूबाजूला फक्त जंगलच होते. त्यामुळे तिकडे कोणी जात नाही, असं इतर लोकं म्हणत असतं. आता काहीही करून तिकडे जायचेच असा प्रशांतने निर्धार केला. घाईघाईत त्याने ती पुस्तके बॅग मध्ये टाकली. इतर दोन पुस्तके त्याने न उघडता तशीच ठेवली.

पॉकेट डायरी आणि पेन आणि लॅपटॉप घेऊन तो आपल्या बेडवर बसला. यावर त्याने सिसिरोहा या गावाची माहिती शोधायला चालू केली. एक एक करत त्याने सगळी माहिती आपल्या डायरीमध्ये उतरवली.

त्या गावात जाणे सोपे नाही, हे त्याच्या लक्षात आले होते, पण आता तो मागे हटणार नव्हता. आता तो प्रत्येक आव्हान पेलायला तयार होता.

“काय? तू पागल झाला आहे का?”प्रशांतची मम्मी मोठ्याने ओरडली. प्रशांत शांतपणे सोफ्यावर बसून होता.

“तुला काही कळतं का प्रशांत!” प्रशांतचे पप्पा त्याच्यासमोर उभे राहून मोठ्याने ओरडले.

“मी जाणार म्हणजे जाणार!... मला थांबवू नका!” प्रशांत काहीसा ओरडत बोलला.

“अरे प्रशांत, तुला माहीत तरी आहे का तुझे आजोबा कुठे आहेत ते? जिवंत आहेत का... मम्मीने रागाने थरथरत कापत होती.

“जिवंत आहेत! मी त्यांना शोधून काढीन!” प्रशांत अजून मोठ्याने ओरडला.

“जा निघ! कुठं सापडतील तुला तुझे आजोबा? आं?”पप्पा प्रचंड संतापले. मम्मीला तर प्रशांतला एखादी ठेऊन द्यावी असं वाटतं होतं. पण तिने स्वतःला सावरलं.

“अरे तुला काय माहिती तुझे आजोबा कसे होते? ते नसते तर, आपलं कधीच कल्याण झालं असतं!” मम्मीची आता जीभ घसरत चालली होती.

“त्या म्हताऱ्यामुळेच तुला बाहेर असं जनावरासारखं भटकायची सवय लागली! डोक्याला ताप करून ठेवलाय नुसता!” मम्मी रागाने बडबडतचं होती. आता मात्र प्रशांतला ते सहन होत नव्हते. त्याने रागाने हाताची मूठ आवळली.

“जाऊदे शर्वरी, सोड, त्याला तरफडायचयं तर तरफडू दे!” पप्पा मम्मीला शांत करण्याचा प्रयत्न करू लागले.

“जाऊदे त्याला त्या म्हताऱ्याजवळ!”

“पप्पा! तुम्ही काहीही बोलू नका! मला माहीत आहे, तुम्ही त्यांना त्रास दिला, म्हणून ते घर सोडून गेले!” प्रशांत सोफ्यावरून उठत रागाने बोलला.

“आम्ही त्रास दिला? अरे, तुझ्या आजोबांनी आम्हाला हैराण करून सोडलं होतं, त्या लिखानामुळं! तुला अभ्यासापासून लांब ठेऊन त्यांनी पार वाट लावली असती तुझी!”

“मम्मी, आता जर तू आजोबांबद्दल अजून एक शब्द बोलली तर बघ!” प्रशांतचा आता ताबा सुटला.

“काय करशील? तुला तर.. मम्मी त्याला मारायला त्याच्याकडे धावली. पप्पांनी लगेच मम्मीचा उचललेला हात पकडला.

“शांत बस! जाऊदे त्याला.. पप्पा उचललेला हात खाली घेत मम्मीला शांत करण्याचा प्रयत्न करू लागले.

प्रशांत रागाने आपल्या रूममध्ये निघून गेला.

आपण प्रशांतला मारायला हात उचलला, याचे मम्मीला फार वाईट वाटले. प्रशांत आपल्या हट्टासमोर शांत बसणार नव्हता. पण तो जे काय करतोय ते चुकीचं करतोय अशी भावना मम्मीच्या मनात उमटत होती. शेवटी प्रशांतच्या जिद्दीपुढे हात टेकण्याशिवाय मम्मी आणि पप्पा दोघांसमोर काही पर्याय नव्हता.

दुसरा दिवस. प्रशांत निघण्यासाठी तयार झाला होता. पुस्तकांनी भरलेली एक बॅग आणि इतर समान असलेली अजून एक बॅग घेऊन तो आपल्या रुमबाहेर पडला.

हॉलमध्ये मम्मी पप्पा चहा पिताना आपल्याच विचारात मग्न होते.

“चला, येतो मी”प्रशांतने दोघांकडे नजर फिरवली.

मम्मीने रागाने त्याच्याकडे पाहिले. तिला काहीतरी बोलायचे होते, पण तिने ते टाळले. पप्पानी त्याचाकडे पाहिले सुद्धा नाही.

प्रशांतने पाठीवर एक बॅग लटकवत दुसरी बॅग हातात घेतली आणि बाहेरचा रस्ता धरला.

चालत चालत तो गणपतीच्या मंदिरापाशी पोहोचला. तेथे विराट कारमध्ये बसून पहिल्यापासून त्याची वाट पाहत होता. विराटने प्रशांतला पाहिले. तो काहीसा नाराज दिसत होता, यावरून विराटला अंदाज आला की घरी काय घडले असेल.

दोन्ही बॅग मागच्या सीटवर ठेवत प्रशांत शांतपणे त्याच्या शेजारच्या सीटवर येऊन बसला.

"मी सांगितलं ते सगळं आणलं ना?"प्रशांतने प्रश्न केला.

"हो मग.. सगळं घेऊन आलोय.. विराट उत्साहाने बोलला.

"नकाशा निट पाहिला का?"

"हो.. जरा अवघड जागी आहे ते गाव!" विराट संकोचित होत बोलला.

"मग?"

"नाही.. जायला अवघड रस्ता आहे म्हणून थोडं.. विराटच्या मनात भीती दिसत होती.

"अवघड आहे म्हणून हार मानायची नाही विराट! आजोबांना शोधण्यासाठी त्याचाही सामना करू!" प्रशांत दृढ निश्चयाने बोलला.

"हम्म" विराटने विश्वास दाखवत मान हलवली.

"ठीक आहे चल, करू सुरुवात या शोधमोहिमेची!" एखादी लढाई जिंकण्यासाठी जायचं आहे अशा अविर्भावात विराट बोलला. प्रशांतने त्याला हळूच हसत प्रोत्साहन दिले. विराटने गाडी चालू केली.

आजोबा मी येतोय! प्रशांतने मनातल्या मनात आजोबांना साद घातली. जणू त्याचे आजोबा त्याच्याकडे हसून पाहत असावे असा त्याला भास झाला. आजोबांची हसरी मुद्रा पाहण्यासाठी त्याचे मन आतुर झालेले होते. काहीही करून त्यांना हसताना पहायचं , असा त्याने मनात जणू ध्यास घेतला होता..

विराट आणि प्रशांत निघाले होते एका अद्भुत आणि आवहनात्मक अशा प्रवासाला. जो त्यांना घेऊन जाणार होता, प्रशांतच्या आजोबांकडे - एका रहस्यमय जागेकडे!

# मुद्राध्यास – भाग २

## रहस्याच्या जवळ

-----------------------------------

विराटची गाडी एका मोठ्या हायवेवरून धावत होती. हलका हलका पाऊसही सुरू झाला होता. विराटने प्रशांतकडे एक नजर टाकली. त्याची नजर खिडकीबाहेर होती. मनात नक्कीच आजोबांचे विचार सुरू असणार.

“मला वाटत, आपण कुठे तरी थांबायला हवं, काही खाल्लं पण नाही सकाळपासून” विराट बोलल्यावर प्रशांत तंद्रीतून बाहेर आला. विराटला भुकेची जाणीव होऊन झाली होती. त्याला इतक्या वेळ ड्राईव्ह करायची सवयही नव्हती. दोन तासांपासून सलग गाडी चालवून त्याला कंटाळा आला होता.

प्रशांतने तो काय बोलला काही ऐकले नव्हते. विराटच्या लक्षात येताच त्याने मघाचे वाक्य परत बोलत त्याच्याकडे पाहिले. प्रशांतने खिशातून मोबाईल काढून त्यावर मॅप चेक केला.

“इथून पाच मिनिटांनी एक हॉटेल दाखवत आहे, तिथे थांबू” प्रशांत बोलला.

पाच मिनिटांनी एक छोटे हॉटेल त्यांच्या नजरेस पडलं. दोघे उतरून आत गेले. बाहेर एक छोटी टपरीवर नाश्ता बनवण्याचं काम जोरात चालू होतं. आतमध्ये बसायला टेबल आणि खुर्च्या मांडलेल्या होत्या. विराट आणि प्रशांतने थेट कोपऱ्यातल्या रिकामा टेबल गाठला.

ऑर्डर देऊन दोघ पुढल्या प्रवासाचा विचार करू लागले.

“तिथे पोहोचायला अजून तीन-चार तास लागतील” विराट बोलला.

“नॉनस्टॉप गेलो तर!” प्रशांत उद्गारला.

“तिथे जाऊन पहिले जायचं कुठे?” विराटने प्रश्न केला.

“माहीत नाही!”

काहीवेळ कोणी काही बोलले नाही.

“सगळयात पहिले आजोबांना कोणी ओळखतं का याची माहिती काढावी लागेल” काहीवेळाने प्रशांत बोलला.

तोपर्यंत वेटर नाश्ता घेऊन आला. ते टेबलवर ठेऊन तो निघून गेला. गरमागरम वास नाकात शिरताच विराटने नास्ता खायला

सुरुवात केली. त्या सुगंधाचा मात्र प्रशांतवर काहीही परिणाम झाला नाही. तो एकटकपणे समोर बघत विचार करत होता.

ती रहस्यमय जागा नेमकी कशी असेल, तिथे काय असेल ह्या विचाराने त्याच्या मनातली उत्सुकता वाढत होती.

“खा ना! विचार नंतर कर. विराटच्या आवाजाने तो विचारातून बाहेर आला. बळच खायचं म्हणून त्याने खायला सुरुवात केली. खाता खाता त्याचे लक्ष एकेठिकाणी अचानक थांबले. खाली टेबलजवळ त्याला एक नाणं पडलेलं दिसलं. खाणं थांबवून एखादी सोन्याची मुद्रा सापडावी तसे लगबगीने खाली वाकत त्याने ते नाणं उचललं.

“काय आहे?” विराटने अचंभीत होत त्याच्याकडे पाहिले. प्रशांतने ते नाणं उचलून समोर धरलं. त्यावरचा अस्पष्ट मजकूर वाचण्याचा प्रयत्न पाहून विराट गोंधळला.

“काय आहे प्रशांत? कोणता नाणं आहे ते?”

“यावर आजोबांचं नाव आहे!” प्रशांत अडखळत बोलला.

“काय?” विराट उडालाच.

“हे तेच नाणं आहे, जसं नाणं मला आजोबांनी लहानपणी दिलं होतं!” प्रशांतने बोलून आपल्या खिशातून एक नाणं बाहेर काढून टेबलवर एकमेकांशेजारी मांडले. दोन्ही नाणे सारखेच होते.

फक्त एक फरक होता, एका नाण्यावर कोणाचेही नाव नव्हते. तर दुसऱ्यावर प्रशांतच्या आजोबांचे!

"पण हे नाणं इथं कसं आलं?" विराट दोन्ही नाण्यांकडे बघत बोलला.

"माहीत नाही!" प्रशांत चांगलाच गोंधळला होता. अशा ठिकाणी आजोबांचं नाणं! म्हणजे आजोबा इथं आले असतील?

विचारात पडलेल्या प्रशांतने समोर काउंटरकडे नजर टाकली. तेथे एक वयस्कर माणूस पैसे घेण्यादेण्याचे काम करत होता. तोच हॉटेलचा मालक होता.

प्रशांत पटकन उठून काउंटरकडे गेला. विराट त्याच्याकडे आश्चर्याने आणि गोंधळून बघत त्याच्यामागे गेला.

प्रशांतने तिथे सापडलेलं नाणं त्या मालकासमोर धरलं.

"हे नाणं मला त्या टेबलजवळ सापडलं. याबद्दल आपल्याला काही माहिती?"

नाश्त्याचं बिल घेण्यासाठी उभ्या मालकाने अनपेक्षित प्रश्न विचारला गेल्याने गोंधळून त्याच्याकडे पाहिलं. बाकीची बिल देण्यासाठी उभी लोकं गोंधळून प्रशांतकडे पाहू लागली.

“नाणं? कसलं नाणं?”मालक मोठयाने ओरडले. त्यांचा भारदस्त आवाज ऐकून प्रशांत काहीसा घाबरला. मालक त्याच्याकडे रागाने बघत होता.

“आपण थोडावेळ बाजूला येता का? आपली मदत हवी आहे”प्रशांत दबक्या आवाजात बोलला.

“गुपचूप बिल दे आणि निघ! त्या नाण्याबिण्याचं मला काही माहीत नाही!” मालक मोठ्याने संतापून ओरडले. तसा प्रशांत मागे झाला. विराट पुढं होत नाश्त्याचे पैसे देऊ लागला. प्रशांत चिडलेल्या मनस्थितीत बाहेर आला. बाकीचे लोकही त्याच्याकडे दुर्लक्ष करत आपापल्या कामाला लागले. विराट बिल देऊन बाहेर आला. नाश्ता वाया घातल्यामुळे मालकाने त्याला चांगलेच झापले. प्रशांतबद्दलचा राग मालकाने विराटवर काढला होता.

प्रशांत चिडून गाडीत बसला. त्याला बघून विराट लगबगीने गाडीचे दार उघडून आत बसला.

"“आता काय करायचं? त्या नाण्याचं?”विराटने गांभीर्याने प्रश्न केला. प्रशांतकडे उत्तर नव्हते.

“इथं काही कळणार नाही, आपण निघायला हवं” प्रशांत बोलला. त्याच्या बोलण्यात थोडी निराशा जाणवत होती. विराटला त्या मालकाकडे जाऊन काहीतरी माहिती काढायला हवी, असं

वाटत होतं. पण प्रशांतच्या म्हणण्याप्रमाणे इथं काही माहिती मिळण्याची शक्यता कमीच होती.

विराट गाडी चालू करणार तोच गाडीच्या खिडकीच्या काचेवर टकटक झाली. विराटने बाहेर पाहिले. कोणीतरी वयोवृद्ध बाबा उभे होते. विराटने प्रश्नांकित चेहऱ्याने काच खाली केली.

“मला माहीत आहे नाण्याबद्दल!” थकल्यासारख्या आवाजात ते बाबा बोलले. प्रशांतने लगेच चमकून त्यांच्याकडे पाहिले.

“तुम्ही बाहेर या. बोलून ते बाबा हॉटेलपासून थोड्या लांब अंतरावर उभी राहिले. विराटने गोंधळलेल्या चेहऱ्याने प्रशांतकडे पाहिले. प्रशांतने मानेनेच ' चल ' अशी खून केली. दोघेही उतरून बाहेर आले. हॉटेलच्या उजव्या बाजूला असलेल्या एका पत्र्याच्या शेडजवळ उभे राहून ते बाबा त्यांच्याकडेच बघत होते. दोघे विचारांच्या तंद्रीत चालत त्यांच्याजवळ पोहोचले.

प्रशांतने त्यांच्याकडे पाहिले. सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावर गंभीर आणि थकलेले भाव होते. प्रशांतला काय आणि कसं बोलावे कळेना. त्याच्या डोक्यात विचारचक्र चालूच होते.

“नाणं दाखव”त्या बाबांनी थकलेल्या आवाजात बोलून आपला हात प्रशांतसमोर धरला. प्रशांतने गोंधळलेल्या अवस्थेत खिशातून ते मघाशी सापडलेलं नाणं त्यांच्या हातावर ठेवले.

बाबा डोळयाजवळ धरत त्यावरचे नाव वाचू लागले, पण त्यांची दृष्टी त्यांना साथ देत नव्हती.

“मला वाचता येईना, यावर काय नाव आहे?”त्यांनी प्रश्न केला.

“माझ्या आजोबांचं.. सुदर्शन जोशी.. प्रशांत बोलला.

नाव ऐकून त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर प्रचंड गांभीर्य पसरले. धक्का बसल्यासारखे ते काहीवेळ स्तब्ध उभे होते. त्यांच्या डोळयात हलके पाण्याचे थेंब जमा होऊ लागलेले प्रशांतने पाहिले.

“सुदर्शन.. त्यांच्या चेहऱ्यावर हळूहळू हास्य पसरू लागले. डोळयातील पाणी गालांवरून ओघळत होते.

यांच्या कडून नक्कीच काहीतरी समजणार, या आशेने प्रशांत आनंदला. एक हास्य त्याच्या चेहऱ्यावर पसरले. पण त्या बाबांकडे बघून तो पुन्हा गंभीर झाला.

“तुम्ही ओळखता त्यांना?”विराटने विचारलं.

बाबांनी हातातल्या नाण्यावरची नजर विराटकडे वळवली.

“ओळखायचो!” एवढेच शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडले. त्यांना बरंच काही बोलायचं होतं, पण भावना आवरणे त्यांना शक्य होत नव्हते.

“कधी ओळखायचा? आता ते कुठे आहेत, ते माहीत आहे का?”प्रशांत मनातून उत्सुक झाला होता, पण त्याने चेहऱ्यावर गांभीर्य ठेवले होते. आता बाबा बोलायच्या स्थितीत नाहीत, हे पाहून विराटने त्याला डवचून घाई न करण्याचा इशारा केला. प्रशांतच्याही ते लक्षात आले.

बाबा पत्र्याच्या शेडजवळ ठेवलेल्या एका खुर्चीत जाऊन बसले. काही वेळ विराट आणि प्रशांत त्यांच्याकडे बघतच उभे होते. हातातील नाणं छातीजवळ धरून त्यांनी आपले डोळे मिटले. जसे ते देवाला आठवत असावे.

“काय झालं या बाबांना?”विराटने त्यांच्याकडे बघून विचारले.

“आजोबांना ओळखत असावे नक्की.. प्रशांत विश्वासाने बोलला.

काहीवेळाने त्या बाबांनी डोळे उघडले. हळूच दोघांवर नजर टाकून जवळ येण्याचा इशारा केला. शेडमधून दोन लोखंडी खुर्च्या

आणून त्यांनी बाहेर मांडल्या. विराट आणि प्रशांतला बसण्याची खुण करत ते देखील खुर्चीत बसले.

ते नाणं पुन्हा प्रशांतकडे सोपवत त्यांनी बोलायला सुरुवात केली.

“पंधरापेक्षा अधिक वर्षे झाली सुदर्शनला भेटून. फार चांगला माणूस होता तो. कधी या भागात आला आणि ह्या हॉटेलमध्ये येऊन माझ्या हातचा चहा घेतला नाही, असं झालं नाही”बोलताना बाबांचा कंठ दाटून आला होता.

“तू कोण?”बाबांनी प्रशांतला विचारले.

“मी त्यांचा नातू. त्यांना शोधायला निघालोय”

“शोधायला म्हणजे?”बाबांनी गोंधळून विचारलं.

“आठ वर्षांआधी ते घर सोडून गेले होते. कुठे गेले माहीत नाही”प्रशांतने सांगितलं.

“घर सोडून? का?”

“घरात काही वाद झाले होते. त्यामुळे. प्रशांत मनातून दुःखी झाला होता. त्याला पुन्हा आजोबांची आठवण येऊ लागली. ते ऐकून बाबाही दुखावले. त्यांचे पाणावणारे डोळे बघून प्रशांतला वाईट वाटले.

“आपण कधीपासून ओळखायचे त्यांना?”प्रशांतने विचारले.

“तुझे आजोबा फिरायला या भागात नेहमी येत असायचे. एक दोन वर्षांत फार ओळख झाली होती आमची. नंतर अचानक कुठे गायब झाला तो माहीत नाही.. फक्त त्याची पुस्तकं वाचायला भेटायची, पण तो कधी भेटला नाही.

“पण हे नाणं इथं कसं आलं असेल?”

“माझ्याकडूनच पडले होते तिथे. बाबा मान खाली घालत बोलले.

“म्हणजे?”प्रशांतने गोंधळून विचारले.

“मी हॉटेलमध्ये काम करायचो, तेव्हा त्या कोपऱ्यातल्या टेबलवर बसून हे नाणं न्याहाळायचो. जेव्हा सुदर्शनची आठवण येईल तेव्हा! पण नंतर मी काम सोडलं. अचानक एकेदिवशी सुदर्शनची आठवण झाली म्हणून ते नाणं धुंडाळू लागलो, पण ते कुठं मिळालं नाही. वाटल एक आठवण होती सुदर्शनची, ती पण नाहीशी झाली”

प्रशांत आणि विराट दोघेही बुचकळ्यात पडले. जर एवढ्या दिवसांपासून नाणं तिथं पडलं असेल, तर ते कोणाला दिसले नाही? का बाबा काहीतरी वेगळंच सांगताय?

“हे कसं शक्य आहे? ते नाणं इतके दिवस कोणाला दिसलं नाही!” विराट बोलला.

“कसं दिसणार? चांगल्या लोकांनाच दिसणार ते!” बाबांच्या वाक्यावर प्रशांतने मोठ्या गोंधळाने विराटकडे पाहिले. ' काहीतरी गडबड आहे ' अशी खूण विराटने केली. बाबा मात्र स्वतःबद्दल सांगू लागले.

“मला तुच्छ व्यक्ती समजतात सगळे! या हॉटेलचा मालक पहिल्यापासून माझा तिरस्कार करायचा. कारण त्यालाच माहीत! पण माझ्याकडे दुसरं काम नसल्यामुळे मला तिथे काम सोडता येत नव्हतं. पण एकेदिवशी वाद विकोपाला गेला. आणि माझं काम गेलं. ते नाणंही! तेव्हापासून त्या हॉटेलमध्ये मी पाऊल ठेवलं नाही. आता इथं बसून भीक मागण्याशिवाय मी काहीही करत नाही!”

“नाणं चांगल्या लोकांना दिसणार म्हणजे काय, बाबा?”प्रशांतने विचारले. यावर बाबा मंदपणे हसले.

“म्हणजे, ते तुला दिसावं, अशी इच्छा असावी देवाची! नाहीतर इतक्या दिवसांनी नाणं दुसरं कोणालाही न दिसता, तुला दिसावं, हा चमत्कार आहे!” बाबा मंद हास्य कायम ठेवत बोलले.

“पण या नाण्यावर आजोबांचे नाव?”प्रशांतने त्या नाण्यावरचं नाव आठवत विचारलं.

“बनावट नाणं आहे ते! सिरोह्यातील एका माणसाने त्यांना भेट म्हणून दिलं, असं म्हणाला होता तो. त्यातूनच एक मला दिलं.

बाकीची नाणी त्याने स्वतःजवळच ठेवली होती''सिसिरोहा गावचे नाव ऐकताच दोघे चमकले.

"सिसिरोहा? आपल्याला या गावाबद्दल माहिती आहे?''प्रशांतने विचारले.

"नाही. फक्त सुदर्शन प्रवासाला आला की तिथे थांबायचा एवढीच माहिती आहे''

"आता कुठे गेला कुणास ठाऊक?''बाबा हताशपणे म्हणाले. प्रशांतच्या आजोबांच्या आठवणीने ते भावुक झालेले दिसत होते.

"बाबा, मी माझ्या आजोबांना शोधीलचं, आपण मदत केली त्याचे धन्यवाद.. आम्हाला निघावं लागेल''प्रशांत आभार मानत बोलला.

"तूला आजोबा सापडले, तर पहिले इकडं घेऊन येशील, असं वचन दे''बाबांनी जड आवाजात वचन मागितले. हळूच त्यांनी आपला तळहात पुढे केला.

"वचन!'' त्यांच्या हातावर हात ठेवत त्याने वचन पूर्ण करण्याचा आत्मविश्वास दाखवला.

बाबांच्या भावविवश चेहऱ्याकडे बघून तो जाण्यास मागे फिरला. त्याच्या मनातील प्रश्नांत आता अजूनच भर पडली होती. आजोबांनी ते नाणे का बनवून घेतले असावेत? एक आवड म्हणून

की अजून काही? कितीही विचार केला तरी आता याची उत्तरे सिरोह्याला जाऊनच मिळणार होती. विराट थकल्यामुळे आता प्रशांत गाडी चालवू लागला.

मॅप मध्ये दाखवला जाणारा रस्ता त्यांच्या गाडीने पकडला होता.

जवळजवळ दोन तास चालवल्यावर एका जंगलासारख्या भागात प्रशांतने गाडी थांबवली. मॅप मध्ये दाखवल्याप्रमाणे त्यांचा रस्ता बरोबर होता. पण मॅपवर दिसणारा जंगलाच्या मधून जाणारा रस्ता त्यांना कुठेही नजरेस पडेना. त्याच्या शोधात ते लांबपर्यंत चालत गेले. पण हाती निराशा. पुन्हा चालत ते गाडीजवळ येऊन थांबले.

“आता काय?”विराटने वैतागलेल्या आवाजात विचारलं.

“पावसामुळं तो रस्ता खचला असावा!” प्रशांत समोर पाहत बोलला. विराटनेही तिकडे पाहिले. पहिले एक पायवाट असावी असावं वाटत होते. पण आता सुरुवातीची वाट सोडली तर मोठमोठे दगड वाट अडवण्याचं काम करत होते. त्यापुढे काही झाडे कोलमडून पडली होती. काही ठिकाणी खचलेली जमीन बघता प्रशांतचा अंदाज बरोबर होता. प्रचंड पावसामुळे झाडे कोलमडून पडली असावीत. जमीन खचल्यामुळे कोणीतरी मुद्दाम त्या

वाटेवरून कोणी जाऊ नये म्हणून दगड लावून ती वाट बंद केली असावी. आता काय करावे हा विचार करत प्रशांत त्या वाटेजवळ जाऊन अजून थोडं दूरवर पाहू लागला. जिथे झाडांमुळे वाट अडली होती, तिथून थोडं पुढं व्यवस्थित रस्ता दिसून येत होता. तो रस्ता नक्कीच गावाकडे जात असावा. पण तिथपर्यंत पोहोचणे अवघड होते. त्या रस्त्याला जायचे कसे हा प्रश्न होता. सगळीकडे जंगल असल्याने दुसरा कोणता रस्ता असण्याचीही शक्यता कमीच.

“बोल आता काय करायचं? तू तर सगळी माहिती काढली होती ना, मग?”विराट काय करावे, सुचत नसल्याने हैराण होत बोलला.

“परत माघारी जावं लागेल!”

विराट आता चिडला. प्रशांत परत जायचं म्हणतोय! तो रागाने काही बोलणार तोच प्रशांत स्पष्टपणे बोलू लागला.

“या जंगलातून जाण्यासाठी आपल्याला आजूबाजूच्या गावातील लोकांची मदत घ्यावी लागेल. तेच आपल्याला मदत करू शकतील. सिसिरोहापर्यंत जाण्यासाठी आपल्याकडे आता दुसरा पर्याय नाही”प्रशांत मान खाली घालून बोलला.

“बाजूलाच एक छोटे गाव आहे. तिथल्या लोकांना नक्कीच जाण्याचा दुसरा रस्ता माहीत असेल”प्रशांत मागे वळून विराटकडे बघत बोलला.

“पण त्यांनाही माहीत नसेल तर?”विराट बारीक आवाजात बोलला.

“अस शक्य नाही. ते नक्कीच काहीतरी मदत करतील. प्रशांत विश्वासाने बोलला.

“मला तर काही सुचत नाहीये रे! गावात गेलं, तर आपण म्हणू तसंच होईल याची खात्री काय?”विराट मुद्दामून गावात जाण्याचं टाळत होता. खरंतर तो याआधी कधी गावात राहिला नव्हता, ना त्याने कधी गावातले जीवन अनुभवले होते. गावात जाण्याची त्याची इच्छा नाही, हे प्रशांतच्या लक्षात आले.

“तुला गावातील लोकांवर विश्वास नाही का माझ्यावर? ”प्रशांत चिडून बोलला. विराट गोंधळात पडला.

“तू गावात जायला का नाही म्हणतो, ते मला समजतंय! मी चाललोय, तुला यायचं तर ये नाहीतर बस इथंच!” प्रशांत रागाने बोलला.

“मला नाही आवडत गाव! तुला माहीत नाही का, मी कधीच गावात राहिलो नाही ते. मी फक्त आजोबांना शोधण्यासाठी तुझ्याबरोबर इथं आलो, पण आता मला विचित्र वाटतंय.

प्रशांत चिडून गाडीत ड्रायव्हिंग सीटवर बसला. विराट गोंधळलेल्या अवस्थेत उभा राहून त्याच्याकडे बघत होता. द्विधा मनस्थितीत विचार करत कितीतरी वेळ घुटमळत उभा होता. विराटचा विचार बदलेल असं वाटून प्रशांत त्याच्याकडे बघत होता. शेवटी खूप विचार करून गावाबद्दल असणारी नावड त्यागून मित्रासोबत जाणं विराटला योग्य वाटू लागलं. गाडीचे दार उघडून तो प्रशांतशेजारी बसला. त्याला पाहून प्रशांत हळूच हसला.

“माहीत होतं मला, तू मला एकटा सोडणार नाही. प्रशांत हळूच हसत बोलला. कितीतरी वेळाने प्रशांतला हसताना पाहिल्यामुळे विराट मनोमन सुखावला.

“हह.. शेवटी मैत्रीपेक्षा काही मोठं नाही.. याच कारणामुळे गावातील जीवन कसे असते, ते समजेल” विराट प्रशांतकडे पाहत हसून बोलला.

प्रशांतने पुन्हा गंभीर होत गाडी चालू केली. ती जवळच्या गावाच्या दिशेने धावू लागली.

समोरून एक गावकरी आपली गुरं हाकत चाललेला बघून गावात शिरल्याची जाणीव प्रशांतला झाली. त्याने तिथं बाजूलाच गाडी थांबवली.

“गाव आलंय, चल”प्रशांत गाडीतून उतरत बोलला. विराट त्या गुरं हाकणाऱ्या माणसाकडे कुतूहलाने बघत गाडीतून उतरला.

तो गावकरी जवळ येताच प्रशांत त्याच्याशी बोलायला त्याच्यासमोर गेला.

“काका, आम्हाला काही मदत हवी आहे”

तो गावकरी काहीवेळ त्याच्याकडे बघतच बसला.

“तुमी कोण?”गावकऱ्याने दोघांकडे एक नजर टाकून प्रश्न केला.

“आम्ही मुंबईवरून आलो आहे. सिसिरोहा या गावात जाण्यासाठी आम्हाला मदत पाहिजे” प्रशांत बोलला.

“क्षमा करा, म्या या गावात नवा हाय, मला काई माहीत नाय. तो गावकरी माफी मागत चालता झाला. विराटला त्याचा राग आला. मुद्दामून ही लोकं काही सांगत नाही, असं त्याच्या मनात आलं. प्रशांत पुन्हा चालू लागला.

“गाडी?”विराट गाडीकडे बघत बोलला. प्रशांतने चालणं थांबवत त्याच्याकडे पाहिले.

“इथंच राहूदे, जास्त कोणी येणार नाही इकडे. नाहीतर गाडी बघून गावातली लोकं व्हीआयपी सारखं बघत बसतील आपल्याकडं. प्रशांत गमतीने म्हणाला. विराटलाही हसू आलं. पण मनात गाडी व्यवस्थित राहिला का नाही, या काळजीने तो तिथून निघाला.

गावातील घरे, परिसर बघत बघत दोघे चालले होते. प्रशांत या आधीही अनेक गावांत फिरला होता, त्यामुळे त्याला गावातील राहणीमानाची बऱ्यापैकी माहिती होती. गावाच्या सुंदरतेपेक्षा त्याचे लक्ष आपल्याला कोणी मदत करणार दिसत का याकडे होतं.

विराटला मात्र हे सगळं नवीन असल्याने त्याची नजर इकडे तिकडे भिरभिरत होती. पावसाळा असल्याने सगळीकडे पसरलेली हिरवाई बघून त्याला एक वेगळाच आनंद मिळाला. सर्व झाडे हिरव्या पानांनी भरून त्याचा गारवा सगळीकडे पसरवण्याचं काम करत होते. संध्याकाळच्या कोवळया उन्हाने पसरलेला सोनेरी रंग त्या हिरवाईत मिसळून डोळयांना एक वेगळंच सुख देणारा होता. काही ठिकाणी झोपड्या तर कुठे कौलारू घरे कुतूहलाने बघत विराटचे डोळे सुखावत होते. आजवर फक्त फोटोत पाहिलेल्या

धोतरातल्या शेतकऱ्यांना बघून वेगळीच भावना त्याच्या मनात उमटली. ते किती कष्ट करत असावेत, याची हलकी जाणीव त्याला झाली. एके ठिकाणी शेणाने जमिन सारवण्याचं काम बघून त्याला कसेतरीच वाटले.

शहरातल्या आणि गावातील जीवनात किती फरक आहे! शहरात आजवर मिळाला नसेल, तितका आनंद आणि वेगळेपण या गावात वाटतोय, या विचाराने विराट सुखावला. याआधी आपण गावाबद्दल काय विचार करायचो.

चालता चालता दोघे एका मोठ्या झाडाजवळ आले. त्या झाडाखाली एक मोठा चबुतरा होता. त्याच्या शेजारीच लहान मुलं आपापले खेळ खेळण्यात मग्न होऊन गेली होती. रस्त्यात कोणाला विचारावं, असं कोणी दिसलं नाही. गावात लोकही कमीच दिसत होती. कोणी ओळखीचं नसल्याने प्रशांत कोणाशी बोलायलाही जरा संकोचत होता. थोडावेळ बसावं म्हणून दोघे त्या चबुतऱ्यावर विसावले.

"किती मस्त गाव आहे! एक वेगळीच फिलिंग येतेय"विराट उत्साहात बोलला. मात्र प्रशांत वेगळ्याच विचारात होता.

"कोणाला विचारायचं आता? कोण आपली मदत करेल?" विराट त्याच्याकडे बघून बोलला.

“तेच समजत नाहीये. एकतर सगळे अनोळखी. कोणाला विचारायला थोडं विचित्र वाटतं” प्रशांतचा संकोच विराटला समजला.

काही वेळ काही इतर गप्पा मारत तिथे आरामात बसून राहिले. नेहमीप्रमाणे विराट त्याच्या मामाचे कौतुक गात होता तर कधी या गावाबद्दल बोलत होता. प्रशांतचे फक्त ऐकण्याचे काम होते.

“आता निघायला पाहिजे. आजची रात्र इथेच काढावी लगेल”प्रशांत चबुतऱ्यावरून उतरत बोलला.

“इथे?”

“आता इथून परत सिरोह्याला जायचं म्हणजे फारच रात्र होईल”प्रशांत आकाशात बघत बोलला. सुर्य मावळतीला चालला होता. पश्चिमीकडे आकाश नारंगी रंगाने भरले होते. पक्ष्यांचा थवा त्याची शोभा अजून वाढवण्यास पुरेसे होते. प्रशांत निसर्गाचे नयनरम्य दृश्य बघण्यात गुंगला.

“मग आता रात्रभर कुठं रहायचं? लवकर कोणाला तरी मदत मागावी लागेल. भूक पण लागली आहे”विराट बोलला. कोणाचा तरी बोलण्याचा आवाज प्रशांतच्या कानावर पडला. त्याने आकाशवरची नजर त्याच्या उजव्या बाजूला वळवली. कोणीतरी

दोन त्यांच्याच वयाचे तरुण त्याच्याकडे बघत काहीतरी आपापसात बोलत होते. ते बहुतेक आपल्या आणि विराटबद्दल बोलत असावे, असा प्रशांतला अंदाज आला.

“त्यांना मदत मागायची का?”विराट त्या दोघांकडे पाहून बोलला. त्यानेही त्यांना बोलताना पाहिले होते.

“पण ते तर इथले वाटत नाहीत”प्रशांत त्यांच्याकडे निरखून पाहत बोलला.

ते दोघे शहरातील असावेत, हे त्यांच्या पेहरावावरून जाणवत होते. दोघांच्या कपाळावर लाल रंगाची पट्टी बांधली होती. दोघांचे कपडेही सारखेच. पांढरा शर्ट आणि काळया रंगाची जीन्स. दोघांच्या शारीरिक जडणघडणीतच फक्त फरक दिसून येत होता. एक जण उंचीने लांब चपट्या चेहऱ्याचा, तर दुसरा थोडा ठेंगणा आणि सावळा. दोघे एकतर भाऊ असावेत, नाहीतर भावासारखे मित्र!

“चल बोलून बघू”प्रशांत त्यांच्यादिशेने चालू लागला. मागोमाग विराट येऊ लागला. प्रशांत त्याच्याजवळ येताना बघून ते दोघे बोलणं थांबवत त्याच्याकडे बघू लागले. प्रशांत त्यांच्याजवळ जाऊन काही बोलणार तेवढ्यात तो उंच तरुण स्वतःहून पुढं आला.

"हेय ब्रो!" त्याने आपला हात पुढं केला.

प्रशांतने आपला हात त्याच्या हातात मिळवला. त्याला घामाचा ओलसर पणा जाणवला.

"हॅलो, मी प्रशांत"

दुसऱ्या तरुणाने विराटसमोर हात केला. विराटने त्याच्या गंभीर चेहऱ्याकडे बघत हात मिळवला. हात मिळताच त्याचा गंभीर चेहरा प्रसन्न झाला.

"अ.. आम्हाला थोडी मदत हवी आहे"प्रशांत बोलला.

"बोल मित्रा काय मदत?"तो उंचापुरा तरुण बोलला. त्याच्या बोलण्यात विदेशी उच्चाराची झलक दिसत होती. त्याच्या गोऱ्या रंगाकडे बघूनही तो विदेशी असावा, असे वाटत होते.

"आम्हाला शेजारच्या एका गावात जायचे होते. पण तिथला रस्ता बंद असल्याने आम्ही मदत मागण्यासाठी या गावात आलो. कोणाला तरी दुसरा रस्ता माहीत असेल या आशेने. पण आता रात्र होत आली आहे आणि आमची कोणाशी ओळखही नाही, म्हणून या गावात रहायची सोय झाली तर बरं होईल. प्रशांतने आपली अडचण सांगितली.

“व्हाय यु आर वरी ब्रो? आमच्या फार्म हाऊस वर चला की” तो तरुण उत्साहात बोलला. फार्म हाऊस ऐकून विराटला जरा हायसे वाटले.

“हा चला की फार्म हाऊसवर. असं पण आम्ही दोघेच आहोत तिथं” दुसरा तरुण बोलला.

“हा पण इथं फार्म हाऊस? आम्हाला तर दिसलं नाही कुठं”प्रशांत शंकेने बोलला.

“अरे ब्रो ते थोडं लांब आहे इथून. कार आहे की आमची, चला आमच्याबरोबर”उंच तरुण त्याला विश्वास दाखवत बोलला. प्रशांतला तरीही असं ओळख नसताना जाणं बरोबर वाटत नव्हतं. पण ते दोघ विश्वासू वाटत होते.

प्रशांतने विराटकडे पाहिले. त्याने ' जाऊया ' अशी खून केली.

“चला, जास्त विचार करू नका. आम्हालाही सोबत होईल” दुसरा तरुण बोलला.

“ठीक आहे चला. प्रशांत त्यांच्यासोबत जाण्यास तयार झाला.

“चला”ते दोघ तरुण पुढंपुढं चालू लागले. त्यांच्यामागे विराट आणि प्रशांत. चालत चालत ते गावाच्या बाहेर आले. तिथे

विराटची गाडी उभी होती. आणि त्याशेजारी अजून एक फोर व्हीलर. ती बहुतेक त्या दोघांची असावी.

“फॉलो मि.. माझ्या गाडीमागून तुमची गाडी चालवा”तो तरुण गाडीत बसत बोलला. दुसरा तरुण त्याच्याशेजारी गाडीत बसला. विराट आणि प्रशांतही गाडीत बसले.

गाडी जशाच्या तशी उभी होती, याचे विराटला कुतूहल वाटले. शहरात अश्या ठिकाणी गाडी उभी केली असती, तर एखाद्याने पळवली असती नाहीतर काहीतरी वाट तरी लावली असती.

त्या तरुणांची गाडी ज्या दिशेला जाईल, त्या दिशेला प्रशांत गाडी पळवत होता. ते दुपारी ज्या रस्त्याला आले होते, तिथेच ते पुन्हा आले. हा रस्ता त्या जंगलाजवळच्या त्या बंद पायवाटेकडे जाणाराच होता. फार्म हाऊस जंगलाच्या जवळच तर नसेल, अशा विचाराने प्रशांत काहीसा धास्तावला. कारण अशा परिसरात जंगली जनावरं येण्याचाही धोका होता.

पण त्याच्या अंदाजाविरुद्ध त्या तरुणांची गाडी मधेच थांबली. प्रशांतने गाडी थांबवत बाजूला पाहिले. एका बंद गेटमागे एक मोठा बंगला दिमाखात उभा होता.

तो ठेंगणा तरुण गाडीतून उतरत गेटजवळ गेला. त्याचे लॉक उघडून त्याने गेट पूर्ण उघडले. तश्या दोन्ही गाड्या आत शिरल्या. गाडी पार्किंगमध्ये लावून उतरत प्रशांत त्या बंगल्याची बाहेरून दिसणारी सुंदरता न्याहाळू लागला. अगदी एखाद्या फोटोप्रमाणे वाटणारे समोरचे दृश्य होते. आकर्षक अश्या रंगांनी तो बंगला बाहेरून सजला होता. प्रशांतला लॅपटॉपवर एखादं वॉलपेपर बघावं तसा भास झाला.

विराट त्या दोघा तरुणांच्या मागोमाग दरवाज्याजवळ आला. दार उघडेपर्यंत प्रशांतही बंगला बघत बघत तिथे पोहोचला.

सगळे आत शिरले. सगळीकडे अंधार होता. त्या उंच तरुणाने डाव्या बाजूला जात अंदाजाने बटन दाबून लाईट्स चालू केल्या. लाईट जळताच बंगल्याच्या आतल्या सुंदरतेचं दर्शन झालं.

एखाद्या चित्रपटात दाखवतात तसा तो बंगला! समोर काचेचा टेबल आणि त्यासमोर दोन्ही बाजूंनी आरामशीर सोफे अगदी व्यवस्थित मांडलेले होते. उजव्या बाजूच्या भिंतीवर वेगवेगळ्या पेंटिंग त्या चमकत्या भिंतीला अधिकच सुंदर बनवत होत्या. तिथेच उजव्या कोपऱ्यात वरच्या मजल्यावर जाण्यासाठी एक जिना होता.

“वेलकम ब्रोज! आमच्या या फार्म हाऊस मध्ये”उंच तरुण त्यांचे स्वागत करत बोलला.

“आम्ही आमचं नाव तुम्हाला सांगितलंच नाही! मी अजित. तो ठेंगणा तरुण पुढं होत बोलला.

“हा.. मी विराट”विराटनेही आपली ओळख करून दिली.

“अरे हा, मी पीटर.. उंच तरुणाने आपली ओळख सांगितली.

“आपण पहिले फ्रेश व्हा, मग बोलू. अजित दोघांचा थकलेला चेहरा पाहून बोलला.

“या मी तुमची रूम दाखवतो तुम्हाला”अजित त्यांना घेऊन वरच्या मजल्यावर आला.

वर तीन रूम होत्या. त्यातली पहिली रूम अजितने उघडून त्याची चावी विराट आणि प्रशांतच्या हवाली केली. आणि तो त्याच्या शेजारच्या रूमचे लॉक उघडून आत शिरला.

प्रशांत फ्रेश होऊन बेडवर बसलेला होता. समोर बेडवर दोन नाणी मांडलेली होती. एक त्या हॉटेलमध्ये सापडलेलं. तर दुसरं त्याच्या आजोबांनी त्याला बालपणी दिलेलं. दोन्ही नाण्यांत नाव सोडलं तर काही फरक नव्हता. दारावर टकटक होताच त्याने दोन्ही नाणी बॅगमध्ये टाकली आणि उठून दरवाजा उघडला. समोर पीटर चेहऱ्यावर स्मित घेऊन उभा होता.

“डिनर तयार आहे. किचन मध्ये या. वि आर वेटिंग. पीटरने हसऱ्या मुखाने जेवणाचे निमंत्रण दिले.

“हो आलोच आम्ही”

पीटर निघून गेला.

विराट फ्रेश होऊन आल्यावर दोघे जिन्यातून खाली आले. जिना उतरल्यावर उजव्या बाजूला किचन होते.

किचनमध्ये डाव्या बाजूला डायनिंग टेबल मांडलेला होता. जेवण वाढून ठेवले होते. अजित आणि पीटर समोरासमोर बसले होते, तर अजून दोन खुर्च्या या दोघांसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या.

विराट आणि प्रशांत शांतपणे खुर्चीत बसले.

“काय मग आवडला का बंगला?”अजित जेवण सुरू करत बोलला.

“हो, फार सुंदर आहे! अगदी मुविमध्ये असतो तसा!” विराट कौतुक करत बोलला. अजित हसला.

“या बंगल्यात शूटिंग सुद्धा झालंय. पीटर लीड रोल मध्ये होता त्यात”अजितने पीटरकडे पाहिले.

“येस ब्रो, मी एक ऍक्टर आहे. आणि हे फार्म हाऊस मी बाय केलं आहे”पीटर विदेशी स्टाईलने बोलला.

“पण मग तुम्ही गावात काय करत होतात?”प्रशांतने विचारलं.

“मला वेगवेगळे लोकेशन बघायची सवय आहे. पुढच्या काही फिल्म्स त्या व्हिलेज मधेच शुट करायचा विचार आहे”पीटर घास तोंडात टाकत बोलला.

“आणि तुम्ही?”अजितने विचारलं.

“आम्ही शोधात निघालोय!” विराट दबक्या आवाजात बोलला.

“व्हॉट?”

“हो, माझ्या आजोबांच्या”

“आजोबांच्या?”अजितला काही कळेनासं झालं.

“यु मिन ग्रँडपा?”पीटरला कदाचित 'आजोबा' हा शब्द माहीत नसावा.

“हो”प्रशांतचे उत्तर.

“शोधायला म्हणजे, ते हरवले आहेत!” अजित आश्चर्याने बोलला.

“घर सोडून गेले होते. आठ वर्षे झाली”प्रशांतला पुन्हा आजोबांची आठवण झाली. त्याचे जेवण्याचे कामही थांबले.

अजितचे आश्चर्य अजूनच वाढले. आठ वर्षे झाली आणि हा आता का शोधायला निघालाय?

“बट, इतका टाइम झाला आणि तूम्ही आता?”पीटरलाही आश्चर्य वाटत होते.

“इतक्या दिवसांपासून त्यांची आठवण मला सतावत होती. पण आता त्यांना भेटल्याशिवाय मला चैन नाही!” प्रशांत भरल्या मनाने बोलला. त्याच्याकडे बघून या विषयावर जास्त बोलणे योग्य नाही, हे ओळखून पीटर पुढं काही बोलला नाही. अजितला मात्र स्वतःच्या स्वभावामुळे शांत बसणे शक्य नव्हते. त्याला अधिक जाणून घ्यायची उत्सुकता वाढली.

“म्हणजे ते या गावात असतील, असं तुम्हाला वाटलं?” अजितने जेवण थांबवत विचारलं.

“नाही. ते कुठे आहेत ते अजून नक्की माहीत नाही. पण सिसिरोहा या गावातून त्यांचा तपास लागण्याची शक्यता आहे”विराट जेवता जेवता बोलला.

“त्या गावाचा रस्ता बंद असल्याने आम्ही या गावात मदतीच्या आशेने आलो”प्रशांत इच्छा नसताना ताटातले जेवण जेवत होता.

“सिसिरोहा?”पीटर चमकून बोलला. प्रशांतने त्याच्याकडे नजर वळवली. पीटर काहीतरी आठवण्याचा प्रयत्न करत होता. त्याला काहीतरी अचानक आठवले. पण तो काही बोलला नाही. प्रशांत त्याच्याकडे लक्ष देऊन होता. तो काही बोलत नाही हे पाहून त्याला शंका वाटू लागली. सिसिरोहाचे नाव ऐकून तो चमकला म्हणजेच त्याला काहीतरी माहीत असणार. प्रशांतही तेव्हा काही बोलला नाही.

जेवण होईपर्यंत त्या विषयावर कोणी काही बोललं नाही.

पीटरने मुद्दामून विषय बदलत, स्वतःबद्दल सांगायला सुरुवात केली होती. विराट आणि प्रशांतनेही बोलता बोलता आपल्याबद्दल सांगितलं. बोलताना पीटर आणि अजित यांच्याबद्दल सगळं विराट आणि प्रशांतला माहीत झालं.

पीटर अर्धा जर्मन तर अर्धा भारतीय. त्याचे वडील मुंबईत फिल्म इंडस्ट्री मध्ये कार्यरत होते, तर आई जर्मनीतील एक हॉटेल व्यवसायिक. पीटर लहानपणापासून मुंबईत वाढलेला. फिल्म इंडस्ट्रीचे त्याला लहानपणापासून आवड. आपल्या वडिलांच्या मदतीने त्याने ॲक्टर बनण्याचे ठरवले होते. एक दोन चित्रपटांमध्ये त्याने आपल्या अभिनयाच्या जोरावर चांगले नाव कमावले होते.

या सगळ्यातच त्याला अजित भेटला. अजित एक सिंगर. त्याचा आवाज मधुर असल्याने त्याने गाणी म्हणायचा नाद कधी सोडला नाही. त्याचे वडील उद्योजक. पण त्याला त्यात रस नाही हे त्याच्या वडिलांना चांगलंच ठाऊक होतं. त्यामुळे त्यांनी मनमोकळेपणाणे अजितला आपला मार्ग निवडण्यास समर्थन केलं होतं.

चित्रपटांत एकत्र असल्याने अजित आणि पीटरची चांगली दोस्ती जमली होती. दोघे सोबतच राहत असायचे. दोघांना फिरायची आवड असल्याने, ते कधीही कुठेही फिरायला बाहेर पडायचे. नवनवीन ठिकाणचा शोध घेऊन, कुठे कोणत्या चित्रपटाचे शुटींग करता येईल का, याचं गणित नेहमी पीटरच्या डोक्यात चालू असायचं.

सगळे जण दोन नंबरच्या रूममध्ये बसून बोलत होते. खुर्ची मध्ये अजित आणि विराट तर बेडच्या कोपऱ्यावर प्रशांत आणि पीटर.

आजोबांचं नाव असणारी दोन नाणी त्या चौघांमध्ये असणाऱ्या काचेच्या टेबलवर ठेवलेली होती. ते दुसरं नाणं पीटरचं होतं! पीटरने सिसिरोहा गावाबद्दल काही माहिती आहे, असं सांगून वातावरणात गंभीरता आणली होती. प्रशांत अधीरतेने तो काय सांगतो याची वाट पाहत होता. ते नाणं पीटरकडे कसं आलं असेल, या विचाराने त्याच्या मनात वेगवेगळे तर्क निर्माण होत होते.

“एक इयर झालं असेल. मी सिसिरोहा नावाच्या व्हिलेजला शूटिंगसाठी गेलो होतो. फार वेअर्ड व्हिलेज आहे ते!” पीटर बोलायला लागला. बाकी सगळे लक्ष देऊन ऐकत होते. खासकरून प्रशांत.

“तिथे खूप कमी पीपल राहतात. ओन्ली टेन- फिफ्टीन! बाकी सगळं व्हीलेज रिकामं! तिथल्याच एका घरात एकजण फेक कोईन्स बनवतो, असं आम्हाला समजलं. देन, तिथूनच हा कोईन विकत घेतला. माझं नेम असलेला एक कॉइन सुद्धा बनवून घेतला तिथून”पीटर बोलायचं थांबला. तो अजून काहीतरी सांगेल या आशेने सगळे त्याच्याकडे बघत होते.

“बस्स एवढंच.. पीटर जवळ अजून काही सांगण्यासारखं नव्हतं.

“मग विचित्र असं काय? त्या गावात जास्त कोणी नसावं, काहीतरी वेगळं कारण असू शकतं”अजित बोलला.

“त्या व्हिलेज मध्ये सगळे ओल्ड एज पीपल राहतात. आपल्या वयाचं कोणीच नसेल”

“खरंच विचित्र आहे!” प्रशांत बोलला.

“आय थिंक, तुझे ग्रँडपा तेथेच असतील. मे बी मी पाहिलही असेल त्यांना. पीटर बोलला.

“तू तिथे रहस्यमय जागेबद्दल काही ऐकलं?”विराटने दबक्या आवाजात विचारलं.

“काय?”अजित त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागला.

“रहस्यमय जागा! जिथे आजोबा गेले आहेत” प्रशांत पीटरकडे पाहत बोलला. रहस्यमय जागा ऐकताच पीटरचा चेहरा उडाल्यासारखा झाला. प्रशांतने ते हेरले.

तो काही तरी लपवत आहे, याची त्याला खात्री पटली.

“आजोबांनी त्यांच्या डायरीत स्पष्ट लिहिलं आहे, की ते रहस्यमय जागी गेले आहेत”विराट बोलला.

“ती जागा कुठे आहे?”अजितने विचारलं.

“तेच शोधायचं आहे! सिरोह्याला गेल्यावर काहीतरी समजेल. आजोबांनी डायरीत सिसिरोहाबद्दल लिहिलं आहे, ते तिथे खूप आधी येऊन गेले होते”प्रशांत बोलला.

“ती जागा कशी आहे? नेमकं काय आहे तिथे?”अजितची उत्सुकता वाढली होती.

“अजित, त्याबद्दल आम्हालाही माहीत नाही. काय ते आता एकाच जागी कळेल. सिसिरोहा!” विराट बोलताच अजितची थोडी निराशा झाली.

“माझी खूप उत्सुकता वाढत आहे, आजोबा आणि त्या जागेबद्दल! आता काहीही करून शोधायलाच पाहिजे”अजित जरा जास्तच उत्साहित होत बोलला.

“तुमच्या सोबत मीही यायला तयार आहे तिकडे, चालेल ना?”अजित उत्सुकतेने बोलला.

प्रशांतने मानेनेच त्याला होकार दिला. अजितची उत्सुकता पाहून त्याला मनातून फार चांगले वाटले. आपल्या या शोधमीहीमेत अजून कोणीतरी सामील झाल्याचा त्याला आनंद झाला. पण पीटरबद्दल त्याला अजूनही शंका वाटत होती. तो नक्कीच काहीतरी लपवत होता.

“मग उद्याच निघुया तिकडे”अजितने बोलत पीटरकडे पाहिले. त्याचा चेहरा पडलेला होता.

“प्रॉब्लेम फक्त रस्त्याचा आहे. एक रस्ता बंद आहे. आपल्याला दुसरा रस्ता शोधावा लागेल”प्रशांत बोलला.

“पीटरला माहीत असेल ना. त्याचा तर पूर्ण शहराचा नकाशा पाठ आहे”

“ह.. हो दुसरा एक रोड आहे. सिरोहाचा.. बट थोडा लॉंग वे आहे” पीटर चाचरत बोलला. आता प्रशांतची शंका अजूनच वाढली.

“लांब असला, तरी रस्ता आहे याला महत्व आहे”विराट आळस देत बोलला. प्रवासाने त्याला थकवा जाणवत होता. अजितच्या ते लक्षात आलं.

“तुम्हाला आरामाची गरज आहे. आपण उद्या बोलू”अजित खुर्चीतून उठला.

“आपल्याला उद्या सकाळीच सिरोह्याला निघायला पाहिजे. उशीर करण्यात काही अर्थ नाही”प्रशांत बोलला. तोपर्यंत पीटर नजर चोरत वॉशरूममध्ये शिरला.

“आधी कसं जायचं ते ठरवावं लागेल.. सध्या तुम्ही आराम करा. बघू सकाळी. अजित बोलला. प्रशांत आणि विराट आपल्या रूममध्ये जायला निघाले.

सकाळच्या प्रसन्न वातावरणात प्रशांत बंगल्याच्या अंगणात निवांतपणे बसला होता. बाकीचे कोणी झोपेतून जागे झाले नसल्याने तो एकटाच आल्हाददायक वातावरणात मग्न होऊन गेला होता. डोक्यात विचारचक्र चालूच होते. पीटर आपल्यापासून काय लपवत असेल, याचे उत्तर शोधण्याचा त्याचा प्रयत्न सुरू होता. त्याला आजोबांबद्दल किंवा त्या रहस्यमय जागेबद्दल काहीतरी माहीत असावे. पण त्याला जर याची कल्पना असेल, तर तो स्पष्टपणे बोलत का नाही? त्याला कसली भीती आहे, की तो मुद्दामून लपवत आहे.

“काय दोस्त, एकटाच बसलाय?”अजितच्या आवाजाने त्याची तंद्री भंगली. अजित मोठ्या उत्साहाने येऊन त्याच्यासमोरच्या खुर्चीवर बसला.

“गुड मॉर्निंग.. अजितने प्रसन्न चेहऱ्याने त्याच्याकडे पाहिले.

“गुड मॉर्निंग”प्रशांत शक्य तितक्या प्रसन्न चेहऱ्याने बोलला.

“तुला एक विचारू?”अजित जरा गंभीर झाला. प्रशांतने नजरेने त्याला होकार दिला.

“तुला कशावरून वाटत की तुझे आजोबा जिवंत... अजितने नजर चोरली. प्रशांत मनातून संतापला.

आपण चुकीचा प्रश्न विचारलाय, याची त्याला जाणीव होती. पण सगळं जाणून घेण्याची त्याची इच्छा त्याला स्वस्थ बसू देत नव्हती.

“आहेत! मला पूर्ण विश्वास आहे”प्रशांत चिडून बोलला.

“माफ कर.. पण आता आठ वर्षे झाली आहेत.. म्हणून.. अजित खजील होत म्हणाला. थोडावेळ गंभीर शांतता.

“हा पीटर थोडा विचित्र वाटतो!” प्रशांतने मुद्दामून पीटरचा विषय काढला. पीटर जे लपवतोय त्याबद्दल अजितला काही माहिती असेल, असा त्याला अंदाज होता.

“म्हणजे?”अजितने गोंधळून विचारलं.

“तो काहीतरी लपवतोय, असं वाटतंय”

“काय लपवतोय?”

“ते तोच सांगू शकेल!”

अजित शांत झाला.

“मलाही तेच वाटतंय!” विचार करत अजित बोलला. प्रशांत चमकला.

“पीटर कधी काही लपवत नाही. पण कालपासून मलाही असं वाटतंय की तो काहीतरी लपवतोय. याआधी त्याला असा विचारात पडलेला आणि अस्वस्थ कधीही पाहिलेला नव्हता”

आपला संशय योग्य होता, याची प्रशांतला खात्री पटली. पीटर काहीतरी लपवतोय, याचा अजितलाही संशय होता.

“म्हणजे नक्कीच त्याला त्या जागेबद्दल माहीत असणार!”

“म्हणजे रहस्यमय जागा?”

“हं.. तो आधी इथे येऊन गेला आहे, तेव्हाच त्याला याबाबद्दल समजलं असणार”

“पण याआधी तो याबद्दल काहीच बोलला नाही. बोलतानाही कधी तो असं काही बोललेला आठवत नाही.

दोघे बोलत असतानाच त्यांना पीटर बंगल्यातून येताना दिसला. तसे दोघे बोलायचे थांबले.

“गुड मॉर्निंग”पीटर जवळ येत बोलला. त्याच्या चेहऱ्यावर अस्वस्थता दिसून येत होती.

“मी सिरोह्याच्या रोडबद्दल अजून इन्फो काढली आहे. तिथे जायला खूप टाइम लागेल. लवकर रेडी व्हा, लवकर निघू”पीटर बोलून लगेच मधेही निघून गेला.

त्याला पाहून दोघांना आश्चर्य वाटले. कालपर्यंत सिरोहाचे नाव काढताच गप्प बसणारा पीटर आज सिरोहाला जाण्यासाठी एवढ्या घाईत कसा? दोघांनी आश्चर्यकारक नजरेने एकमेकांकडे पाहिले.

“बहुतेक सिरोह्याला गेल्यावरच उलगडा होईल”अजित गंभीर आवाजात बोलला. त्याची उत्सुकता अजूनच वाढली. तो लगेच तयार होण्यासाठी बंगल्यामध्ये शिरला.

प्रशांत मात्र कितीतरी वेळ विचार करत बसूनच होता.

विराटची गाडी गर्द झाडीतून जाणाऱ्या रस्त्यावरून धावत होती. पाऊस चालू असल्याने पीटर ला ड्रायव्हिंग करणे थोडे कठीण वाटत होते. पण तरीही तो सावकाशपणे गाडी चालवत होता. त्याच्या शेजारी बसलेला विराटचे एका कागदावर

आखलेला नकाशा बघून रस्ता बरोबर आहे की नाही, हे वेळोवेळी सांगण्याचे काम चालले होते.

तो नकाशा पीटरने आखलेला होता. त्याला माहीत असलेला सिरोह्याला जाणारा दुसरा रस्ता गर्द झाडीतून जाणारा जरी असला, तरी सोयीस्कर आहे, असा पीटरचा अंदाज. पावसामुळे या भागात दरडी कोसळणे, रस्ता खचणे अशा घटना होत असाव्यात, असा इशारा देत प्रशांतने सर्वांना सावध केले होते. मात्र आता तरी दुसरा पर्याय नव्हता.

जवळजवळ तासभराने पीटरने गाडी एका मंदिराजवळ थांबवली.

“चला. आलं सिरोहा”पीटर गाडीतून उतरला. एका शंकराच्या मंदिराजवळ ते उभे होते. प्रशांतची नजर चहुबाजूंनी फिरू लागली. समोर त्याला एक बोर्ड दिसला. त्यावर मोठ्या अक्षरात लिहिलं होतं. - सिरोहा गाव.

या शोधमोहीमेत एक लढाई जिंकल्यासारखं त्याला वाटलं. पण अजूनही बरंच काही जिंकण्याचं बाकी होत.

“चला दर्शन घेऊन येऊ”विराट मंदिराकडे चालू लागला. त्याच्या मागोमाग अजित. पीटरचा तर देव-मंदिर याच्याशी काही संबंधच नव्हता. प्रशांत मंदिराकडे वळणार तोच त्याची नजर एके ठिकाणी खिळली. चेहऱ्यावर आश्चर्य पसरले. समोर लावलेल्या एका छोट्या लाकडी बोर्डमध्ये लावलेल्या फोटोकडे पाहत पाहत त्याच्याजवळ जाऊ लागला.

“व्हॉट हॅप्पेन प्रशांत?”पीटर गोंधळून त्याच्याकडे पाहू लागला. त्याचा आवाज ऐकून विराट आणि अजितही थांबून प्रशांतच्या दिशेने पाहू लागले.

प्रशांत त्या फोटोसमोर जाऊन स्तब्ध उभा राहीला.

बाकी तिघे गोंधळून त्याच्याजवळ आले.

त्या फोटोकडे नजर टाकताच विराट आश्चर्याने पाहत उभाच राहिला.

“सुदर्शन जोशी! म्हणजे.. म्हणजे तुझे आजोबा!” अजित त्या फोटोखालचे बारीक अक्षरातले नाव वाचून आश्चर्याने ओरडलाच.

तो आजोबांचा फोटो होता! वृद्धत्वाची लक्षणे चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. डोळ्यात तेज जरी कमी असले, तरी ओठांवर निर्मळ हास्य कायम होते. तो फोटो प्रशांतने कधी पाहिला नव्हता.

प्रशांतने अजून थोडं पुढं होत फोटोखाली दिलेला मजकूर वाचला.

' सुप्रसिद्ध लेखक श्री. सुदर्शन जोशी यांनी हे मंदिर उभारण्यासाठी दिलेल्या निधीबद्दल आम्ही सर्व भक्तजन त्यांचे मनापासून ऋणी आहोत. '

त्याखाली तारीख आणि सही होती. ' १२ - ०१ - २०१९ ' आणि आजोबांची सही!

सहा महिन्यांअधीची तारीख आणि सही! म्हणजे आजोबा इथेच असणार!

“आजोबा इथंच असतील! ही तारीख सहा महिन्याधीची आहे. आणि ही आजोबांचीच सही आहे!” प्रशांत उत्साहाने ओरडला. त्याला पहिल्यांदाच इतका उत्साही झालेला पाहून विराट आनंदला.

“येस.. म्हणजे आता ती जागाही सापडेल आणि आजोबा सुद्धा!” अजित आनंदाने बोलला. आजोबांपेक्षा त्याला त्या जागेच कुतूहल जास्त होतं.

“चला, लगेच गावात.. आपण अगदी जवळ पोहोचलो आहोत!” प्रशांत अधीरतेने बोलला. अजित आणि विराटही देवाचे

दर्शन घेण्याचा विचार सोडून समोरच्या वाटेने गावाकडे जायला निघाले.

पीटर मात्र त्या फोटोकडे बघत स्तब्ध उभा होता. चेहऱ्यावर अस्वस्थता आणि गोंधळ.

“स्टॉप.. वेट.. पीटरने अस्वस्थ आवाजाने बाकीच्यांना थांबवले. सगळे जागीच थांबले.

“आता काय पीटर? अजून काही सापडलं का?”अजित त्याच्याजवळ येत बोलला. प्रशांत गंभीर होत त्याच्याजवळ आला. पीटर काहीतरी वेगळं सांगणार, हे त्याच्या चेहऱ्यावरून प्रशांतने हेरले.

“काय झालं पीटर?”विराटही त्याच्याजवळ येऊन उभा राहिला. सगळेजण प्रश्नांकित चेहऱ्याने पीटरकडे बघत होते. पीटरने काहीश्या खजील झाल्यासारख्या नजरेने प्रशांतकडे पाहिले.

“मला याबद्दल आधी माहीत होतं!” पीटरच्या वाक्यावर विराट जाम गोंधळला. प्रशांत आणि अजितने चमकून एकमेकांकडे पाहिलं. त्यांचा अंदाज जवळजवळ खरा ठरला होता.

“म्हणजे? काय माहीत होतं?”प्रशांतने गंभीरतेने विचारलं.

“मी सगळं सांगतो, बट नॉट नाऊ. मला वाटत, की आपण पहिले चंद्रा अंकलकडे जायला हवं. तिथं सगळं समजेल!”

“कोण चंद्रा अंकल?”अजितचा प्रश्न.

“मी आता काहीही सांगणार नाही. बट, आता फक्त माझ्यासोबत चला”पीटर बोलून गावाच्या रस्त्याने चालू लागला. सगळे गोंधळ, आश्चर्य, उत्सुकता असे मिश्रित भाव घेऊन त्याच्या मागोमाग चालायला लागले.

पीटर कुठं घेऊन जातोय? त्याला काय माहीत आहे? चंद्रा अंकल कोण? यासह अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी प्रशांतच्या डोक्यात विचारचक्र फिरायला लागले. एकीकडे आपण आजोबांच्या अगदी जवळ पोहोचलो आहोत उत्सुकता त्याच्या मनात होती, तर दुसरीकडे पीटरबद्दल शंका. पीटरने हे सगळं आधी का नाही सांगितलं? इथं पोहोचल्यावरचं त्याने सगळं सांगण्याचं का ठरवलं? तो खरं बोलतोय, याचा विश्वास कसा ठेवायचा? असे कितीतरी प्रश्न प्रशांतच्या मनात एकाच वेळी येऊन आदळत होते. पण या सर्वांची उत्तरे त्याला गावात गेल्यावरचं मिळणार होती.

# मुद्राध्यास – भाग ३

# रहस्यांचा उलगडा

---------------------------------------

मंदिरापासून थोडं पुढं येताच पीटरच्या म्हणण्यानुसार गावातील विचित्रपणा सर्वांना जाणवायला लागला.

गावातील दिसेल त्या घराला कुलूप! घरेही जरा विचित्र आणि वेड्यावाकड्या आकारांची.

चालता चालता अजितने किती तरी प्रश्न विचारून पीटर कडून सगळं जाणण्याचा प्रयत्न केला होता. पण नंतर सगळं समजेल, या व्यतिरिक्त तो काही बोलला नाही.

शेवटी एका पद्धतशीर वाटणाऱ्या घराजवळ येऊन पीटर थांबला. सगळ्यांनी एकाच वेळी त्या घराकडे पाहिले.

निळ्या रंगाने भरलेल्या भिंती डोळ्याला भडक वाटत होत्या. एक छोटासा दरवाजा आत जाण्यासाठी उघडा होता. बाजूची खिडकी पूर्ण बंद.

पीटरने मागे वळून सगळ्यांकडे पाहिले.

“दॅट इस हाऊस ऑफ चंद्रा! तोच फेक कोईन्स सोल्ड करणारा”

सगळे जण त्या घराकडे बघत होते. प्रशांतची नजर मात्र होती फक्त पीटरकडे. तोच आता त्याच्या शोधमोहिमेचा मोठा साथीदार होता.

पीटरने आपली पावले दरवाज्याकडे वळवली. दाराजवळ जाताच तो थांबला.

“चंद्रा अंकलss.. चंद्रा अंकलss.. मी पीटर. पीटरने बाहेरूनच हाका मारल्या. काहीवेळाने एक वयस्कर माणूस भिंतीचा आधार घेत दारात येऊन उभा राहिला. तेच चंद्रकांत काका होते. त्यांनी आपल्या कमजोर दृष्टीने बराच वेळ पीटरचे निरीक्षण केले.

“कोण?”आपल्या थकलेल्या आवाजात त्याने प्रश्न केला.

“अंकल.. मी पीटर..

आता चंद्रकांत काकांना काहीतरी आठवायला लागले.

“पी.. पीटर.. तू आला पोरा!” चंद्रकांत काकांचा गंभीर, थकलेला चेहरा हळूहळू आनंदाने भरून गेला.

“येस अंकल. आणि आज एका स्पेशल माणसालाही घेऊन आलोय”पीटर एकदा प्रशांतकडे आणि मग चंद्रकांतकडे पाहून बोलला.

“ये रे पोरा ये.. चंद्रकांत काकांनी मोठ्या आपुलकीने त्यांना आत घेतले.

मध्ये शिरताच अगरबत्तीचा सुगंध सगळयांच्या नाकात शिरला. दरवाज्याच्या उजव्या हाताला एक पलंग. आणि त्याशेजारच्या भिंतीवर कितीतरी देवदेवतांचे फोटो. चंद्रकांतच्या अपार भक्तीचा तो नमुना.

“बसा.. आनंदलेल्या आवाजात सगळयांना बसण्यास सांगून ते मध्ये निघून गेला.

सगळे पलंगावर बसले. विराटची नजर कुतुहलाने खोलीवरून फिरत होती. गावाकडील घर तो पहिल्यांदाच बघत होता.

अजित आणि प्रशांत दोघेही पीटर काहीतरी बोलेल, या आशेने त्याच्याकडे नजर लावून होते. पीटरची अस्वस्थता अजून वाढली असल्याचे त्याच्या हवभावावरून दोघांना लक्षात आले.

प्रशांतचे मन मात्र हैराण होत चालले होते. आजोबा, पीटर आणि चंद्रकांत काका यांचा काय संबंध असेल, याचा त्याला

काही मेळ लागणे शक्य होत नव्हते. जे काही असेल, ते फक्त पीटरच सांगू शकत होता.

पीटरने याआधी काही सांगितले नसले, तरी तोच आजोबांना शोधण्यासाठी महत्वाचा दुवा होता.

पीटर आणि अजित गावात अचानकपणे भेटणं, ही नक्कीच नशीबाची खेळी असणार, यासाठी प्रशांतने मनोमन देवाचे आभार मानले.

काही वेळाने चंद्रकांत काका हातात एका ताटात पाच चहाचे कप घेऊन आले. ते ताट त्यांनी खाली जमिनीवर मांडले. आणि स्वतः चौघांकडे तोंड करून खाली बसले. पीटरची अस्वस्थ आणि खाली शून्यात लागलेली नजर पाहून काहीतरी गोंधळ आहे, हे त्यांनी ओळखले.

“कायतरी गडबड हाय वाटतं.. हे कोण?”चंद्रकांत काकांनी सगळ्यांचे चेहरे निरखून पाहिले.

पीटरची मान हळूच वर झाली.

“हा प्रशांत.. सुदर्शन काकांचा ग्रँड सन.. पीटर शेजारी बसलेल्या प्रशांतकडे हात करून बोलला.

चंद्रकांत काका चमकले. गोंधळून त्याने प्रशांतकडे पाहिले. आश्चर्य आणि आनंद अश्या दोन्ही भावना त्यांच्या चेहऱ्यावर उमटल्या.

पीटरने सुदर्शन काका असा उल्लेख केल्याने प्रशांतही चमकला. मघाशी बोर्ड वर पाहिले म्हणून त्याने आजोबांचे नाव उच्चारले की त्याला आधीच माहीत होते?

"सुदर्शन काकांचा कोण?"इंग्रजीतून अर्थ न कळाल्याने

चंद्रकांत काकांनी विचारलं. पण प्रशांत नक्कीच त्यांचा कोणीतरी नातेवाईक आहे, हे मात्र त्यांना समजले.

"नातू"विराट उत्तरला.

"काय? सुदर्शनचा नातू!" त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहू लागला. हळूच डोळ्यातून पाणी टपकले.

"हो मी त्यांचा नातू.. आपण त्यांना ओखळता? आपल्याला माहीत आहे ते कुठे आहेत?"प्रशांतच्या बोलण्यावर चंद्रकांत काकांच्या चेहऱ्यावर गंभीर भाव पसरले. डोळ्यातील पाणी गलांवरून ओघळायला लागले.

"तुला.. माहीत नाही.. ते कुठे आहेत?"काकांचा थरथरता आवाज.

“आम्ही त्यांनाच शोधायला इकडे आलोय.. पण बहुतेक पीटरला सगळं माहीत असेल, असं दिसतंय!” अजितने बोलताना पीटरकडे पाहिले. पीटर अजून अवस्थ झाला.

“म्हणजे? शोधायला म्हणजे?”काकांनी गोंधळून विचारलं.

“सगळी समजेल! बट, सध्या तुम्ही जरा फ्रेश व्हा.. रात्री बोलू.. पीटर एवढं बोलून उभा राहिला. ताटातील चहाचा एक कप उचलून आतल्या खोलीत निघून गेला.

प्रशांत गच्चीवर एकटाच तुटक्या खुर्चीत बसून होता. मनात पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा त्याचा प्रयत्न सुरूच होता. हातातील पुस्तकांवरून खाली ओघळणाऱ्या पाण्याच्या थेंबांकडे त्याचे लक्ष नव्हते.

मागून अजित येताच त्याची नजर पहिले पुस्तकावर गेली. सोबत विराटही होता. अजितने प्रशांतजवळ जात त्याच्या हातातून पुस्तक उचलले. प्रशांतची तंद्री भंगली. त्याने दचकून विराटकडे पाहिले.

“आठवणीतला स्वर्गीय प्रवास! वा! काय टायटल आहे पुस्तकाचं!” अजित पुस्तकावरील पाणी साफ करत उद्गारला.

“तुझे आजोबा खरंच बेस्ट रायटर असतील.. खरंच लवकर भेटावं लागेल त्यांना. अजितने बोलून ते पुस्तक विराट जवळ सोपवले.

“पीटर?”प्रशांतने बारीक आवाजात विचारलं.

“चंद्राकाकांसोबत काहीतरी महत्वाचं बोलतोय, असं सांगून आम्हाला वर पाठवलं”

“सगळया रहस्यची उत्तर द्यायची म्हणल्यावर मनाची तयारी करत असणार. विराट बोलला.

“मीही मनाची तयारी करतोय!” प्रशांत खुर्चीतून उठून कठड्याजवळ जाऊन उभा राहीला.

“कसली?”विराटने त्याच्याजवळ जात विचारलं.

“आजोबांना भेटायची!... ते मला ओळखतील का हा मोठा प्रश्न आहे!”

अजितने जवळ जात त्याच्या गळयात हात टाकला.

“यार.. तू विचार खूप करतो.. कसं नाही ओळखणार?”

“आणि जर आजोबा आता त्या रहस्यमय जागी नसले तर?”विराटचा सहज पण विचार करण्यासारखा प्रश्न येताच प्रशांतचा चेहरा उतरला. त्याने याबद्दल विचार केला नव्हता. जर आजोबा तिथे नसून दुसरीकडे कुठे गेले असतील तर!

“मला तुम्हा दोघांच्या ह्याच गोष्टी आवडत नाही! एक प्रमाणापेक्षा जास्त विचार करतो, तर दुसरा सारखे प्रश्न..” अजित गमतीने म्हणाला. तो काही गंभीर दिसत नव्हता. त्याचा स्वभावच तो.

नंतर दोघांकडे बघून तोही गंभीर झाला.

“खरंच तुझे आजोबा तिथं नसतील तर?”अजित विचारात पडला.

“जर पीटरला त्या रहस्यमय जागेबद्दल माहीत असेल, तर या प्रश्नाचे उत्तरही तोच देऊ शकतो!” प्रशांतच्या उत्तराने अजितचे तात्पुरते समाधान झाले.

“बर.. या पुस्तकात काय आहे?”अजितची नजर विराटच्या हातातील पुस्तकावर पडली.

“आजोबांनी काही वर्षांआधी केलेल्या प्रवासाचे वर्णन. यातच रहस्यमय जागेचा उल्लेख आहे. विराटने सांगितलं. रहस्यमय जागेचा उल्लेख आहे म्हणताच अजित उत्सुक व्हायला लागला.

“दाखव.. काय लिहिलं आहे?”अजितने विराटकडून पुस्तक हातात घेतले. पाने चाळताना ' रहस्यमय जागा - एक अद्भुत स्वर्ग'

हे शीर्षक दिसताच तो थांबला. वाचताना त्याच्या चेहऱ्यावर उमटणारे भाव विराट निरखून बघत होता.

“स्वर्ग!” अजित पुटपुटला. पुस्तक बंद करत आश्चर्याने त्याने विराटकडे पाहिले. तेवढ्यात त्याचा खिशातील फोन वाजला. पीटरचा कॉल होता. त्याने खाली बोलवले होते. सर्व रहस्यांचा उलगडा होण्याची वेळ आता आली होती.

विराटने विश्वासाने प्रशांतच्या खांद्यावर हात ठेवला.

“चल.. आता आजोबा आपल्यापासून जास्त दूर नसणार. विराट बोलला. प्रशांतने विश्वासाने पाहिले. खरंच आजोबा आत जास्त दूर नसणार याची त्याला खात्री होती.

आतल्या खोलीत सगळीकडे पिवळा प्रकाश पसरला होता. वातावरण गंभीर होते. पीटर आणि चंद्राकाका जमिनीवर बसून बोलण्यासाठी मनाची तयारी करत होते. तर अजित, प्रशांत आणि विराट त्याच्यासमोरच्या पलंगावर बसून त्यांच्या बोलण्याच्या प्रतीक्षेत होते.

“सांग पोरा, आता सगळं सांगायलाच पाहिजे”चंद्राकाका गंभीर आवाजात बोलले. पीटरने हळूच आपली खाली असलेली मान वर करून प्रशांतकडे पाहिले. मनाची तयारी करून त्याने बोलायला सुरुवात केली.

“मी तुझ्या ग्रँडपा ना भेटलो आहे!” पीटरची नजर शून्यात गेली.

“कुठे?”प्रशांतचा आवाज थंड होता. पण उत्सुकता वाढली होती.

“सगळं स्टारटिंग पासून सांगतो.. जे काही मी एक्सपिरिएंस केलंय, जे मी पाहिलयं, ते सगळं!”

पीटर सावरून बसला. बाकी सगळे उत्सुकतेने कान टवकारून ऐकू लागले.

“मागच्या इयरला मी गावात आलो तेव्हा मला चंद्रा अंकल भेटले. शूटिंगसाठी काही इन्फो घ्यायला मी आमच्या टीमबरोबर अंकलला भेटलो. देन, आम्हाला समजलं की चंद्रा अंकल स्टील युज करून फेक कोईन्स बनवतात. मग आमच्या टीम मधील काहींनी फक्त कलेक्शन म्हणून फेक कोईन्स बनवून घेण्याचं ठरवलं. त्यांनतर शूटिंग कम्प्लिट करून आम्ही कोईन्स घेण्यासाठी आलो, तेव्हा तुझ्या आजोबांशी ओळख झाली. आणि मग त्या

प्लेसबद्दलही समजलं”पीटर बोलायचा थांबला. प्रशांतला मनातून आधी काही सांगितलं नाही म्हणून पीटरचा राग येत होता, पण त्याची नक्कीच काहीतरी मजबुरी असणार, अशी समजूत त्याच्या मनाने काढली. आता चंद्राकाकांनी बोलायला सुरुवात केली.

“मी सुदर्शनला कित्येक वर्षांपासून ओळखतो. त्या रहस्यमय जागेबद्दल मीही बरंच ऐकलं आहे, पण ती कुठे आहे, हे सुदर्शन आणि पीटरशिवाय कोणाला माहीत नव्हते, आता पीटरने सगळं सांगितलंय मला!”

“पीटर, कुठं आहे ती जागा?”प्रशांतचा त्या जागेबद्दल धीर सुटत चालला होता.

“उद्या जाऊ तिकडे! आता सांगण्यात काही अर्थ नाही. पीटर बोलला.

“का? आता का नाही? सांग लवकर!” अजित उत्सुकतेने बोलला. तो सोडून सगळे गंभीर होते. चंद्राकाकांना काही माहीत नाही, हे प्रशांतला जरा विचित्र वाटले.

“तुझे ग्रँडपा मला भेटले, तेव्हाच त्यांच्याबद्दल रिस्पेक्ट वाटायला लागली होती. इतक्या प्रेमाने त्यांचं बोलणं.. हि रिअली लवली पर्सन. पहिल्या भेटीत ते कोणी मोठे लेखक असतील, असं वाटलंच नाही!” पीटरला आजोबांच्या आठवणीने भरून आले.

आजोबांच्या प्रेमळ स्वभावाची प्रचिती यावरूनच येत होती. प्रशांतही जरा अस्वस्थ झाला.

“भेटलो त्याच दिवशी त्यांनी जसं मला आपला ग्रँड सन मानला होता. त्यांनी ज्या प्रेमाने डोक्यावरून हात फिरवला, तसा माझ्या डॅडींनीही कधी फिरवलेला आठवत नाही!” पीटरने हाताने पाणावलेले डोळे पुसले. तीच स्थिती प्रशांतची होती. चंद्राकाका पाठीवरून मायेने हात फिरवत त्याला शांत करू लागले.

“खरंच लय चांगल्या मनाचा आहे तो.. तरी पण न सांगता गायब झाला”चंद्राकाका दुःखी झाले.

काहीवेळ शांतता पसरली. पीटर शांत होत पुन्हा बोलायला लागला.

“त्या रात्री आजोबा आणि मी चंद्रा अंकलच्या घरी थांबलो होतो. माझे बाकीचे फ्रेंड्स कामामुळं निघून गेले होते. मी सुद्धा जाणार होतो, बट.. ग्रँडपांच्या प्रेमाने मला जाऊ दिलं नाही. त्यांनी मला थांबवून घेतलं”डोळे पुसत पीटर ने घसा खाकरला. मन भरून आल्याने त्याला बोलत येईना. काकांनी उठून त्याला पाणी आणून दिले. पाणी पिऊन पीटर जरा शांत झाला.

“त्यांनी मला सगळ्या लाईफबद्दल सांगितले. घर सोडण्याचं कारण, प्रशांतबद्दल आणि त्या जागेबद्दल!.. चंद्रा अंकलना

त्याबद्दल काहीच माहीत नव्हतं.. ना त्यांच्या बाकीच्या फ्रेंड्सना. हे सगळं सांगण्याच्या बदल्यात त्यांनी माझ्याकडून एक प्रॉमिस घेतलं. त्यांच्या आणि त्या जागेबद्दल कोणाला काहीही न सांगण्याचं.. पीटरने प्रशांतकडे पाहिले. त्याच्या डोळ्यातील पाणी गालांवरून ओघळत होते.

“प्रशांत, आय एम सॉरी! ग्रँडपांनी दिलेल्या प्रॉमिसमुळं मी तुला काही सांगितलं नाही”पीटरने त्याची माफी मागितली. आवंढा गिळत प्रशांत बोलला,

“तू काही सांगितलं नाही याच्या दुखापेक्षा तू आजोबांचं वचन पाळलं, याचा आनंद मला जास्त आहे!” प्रशांतच्या मनात पीटरबद्दलचा राग निवळला होता. आता त्याला त्याच्याबद्दल विश्वास आणि आजोबांचं वचन पाळल्याबद्दल त्याचं कौतुक वाटत होतं.

“त्याच्या दुसऱ्या दिवशी ग्रँडपा मला त्या जागी घेऊन गेले. एक दिवस तेथे थांबून त्या जागेत काय आहे, सगळं पाहिलं, एक्सपिरिएंस केलं. दॅट रिअली अ हेवन!” पीटरच्या बोलण्याने बराच वेळ शांत असणारा अजित पुन्हा उत्सुक झाला.

“काय आहे तिथे?”अजित जे विचारणार, तेच विराटने विचारलं.

"उद्या सगळं समजेल!" पीटर जास्त काही सांगणार नव्हता.

"आजोबा तिथेच आहेत?"प्रशांतने जड आवाजात विचारलं.

"असायला पाहिजे!" पीटर बारीक आवाजात बोलला. प्रशांतच्या मनावर मात्र त्याचा आघात मोठा झाला.

"म्हणजे? तुला काय म्हणायचंय?" प्रशांतने कळकळून विचारलं.

"मी त्यांना भेटून वन इयर झालयं आणि त्यांचं एज जास्त..."

पीटरच्या म्हणण्याचा रोख प्रशांतला समजला, तसा तो संतापला. मात्र संयम राखत त्याने आपला राग आवरला.

"नकारात्मक विचार करू नको रं पोरा. सुदर्शनला काय बी होणार नाय." काकांनाही पीटरचं बोलणं आवडलं नाही.

"ग्रँडपा तिथेच असतील. रहस्यमय जागेवर!.. जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत इथेच राहणार, असं ते म्हणाले होते. ते तिथून दुसरीकडे जाणार नाहीत"पीटरने प्रशांतकडे पाहिले.

"त्यांची एक इच्छाही त्यांनी बोलून दाखवली होती. त्यांची शेवटची विश!... आपल्या ग्रँड सनला.. म्हणजेच प्रशांतला भेटण्याची!"

प्रशांतला गहिवरून आले. त्याची आसवे जणू आजोबांवरचे त्याचे प्रेम दर्शवत होती.

“आजोबांची इच्छा उद्या पूर्ण होईल. जवळजवळ सर्वांचीच इच्छा. अजित बोलला. त्याचं बोलणं बरोबर होतं. प्रत्येकाची एक तरी इच्छा होतीच. आजोबांना प्रशांतला भेटायची. प्रशांतला आजोबांना भेटायची. चंद्राकाकांनाही आपल्या जुन्या मित्राला भेटण्याची इच्छा होती, तर दुसरीकडे विराट प्रशांतच्या आनंदात समाधानी, आणि अजित रहस्यमय जागा बघण्यासाठी उत्सुक.

चंद्राकाका प्रशांतच्या जवळ येऊन बसले. त्यांनी मायेने त्याच्या पाठीवर हात ठेवला. त्यांच्या स्पर्शाने प्रशांत जरा शांत झाला. पुन्हा एकदा शांतता पसरली.

“ग्रँडपा एक बुकही लिहीणार होते, त्यांच्या लाईफ वर. होप, ते कम्प्लिट झालं असेल. त्यांना विश्वास होता, हे बुक त्यांच्या इतर सगळ्या बुकपेक्षा खूप वेगळं असेल”पीटर बोलला.

“तुम्ही बनावट नाणी का बनवता, काका? आजोबांनी का बनवून घेतले?”प्रशांतने विषय बदलत प्रश्न केला. आता काका जरा अस्वस्थ झाले. हताश झाल्यासारखं त्यांनी दोन्ही हात खाली टेकले. मान खाली गेली.

“मी जे काही केलं, ते सगळं चुकीचं केलं!” उदास आवाजात काका बोलले.

“मी अंकलना बोललो होतो, हे बंद करायला पाहिजे. पण काकांनी ते ऐकलं नाही. नाहीतर आज ही सिच्युएशन आली नसती”पीटर खिन्न आवाजात बोलला. बाकीच्या कोणाला काही कळत नव्हते.

“काय झालं? कोणती वेळ आली नसती?”अजितचा प्रश्न. त्याला आता काकांबद्दल जाणून घ्यायची उत्सुकता वाटत होती.

“या धंद्यामुळं माझी पार वाट लागलीयं!.. एखाद्या गोष्टीची लालच फार धोकादायक असती रं पोरांनो.. काकांना कोणत्यातरी गोष्टीचा पश्चताप असल्याचे बोलण्यातून जाणवत होते. मनाची तयारी करून काकांनी सांगायला सुरुवात केली.

“वीस वर्षांआधी मी हा धंदा चालू केला होता. एका मित्राच्या कल्पनेवरून. तो मित्र कोण्या एका गावात गेला होता, तिथं माझ्यासारखाच एक जण बनावट नाणी बनवायचा. माझ्या मित्राने गोड बोलून कसं बनवायचं, काय ती सगळी माहिती काढली. त्याला माहित होतं, मला सांगितलं तर मी हा उद्योग चालू केल्याशिवाय शांत बसलो नसतो. इकडं आल्यावर त्यांनी माझे कान भरले. फायदा पाहून मी काही दिवसांतच कामाला लागलो. स्टीलपासून सर्व प्रकारची नाणी बनवायचो. काही जुन्या काळात असणाऱ्या बनावट मुद्राही मी बनवायला लागलो. आणि त्या सर्व

विकायचो. पहिले फक्त गावात, मग मात्र पूर्ण शहरातून लोकं येऊ लागली. मीही बनावट पैशांच्या बदल्यात मोक्कार पैसा मिळतोय, हे पाहून काम थांबवलं नाही. गावातील राजकीय पुढारी माझ्या पाठीशी असल्याने पोलीसांचही काही भय नव्हतं. त्यांच्याच सहकार्याने हा प्रकार शहराच्या बाहेर गेला नाही. मी लोभी मनाने धंदा चालूच ठेवला. दिवसोंदिवस पैसा वाढत होता. अनेकांशी गैरव्यवहार करून कुठं कुठं जमिनी विकत घेऊन ठेवल्या. भविष्याचा विचार करून. पण माणूस कधीकधी भविष्याचा विचार करता करता वर्तमान परिस्थितीकडे दुर्लक्ष करतो. माझंही तेच झालं. शेवटी शहरातील पोलीसांनी अटक केली. ज्या पुढाऱ्यांनी बनावट नाणी वापरून स्वतःची घरं भरली, त्यांनी माझी पाठ सोडली. जवजवळ दोन वर्षे जेलमध्ये घातली. परत आलो तर, बायको पोरांना घेऊन सोडून गेलेली. आपण अडकले जाऊ, या विचाराने जवळजवळ सगळी लोकं गाव सोडून पळून गेली. उरलो मी एकटा!"

काका बोलायचे थांबले.

सगळे सुन्न होऊन त्यांची कहाणी ऐकत होते. आता काकांची परिस्थिती पाहून त्यांनी सांगितलेल्या गोष्टी खऱ्या असतील, याचा विराटला थोडा संशय वाटत होता.

काकांनी इतका पैसा कमावला असेल, तरी त्यांच्या राहणीमानातून तसं जाणवत नव्हतं.

“सुदर्शन फिरत फिरत या गावात आला होता. मात्र त्याला माझ्या धंद्याबद्दल काही माहीत नव्हते. पण जेव्हा माझ्याबद्दल समजलं, तेव्हा तो माझ्याकडे आला. पहिल्याच भेटीत मला त्याने मित्र म्हणून मान्य केलं. नंतर समजलं की, त्याला नाणी सांभाळून ठेवण्याचा छंद होता. बोलता बोलता माझ्या धंद्याबद्दल सगळं त्याला माहीत झालं. आणि त्याने माझ्याकडं एक मागणी केली. त्याच्या नावाची बनावट नाणी बनवण्याची. एक संग्रह म्हणून. पण माझ्या किंवा इतरांसारखा त्याला लोभ नव्हता.

तो नाणी घ्यायला परत आला, तेव्हा भलत्याच आनंदात होता. म्हणाला, मला स्वर्ग सापडलं. मी मात्र त्याच्या बोलण्याकडे जास्त लक्ष दिलं नाही. जाताना मात्र त्याच्या नावाचं एक बनावट नाणं आणि लवकर परत भेटण्याचं वचन देऊन गेला. पण ते पूर्ण केलं नाही त्याने. त्याला जाताना एक सोन्याची मुद्राही दिली. आठवण म्हणून.. काकांच्या डोळ्यात पाणी साचून आले.

प्रशांतला जवजवळ सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली होती. आता फक्त आजोबांची भेट आणि रहस्यमय जागेचं गूढ सुटणं बाकी होतं.

“पीटर, त्या रहस्यमय जागेबद्दल सांग. स्वर्गासारखं काय आहे तिथे?”अजितचा उत्सुकतापूर्ण प्रश्न. त्याची उत्कंठा वाढतच चालली होती. पीटर मात्र काही बोलला नाही.

“पीटर, आता फक्त तूच मला आजोबांपर्यंत घेऊन जाऊ शकतो. फक्त तुझ्यामुळ मी आजोबांना भेटू शकेन”प्रशांत आभार मानत बोलला.

“खरंतर हे लक आहे. तू असा अचानक व्हीलेजमध्ये भेटणं हे खरच लकची गोष्ट आहे.

“ही देवाची किमया आहे पोरांनो.. नशीब त्योच लिहितो. काकांनी देवाचे आभार मानले.

“आता फक्त एक करा. सुदर्शनला माझ्याकडं घेऊन या.. डोळे तरसतायत आता त्याला बघायला. काका विनवणीच्या सुरात म्हणाले.

“तुम्ही नाही येणार?”विराटने विचारलं.

“शरीर साथ देत असतं, तर पळत आलो असतो पोरा.. पण आता माझ्यात तेवढी ताकद नाही”काकांनी आपलं दुःख मांडलं.

“मी नक्की आजोबांना इथे घेऊन येईल”प्रशांतने काकांचा हात हातात घेतला. काकांनी विश्वासाने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला.

“उद्या मॉर्निंगलाच निघूया. सोबत काय घायचं ते नंतर सांगतो”पीटर उठून उभा राहिला.

“उद्या तुझी इच्छा पूर्ण होईल प्रशांत”पीटरने विश्वासाने प्रशांतकडे पाहिले.

“उद्या आपला शोध पूर्ण होईल. विराट विश्वासाने बोलला.

“त्या रहस्यमय जागेबद्दल उत्सुकता वाढत आहे.. कधी सकाळ होईल असं झालयं मला”अजित म्हणाला.

“तयारी करायला लागा. उद्या मॉर्निंगला लवकर निघुया. पीटर सगळयांकडे बघून बोलत खोलीतून बाहेर पडला. बाकीचे सगळेही तयारीला लागले.

“जा पोरा. आता आजची रात्र फक्त आजोबांच्या आठवणीत काढ. जा”काकांनी प्रेमाने त्याच्या चेहऱ्यावरून हात फिरवला. प्रशांत उठून तयारीला लागला.

काकांनी बनवलेल कच्च-पक्क जेवण जेऊन सगळे अंथरुणात पडले होते. एका खोलीत प्रशांत, विराट आजी अजित तर हॉलमध्ये पीटर आणि चंद्राकाका. यातून पीटर आणि प्रशांत यांना प्रयत्न करुनही झोप लागत नव्हती.

पीटरच्या मनात त्या जागेवर जाण्यासाठीचा प्लॅन घुसळत होता. त्यानी आजोबांना दिलेलं वचन काही वेळापूरतं पाळलं होत, पण ते तोडून तो बाकीच्यांना आजोबांकडे घेऊन जाणार होता”या जागेवर विश्वास नसलेल्या कोणालाही घेऊन येऊ नको” हे आजोबांचे शब्द पीटरला आठवले.

विश्वास नसलेल्या म्हणजे? - पीटरच्या मनात प्रश्न आला.

प्रशांत आणि विराटवर आपला विश्वास आहे. त्यामुळे आजोबांचे वचन तसे तुटणार नव्हते. आणि यामुळे आजोबा नाराज होण्याचा प्रश्नच नव्हता.

आजोबांबरोबरची पहिली भेट आठवली, तेव्हा पीटर झोपी गेला.

इकडे प्रशांत लॅपटॉपवर वॉलपेपर न्याहाळत होता. मधेच विराटला जाग आली. प्रशांतला जागा असलेला, तेही असा वालपेपर बघत बसलेला पाहून तोही उठून बसला. बाजूला अजित गाढ झोपलेला होता.

“झोपला नाही?”विराटचा आवाज ऐकून प्रशांत दचकलाच. त्याचे विराटकडे लक्ष नव्हते. प्रशांतने लॅपटॉप बंद केला. विराटकडे बघत गच्चीवर चालण्याची खुण केली. दोघे उठून गच्चीवर आले.

पावसाच्या हलक्या सरी सुरू होत्या. हवेत गारवा होता. वर काळया आभाळाने चांदणे झाकून गेलेले.

प्रशांत कठड्याजवळ जाऊन उभा राहिला. विराट त्याच्याजवळ येऊन उभा राहिला.

“आजोबांना कसं तोंड दाखवू मी?”प्रशांतचा खिन्न आवाजातला प्रश्न ऐकून विराट गोंधळला.

“म्हणजे?”

“माझ्या मम्मी पप्पांनी जे त्यांच्यासोबत केलंय.. ते माहीत झाल्यापासून मला अपराध्यासारखं वाटतंय”प्रशांत दुःखी होत म्हणाला.

“त्यात तुझी काय चूक? तू नको ते विचार करू नको”

“मी मम्मी पप्पांच्या बाजूने त्यांची माफी मागितली तर ते माफ करतील?”प्रशांत खिन्न मनाने बोलला.

“तुझ्याकडे बघून तरी करतील”विराट त्याला दिलासा देण्याचा प्रयत्न करत होता.

प्रशांतच्या मनात मात्र नको ते विचार चालूच होते.

“तुला चंद्राकाकांबद्दल खरं वाटत?”विराटने मुद्दामून विषय बदलत प्रश्न विचारला. प्रशांतला नको त्या विचारांतून बाहेर काढण्याचा त्याचा हा प्रयत्न.

“मला तर संशय येतोय त्यांच्या बोलण्यावर!” विराट बोलला. प्रशांतने विराटकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिलं.

“नाही.. जर त्यांनी एवढा पैसा कमावला असेल, तर मग ते अजूनही असे का राहतात. त्यांनी तर कुठे जमीनही घेतली आहे. मग तिकडे का गेले नसतील?”विराटने शंका उपस्थित केली. आता प्रशांत विचारात पडला.

“कदाचित त्यांचा धंदा पकडला गेला, म्हणून त्यांनी गाव सोडले नसेल”प्रशांतने तर्क केला. पण तो विराटला पटला नाही. प्रशांत या प्रश्नावर विचारात पडला. मघाचा विषय त्याच्या डोक्यातून गायब झाला. विराटचा प्रयत्न यशस्वी ठरला.

प्रशांतच्या मनात मात्र वेगवेगळ्या शंका घर करू लागल्या. विराटचा प्रश्न बरोबर आहे, काका अजून इतक्या साधेपणाने का राहत असतील? ते गाव सोडून का नसतील गेले? त्याला तर आता पीटर आणि चंद्राकाकांवर संशय येऊ लागला. ते दोघे खोटं तर बोलत नसतील?

“मघाशी अजित आणि आपण दोघे वर होतो, तेव्हा काका आणि पीटर काय बोलले असतील? काहीतरी लपवत तर नाहीत ते?”विराटच्या प्रश्नाने प्रशांतचा संशय अधिकच बळावू लागला.

“विचार करण्यासारखी गोष्ट आहे!.. तुला काय वाटत?”प्रशांतने गंभीर होत विराटला विचारलं.

“मला तर काकांवर थोडा संशय आहे. विराट बोलला.

“पण ते काय लपवतील? सगळं तर त्यांनी सांगितलं आहे आपल्याला. प्रशांत स्वतःच्या मनातील संशय खोडण्याचा प्रयत्न करत होता. कारण त्याला काकांवर विश्वास वाटत होता. पीटरवर मात्र त्याला शंका होतीच.

“ते पण आहे. पण तरीही शक्यता नाकारता येत नाही” विराटला काकांवर संशय होता. पण उगाच संशय घेऊन उपयोग नाही, हे त्याला समजत होते.

थोडावेळ दोघ आपापल्या विचारात पडले.

“चल, झोपायला पाहिजे आता. एकतर जमिनीवर झोप लागत नाहीये मला.. विराट आळस देत बोलला.

“तू जा. मी येईल नंतर.. प्रशांत वर आकाशाकडे पाहून बोलला. अजून एक आळस देत विराट खाली गेला.

प्रशांतची आभाळाकडे असलेली स्थिर नजर काळयाकुट्ट आभाळात दिसणाऱ्या चांदण्यांवर खिळली होती.

सकाळी पीटरची हाक ऐकताच प्रशांत जागा झाला. डोळे चोळत उठून बसला. रात्री त्याला उशिरा कधी झोप लागली त्याला कळलेच नव्हते.

आज आजोबांची भेट होणार, या विचाराने त्याच्या शरीरातून एक वेगळीच ऊर्जा संचारली. लगेच उठून तयारीला लागणार तोच त्याला रात्री पडलेलं स्वप्न आठवताच त्याच्या काळजात धस्स झालं. सगळी ऊर्जा क्षणार्धात गायब झाली. त्याच्यासाठी ते स्वप्न एखाद्या भयानक राक्षसासारखे होते.

“आवरून घे प्रशांत. उशीर होईल”विराटचा आवाज कानावर पडला. वाईट स्वप्न मनातून काढण्याचा प्रयत्न करत तो उठून तयारीला लागला.

आवरून झाल्यावर प्रशांत गच्चीवर आला. रात्रभर असलेला पाऊस थांबला होता. हळूहळू उजडायला सुरुवात झाली होती. गार हवा स्पर्श करताच प्रशांतने आपले दोन्ही हात जॅकेटच्या खिशात घातले.

हळूच तुटक्या खुर्चीवर बसला. खिशातून आजोबांनी दिलेली मुद्रा बाहेर काढली.आजोबांची प्रसन्न मुद्रा त्या नाण्यावर कोरली गेल्याचा त्याला भास झाला. तितक्यात त्याला रात्रीचं स्वप्न

आठवलं. एखाद्या वाईट आठवणीप्रमाणे ते त्याच्या डोळ्यासमोरून तरळू लागले.

“आजोबाss आजोबाss.. थांबाss” प्रशांत शक्य तितक्या जोराने ओरडत पुढं जाण्याचा प्रयत्न करत होता. पण एखाद्या जाड दोराने ओढावं, तसं त्याला एक धिप्पाड माणूस मागं ओढत होता. त्याच्या समोर आजोबा त्याच्याकडे बघत एक एक पाऊल मागे टाकत उलटे चालत होते. मागे दरी आहे याचं त्यांना भान असूनही हसतमुखाने तिच्या दिशेने एक एक पाऊल मागे चालत होते.

बाजूला चार जणांचे विकट आणि क्रूर हास्य एकमेकांत घुसळून त्याच्या कानात घुमत होते. दरीच्या कठड्याजवळ जातच आजोबा थांबले. त्यांच्या चेहऱ्यावरचे स्मित अजून खुलले. प्रशांतने अजून जोरजोरात ओरडत त्या चार जणांकडे पाहिले. त्यांचे चेहरे एखाद्या राक्षसाप्रमाणे भासत होते. त्यांना बघून प्रशांत चिडला. घाबरला. पुन्हा आजोबांकडे पाहत तो ओरडला. आजोबांनी त्याच्याकडे बघत ' मी आहे ' अशी खुण केली. आणि अजून एक पाऊल मागे टाकलं, तसा प्रशांत जीवाच्या आकांताने ओरडला... आजोबाss...!”

स्वप्न आठवून प्रशांतचे हात थरथरायला लागले. डोळ्यात नकळत पाणी आले.

इतकं भयानक स्वप्न! आजोबा दरीत असं...! मला पकडणारा कोण होता? ते चार जण कोण? ते इतक्या क्रूरपणे का हसत होते? या स्वप्नाचा नेमका अर्थ काय?

अजितची हाक कानावर पडली तेव्हा तो विचारांतून बाहेर आला. थरथरत्या हाताने त्याने नाणं जॅकेटमध्ये टाकलं. आणि खाली आला.

खाली सगळे जण त्याचीच वाट पाहत होते. काकांनाही तयार झालेलं पाहून प्रशांत चमकला.

“काका तुम्ही पण येताय?”प्रशांतनी विचारलं. काकांनी त्याच्याकडे पाहिलं.

“सुदर्शनच्या भेटीची ओढ मला इथं थांबून देणार नाही पोरा!” काका दुःखी स्वरात बोलले. प्रशांतला मात्र काहीतरी गडबड असल्यासारखं वाटायला लागलं. कालपर्यंत तयार नसलेले काका आज अचानक कसंकाय तयार झाले?

“चला, उशीर होईल”पीटर बोलून बाहेर पडला.

बाकी सगळे पाठीवर बॅग अडकवून तयार होते. चंद्राकाकांनी मात्र सोबत काही घेतलेले नव्हते. अंगावर फक्त साधा शर्ट, पँट आणि अंगावर स्वेटर. बाकीच्यांनी मात्र पावसामुळं जॅकेट अंगावर चढवले होते. बाहेर जायच्या आधी प्रशांत भिंतीवर लावलेल्या गणपतीच्या फोटोजवळ आला. हात जोडले. डोळे बंद करत मनात प्रार्थना केली.

“हे गणपती बाप्पा, मला इथपर्यंत घेऊन आलास. आता निराश करणार नाहीस, अशी आशा आहे. आता लवकरात लवकर आजोबांना भेटव”

डोळे उघडून पुन्हा एकदा दर्शन घेऊन तो बाहेर पडला. काकांनी कुलूप लावले.

सगळ्यांनी आपल्या बॅग्स मागच्या सीटवर ठेवल्या.

पीटर ड्रायव्हिंग सीट, तर विराट त्याच्या शेजारच्या सीटवर बसला. मागे प्रशांत आणि अजितच्या मध्ये चंद्राकाका बसले.

पीटरने गाडी चालू केली. काकांनी मोठ्याने देवाचं नाव घेतलं. गाडीने हळूहळू वेग पकडला.

मागच्या वेळेस प्रमाणे विराट हातात नकाशा घेऊन बसला होता. पीटर कसल्यातरी विचारात गढून ड्राईव्ह करत होता.

आतपर्यंतच्या प्रवासात चंद्राकाकांनी आजोबांसोबतच्या कितीतरी आठवणी सगळयांना ऐकवल्या. अजितच्या उत्सुकतेने तर त्यांना अजूनच उत्साह आला. मग त्यांनी तोडक्या मोडक्या तरुणपनातील आठवणी ऐकवून अजितचे मनोरंजन चालू ठेवले. बाकी कोणाला मात्र त्यात रस नव्हता. प्रशांतच्या मनाची वेगळीच चलबिचल सुरू होती. कधी ते स्वप्न आठवायचे, तर कधी आजोबा कश्या अवस्थेत असतील, रहस्यमय जागेवर नसतील तर काय? याचबरोबर पीटर आणि चंद्राकाकांबद्दलचे प्रश्न, या सगळयाचा विचार करण्यात त्याचे मन गुंतले होते.

जवळजवळ दोन तास चालवल्यानंतर पीटरने एकदम गाडी थांबवली. समोरचा रस्ता खचलेला होता.

“शीट!” वैतागून पीटर गाडीतून उतरला. काका सोडून बाकीचेही उतरले.

रस्ता पूर्णपणे खचला होता. कडेकडेने गाडी काढण्याचाही काही मार्ग नव्हता. पुढं जाणं जवळजवळ अशक्य होतं.

पीटरने पुन्हा वैतागत गाडीच्या बोनेटवर हात मारला.

“नो वे! कस जाणार आता इथून!” पीटर अजून वैतागला.

“आता काहीच मार्ग नाही! दुसरा रस्ता शोधावा लागेल” प्रशांत बोलला.

“दुसरा रस्ता तर नकाशामध्ये नाहीये”विराट गाडीत ठेवलेला नकाशा बघायला गेला.

“दुसरा रोड नाहीये! दिस इस ओन्ली रोड!”

“मग आता?”अजित चिंतेने बोलला.

“पोरांनो, मागं चला रे. इथं धोका दिसतोय”गाडीतून चंद्राकाकांचा बारीक आवाज आला.

पीटर विराट जवळ जाऊन नकाशा पाहू लागला. तोपर्यंत प्रशांत मोबाईलवर मॅप चालू करून त्यात, याच मार्गाला जाणारा दुसरा दिसतो का, ते रस्ता पाहू लागला.

“मॅप!” पीटर लगबगीने प्रशांतजवळ आला. पटकन मोबाईल हातात घेत त्यावर शोधू लागला. खूप वेळ पाहिल्यावर पीटरच्या चेहऱ्यावर हलकं समाधान पसरलं.

“सापडला! अजून एक रोड आहे. बट, खूप लांब आहे”पीटर बोलला. तसं सगळ्यांना हायसं वाटलं. काकांनी हे ऐकलं. तसा

त्यांचा चेहरा उतरला. बहूतेक त्यांना प्रवासाची सवय नसल्याने, लांबचा प्रवास त्यांना झेपणारा नसावा.

“चला मग, लांब आहे तर लवकर निघावं लागेल” प्रशांत बोलला.

“चला”पीटर लगबगीने गाडीत बसला. प्रशांतने मोबाईल विराटकडे सोपवला. पीटरने रस्ता विराटला समजावला. त्याने स्वत:नेही रस्ता व्यवस्थित बघून गाडी चालू केली.

दुपारची वेळ असूनही आभाळ भरून आल्याने काहीसा अंधार पसरलेला होता. हॉटेलमधील गरमागरम आणि चविष्ट जेवण जेवत या सगळयांच्या इकडच्या तिकडच्या गप्पा सुरू होत्या. फक्त पीटर आणि प्रशांत शांत होते.

प्रवासात चंद्राकाकांची दूरचा प्रवास असल्याने तक्रार सुरू होती. मात्र दुसरा मार्ग नाही हे ओळखून त्यांनी आपल्या शारीरिक अडथळयांकडे दुर्लक्ष केले.

“म्हणजे? तुमचे पैसे तुमची बायको घेऊन गेली?” अजितनी जेवण थांबवत विचारलं.

“हो.. पैशाची गोष्टचं वेगळी! कोणी सोडतं का त्याला?” चंद्राकाका सावकाशपणे घास तोंडात टाकत बोलले.

“सगळे पैसे?”अजित आश्चर्याने उद्गारला.

“सगळे!.. फक्त मी माझ्या तिजोरीत ठेवलेले राहिले.. बायकोवर विश्वास दाखवून तिच्याकडे पैसे ठेवायला दिले होते. पण सगळा सत्यानाश झाला!” काका आपल्या बायकोवर नाराजी दाखवत बोलले.

“मग तर तुमची मुले माझ्यासारख्या मोठ्या घरात राहत असतील” विराटने आपला मोठेपणा दाखवला.

“पण मग, तुम्ही जमीन कुठे घेतली होती?” समोर बसलेल्या प्रशांतच्या प्रश्नाने काका गडबडले. प्रशांतच्या नजरेने ते लगेच हेरले.

“हा.. होती.. मुंबईजवळ.. पण आता काय माहीत.. काकांनी अडखळत उडवाउडवीचं उत्तर दिलं. काहीतरी नक्कीच गडबड आहे, याची प्रशांतला खात्री पटायला लागली.

“होती म्हणजे? विकली?”प्रशांतने मुद्दाम प्रश्न केला. काका अजूनच गडबडले.

“माहीत नाही.. माझ्या बायकोने त्याचे सगळे कागदपत्रही गायब केले.. तिने विकली असेल.. काका पुन्हा अडखळून बोलले.

आता प्रशांतचा संशय पक्का झाला. काका यापेक्षाही अजून काहीतरी लपवत असणार.

मग नंतर कोणी काही बोललं नाही. चंद्राकाका घाबरल्यासारखे वाटत होते. पुन्हा त्यांनी प्रशांतकडे पाहिले सुद्धा नाही.

जेवण झाल्यावर सगळे बाहेर आले. सगळयांनी मिळून पैसे द्यायचे ठरले असल्याने, सगळयांनी पॉकेट बाहेर काढले. अजितने पॉकेट काढायला हात खिशाला लावला, तर त्याच्या लक्षात आले, की त्याने सकाळी घाईघाईत पॉकेट पीटरच्या बॅगेत ठेवले होते.

"माझं पॉकेट पीटरच्या बॅगेत राहिले. मी घेऊन येतो" बोलून अजित हॉटेल समोर पार्क केलेल्या गाडीकडे जाऊ लागला. तोच पीटरने लगबगीने त्याचा रस्ता अडवला.

"तू थांब, मी आणतो पॉकेट" पीटरने असं अचानक थांबवल्याने अजित गोंधळला.

"अरे मी घेतो ना. त्यात काय एवढं"अजित त्याचा काहीसा घाबरलेला चेहरा पाहून बोलला.

“नाही.. मी येतो घेऊन.. पीटर घाईघाईत गाडीजवळ गेला. त्याचं असं विचित्र वागणं बघून अजित पुरता गोंधळला होता. त्याचं असं वागणं त्याने याआधी कधी पाहिलं नव्हतं.

प्रशांत हे सगळं बघत होता. पीटरच्या अश्या वागण्यावरून त्याचा संशय अजून बळावला. विराटही आश्चर्याने सगळा प्रकार बघत होता.

पीटर गाडीजवळ जाताच प्रशांतने आपली नजर काकांकडे वळवली. त्यांची गोंधळलेली नजर पीटरकडे होती. पीटरने पॉकेट आणून अजितकडे सोपवलं. पैसे देऊन ते निघाले.

संध्याकाळचं कोवळं ऊन सगळीकडे पसरलेलं होतं. पीटर गर्द झाडातील रस्त्यांमधून गाडी पळवत होता. एकदा उजवा टर्न घेऊन त्याने विराटकडे पाहिले.

तो रस्ता बरोबर असल्याची खुण करत समाधानी हसला. काही वेळ गाडी संथगतीने कच्च्या रस्त्यांवरून चालत होती. मग पीटरने एकेठिकाणी गाडी थांबवली. विराटच्या चेहऱ्यावरवरचं हसू अजूनच वाढलं.

गाडी थांबताच प्रशांत विचारांतून बाहेर आला. खिडकीबाहेरची नजर त्याने समोर वळवली. पीटर हसतमुखाने त्याच्याकडे बघत होता. पण ते हास्य खोटं असल्याचा प्रशांतला भास झाला.

"आपण पोहोचलो प्रशांत! हेच ते माईस्ट्रीअस प्लेस!" पीटर बोलला.

"अरे वा! पोहोचलो!" अजित मोठ्याने ओरडत गाडीतून बाहेर पडला. चंद्राकाकांना थकल्यामुळे झोप लागली होती. ते आवाजाने जागे झाले. डोळे उघडून त्यांनी आजूबाजूला पाहिले.

"काय झालं?"त्यांनी न कळून विचारलं.

"रहस्यमय जागेवर पोहोचलो!" प्रशांत उत्साहित होत गाडीतून उतरला. त्याच्या चेहऱ्यावर उत्सुकता, संभ्रम, आनंद, असे अनेक भाव एकाच वेळी झळकत होते.

"काय? आलं!.. सु.. सुदर्शन.. मी आलोय.. चंद्राकाकांचे डोळे भरून आले. तेही मोठ्या उत्साहाने गाडीतून उतरले.

प्रशांतने समोर पाहिले. लांबूनच एक गुहा नजरेस पडत होती. आजूबाजूला मात्र विशेष असं काहीच नव्हतं.

ते पाहून सगळेजण संभ्रमात पडले.

“ही ती जागा?”अजितला त्याने केलेल्या कल्पनेसारखं इथं काहीच दिसत नव्हतं. दिसत होती, फक्त एक गुहा.

“हीच आहे! या”पीटर त्या गुहेच्या दिशेने चालू लागला.

सगळे आश्चर्याने एकमेकांकडे पाहू लागले.

“त्या गुहेत काही तरी असेल”प्रशांत उगाच काहीतरी अंदाज करत बोलला.

सगळे जण संभ्रमात पीटर मागोमाग चालू लागले. चंद्राकाकांच्या चेहऱ्यावर मात्र शांतता होती.

गुहा प्रचंड मोठी होती. आतूनही प्रचंड मोठी असणार, याचा अंदाज बाहेरूनच येत होता. गुहेसमोर सगळीकडे अस्वच्छता पसरलेली. तिथेच एक भलं मोठं झाड होतं. गळुन पडलेल्या पानांचा मोठा ढीग त्याखाली साचलेलं होता. गुहेजवळ येऊन पीटर थांबला.

मागे वळून सगळयांच्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पाहून तो हसला.

“हीच आहे ती रहस्यमय जागा!” पीटर आनंदाने ओरडला.

“तू काय बोलतोय पीटर? ही, रहस्यमय जागा? काय आहे इथे? याला स्वर्ग म्हणायचं?”विराट जरा संतापून बोलला. पीटरने आपल्याला येड्यात काढलं, असं वाटून त्याचा संताप झाला.

“ग्रँडपा साठी हेच स्वर्ग आहे!.. ते का, ते ग्रँडपाच सांगतील.” पीटर एवढं बोलून गुहेच्या प्रवेशद्वाराच्या अजून जवळ जाऊन उभा राहिला.

“पीटर, तू हे काय बोलतोय? आजोबा अश्या ठिकाणी असतील?” प्रशांतही संतापला.

“डोन्ट बी अँग्री! तुम्हाला सगळं आजोबा सांगतील”पीटर चिडून बोलला.

“आजोबा कुठं आहेत?”प्रशांतने गंभीर आणि जरा मोठ्या आवजात विचारलं.

“गुहेत चला!” एवढंच उत्तर देऊन पीटर गुहेत प्रवेश करू लागला. त्याच्या मागोमाग बाकीचे. चंद्राकाकांच्या चेहऱ्यावर कसलीच उत्सुकता आणि गांभीर्य नव्हते. ही गोष्ट प्रशांतला अजून खटकली.

सर्व जण गुहेत शिरले. अंधार असल्याने समोरचं काही दिसत नव्हतं.

“ग्रँडपाss”पीटर हाक मारत पुढं पुढं जाऊ लागला. अजून दोन वेळा हाक मारूनही काहीच उत्तर आले नाही. पीटरची पावले थांबली. चेहऱ्यावर प्रचंड अस्वस्थता पसरली.

“पीटर, काय चालुये?”प्रशांत संतापून त्याच्या जवळ आला. पीटर हळूच मागे वळला.

“ग्रँडपा.. इथं.. इथंच असायला हवे होते.. पण.. पीटर घाबऱ्या आवाजात बोलला.

“बंद करा तुझं नाटक! तू येड्यात काढतोय मला!” प्रशांत चिडून मोठ्याने ओरडला.

“पीटर.. हे काय चाललंय? सुदर्शन आणि इथं?”चंद्राकाका पुढं आले.

“मी खरंच सांगतोय प्रशांत, हीच ती जागा आहे आणि ग्रँडपा इथेच असायला पाहिजे!” पीटर ओरडून बोलला.

“इथे गुहेत?”प्रशांतचा राग अजून वाढला.

रखरखीत डोळ्यांनी बघत तो पीटर जवळ येऊन उभा राहिला. पीटर चिडलेल्या आणि काहीश्या घाबरलेल्या नजरेने त्याच्याकडे बघत उभा होता. दोघांचा पारा चढलेला पाहून काका दोघांच्या मधी आले.

“शांत व्हा! प्रशांत, आपण पहिले पीटरचं बोलणं ऐकून घेतलं पाहिजे. काका प्रशांतला लांब घेऊन गेले.

पीटर गुहेकडे तोंड करून उभा राहीला.

“चल, अजून मध्ये जाऊन पाहू!” अजित हातात कंदील घेऊन उभा होता.

हे सगळं होईपर्यंत त्याने काकांनी सोबत आणलेला कंदील पेटवला देखील होता. पीटरने कंदील हातात घेतला. एकदा वळून मागे पाहिलं. काका प्रशांतला समजावण्याचा प्रयत्न करत होते.

पीटर आणि अजित कंदील घेऊन आत शिरले.

आत गेल्यावर समोर एखाद्या हॉलएवढी मोकळी जागा! थोडं अजून पुढं गेल्यावर तिथे एक विटांनी बांधलेली भिंत! अजित सगळं आश्चर्याने बघत होता. पीटरला मात्र हे सगळं माहीत असल्याने तो शांत होता.

त्या भिंतीच्या एका कोपऱ्यात लाकडी दरवाजा. अजून एक आश्चर्य! पीटर हळूच पुढं झाला. उजव्या हातात कंदील पकडून डाव्या हाताने दरवाजा उघडला. हळूच कंदील समोर धरत तो मध्ये शिरला. अजित त्याच्यामागून आत गेला. समोरचे दृश्य बघून अजितला आश्चर्याचा मोठा धक्का बसला.

आत विटांच्या भिंती. एका कोपऱ्यात लाकडी बेड. त्यावर मोठ्या गाद्या आणि उश्या. ज्या पूर्णपणे धुळीने माखून गेल्या होत्या. बेडसमोरच एक बुकशेल्फ. त्यातील काही पुस्तके खाली पडलेली. तर काही वेड्यावाकड्या अवस्थेत धुळीने भरलेली.

चारही बाजूच्या भिंतीवर वेगवेगळे फोटो. त्यात काही आजोबांचे असावे, असं कंदिलाच्या पिवळसर प्रकाशात दिसत होतं.

पीटर ने कंदील सगळ्या खोलीवरून फिरवला.

"ग्रँडपा.. पीटर ने घाबरलेल्या आणि हळू आवाजात हाक मारली. मात्र खोलीत कोणीच नव्हते. पीटरने पुन्हा पुन्हा सगळीकडून कंदील फिरवून बघितले. आजोबा इथं नाहीत हे पाहून त्याचे हात थरथरायला लागले.

"आजोबा.. अजितने पुन्हा हाक मारली. पण त्याला काही अर्थ नव्हता.

"आजोबा इथं नाहीत!" अजित बोलला.

"बाहेर शोधायला पाहिजे!" पीटर मागे वळून घाईघाईत बाहेर पडला.

बाहेर विराट आणि प्रशांत हताशपणे एका दगडावर बसून होते. काका अस्वस्थपणे चकरा मारत गुहेकडे सारखं गुहेकडे बघत होते.

पीटर बाहेर येताच ते लगबगीने त्याच्या जवळ गेले.

"पोरा.. कुठंय.. कुठंय सुदर्शन?"काकांनी अस्वस्थपणे त्याला विचारलं.

"नाहीये मध्ये"अजित हताशपणे बोलला.

“म्हणजे?.. कुठं गेला मग सुदर्शन?”काकांनी पीटरचे दोन्ही हात पकडून त्याला विचारलं. पीटरने चिंताग्रस्त नजरेने त्यांच्याकडं पाहिलं.

“बस्स झालं पीटर! खूप झालं आता!” विराट रागाने चालत त्यांच्याजवळ आला.

“तू काय आम्हाला **या समजतो का? आं?”विराट चांगलाच संतापला.

“विराट, ही वेळ भांडायची नाहीये रे पोरा!” काका त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत होते.

“आता सुदर्शनला शोधणं जास्त महत्वाचं आहे”

“ग्रँडपा, नक्कीच जंगलात गेले असतील!” पीटर काहीतरी विचार करून बोलला. आता प्रशांतचा संयम सुटला.

“गप्प बस पीटर!” प्रशांत जोरात पीटरच्या दिशेने पळत आला. अजितने पटकन त्याला अडवले.

“तू मला येड्यात काढलं! खोटं बोलून मला पागल बनवतोय?” प्रशांत अजितच्या पकडीतून सुटण्याचा प्रयत्न करत ओरडत होता. पण अजितच्या ताकदीसमोर त्याला ते शक्य होत नव्हते.

“मी काहीच खोटं बोलत नाहीये प्रशांत! एव्हरी थिंग इस ट्रू!” पीटर मोठ्याने ओरडला.

“तुम्ही सगळे शांत व्हा! आरडाओरडा करून काहीही होणार नाही”अजित प्रशांतला लांब घेऊन जाऊ लागला.

“तू इकडं ये पोरा.. चंद्राकाका पीटरला गाडीजवळ घेऊन गेले.

पीटर पाणी पिऊन जरा शांत झाला. काका त्याला समजावण्याचा प्रयत्न करत होते.

इकडे प्रशांत रागाने धुसमुसत होता.

“आपण पीटर वर विश्वास ठेवायला पाहिजे. असं भांडण करून काही होणार नाही”अजित त्याला समजावण्याचा प्रयत्न करत होता.

“विश्वास ठेऊ? या पीटर वर मला पहिल्यापासून संशय होता.. **या आहे साला!” विराटचा राग अजून कमी झाला नव्हता.

“ही ती रहस्यमय जागा असूच शकत नाही! आजोबा इथं का येतील?.. हा पीटर फक्त खोटं बोलतोय, अजित. प्रशांत जरा रागाने बोलत एका दगडावर बसला.

“सध्या तरी आपल्याला त्याचेच ऐकावे लागेल. आजोबा अजून कुठे असतील ते फक्त त्यालाच माहीत आहे.. असं चिडून

काहीही होणार नाही”अजित अजूनही समजवण्याच्या प्रयत्नात होता. वैतागून तो प्रशांतशेजारी बसला.

बराच वेळ कोणी काहीही बोलले नाही. आता काय करावं कोणाला काही समजेनासं झालं. प्रशांतचं डोकं आता बधिर होत चाललं होतं. पीटरवर विश्वास ठेवावा का नाही यात त्याचे मन द्विधास्थितीत अडकले होते. दुसरीकडे आजोबांबद्दल नको ते विचार मनात घोळायला लागले.

काही वेळाने पीटर आणि चंद्राकाका त्याच्याजवळ येऊन उभे राहिले.

“प्रशांत.. मी अजूनही तुला सांगतो, मी खोटं बोलत नाहीये” पीटर कळकळीने बोलला.

“ग्रँडपा मे बी जंगलात असतील. आपण अंधार पडायच्या आत तिकडं जायला हवं.

“आजोबा जंगलात का जातील? का जंगलात भटकवण्याचा विचार आहे तुझा आता?” विराट चिडून बोलला.

“पोरा.. तू उगाच कशाला वाद घालतोय? आपण..

“जर आजोबा जंगलात गेले असतील तर परत येतीलच की.. प्रशांतने मध्येच काकांचं वाक्य तोडलं.

“जंगलात एक झोपडी आहे.. आजोबा तिकडे जात असायचे. रात्रभर तिकडेच थांबत असायचे”पीटर माहिती पुरवत बोलला. प्रशांतला मात्र त्याच्यावर विश्वास नव्हता.

“हा मॅप. तुम्ही तिघे या मॅप ने जा. काका आणि मी बाजूच्या रिव्हरच्या दिशेने जातो. ग्रँडपा त्या रिव्हर वर असण्याची पण शक्यता आहे”पीटरने कागदावर आखलेला नकाशा अजित समोर धरला.

“आता नदी कुठून आली?”अजितने नकाशा हातात घेत प्रश्न केला.

“आता जास्त विचार करू नका! वि डोन्ट हॅव टाइम! अंधार पडायच्या आधी आपण परत यायला पाहिजे... आणि हा परत आल्यावर थेट गुहेत शिरा. पीटर एवढं बोलून चालता झाला. सोबत काकाही गेले.

“प्रशांत, मला वाटतं आपण जायला पाहिजे”विराट बोलला.

“मला पीटर वर विश्वास नाही!” प्रशांत एवढंच बोलून अस्वस्थपणे चकरा मारायला लागला.

“जाऊन बघण्यात हरकत नाही प्रशांत. जर पीटर खरं बोलत असेल तर?”आता विराट त्याला समजावू लागला. आता दुसरा

पर्याय नाही, हे ओळखून सध्या पीटरवर विश्वास ठेवण्यातच विराटला योग्यता वाटत होती.

“विराट बरोबर बोलतोय, त्याच्यावर विश्वास ठेवूनच आपण इथपर्यंत आलो आहोत. चल प्रशांत जास्त विचार करू नको”अजित बोलला.

दोन विचारांच्या मध्ये प्रशांतचे मन अडकत चालले होते. कोणता निर्णय योग्य, हे त्याला समजेनासं झालं.

शेवटी विराट आणि अजितचं म्हणणं योग्य समजून त्याने त्या झोपडीकडं जाण्याचं ठरवलं.

*****************************************
******

# मुद्राध्यास – भाग ४

## अनपेक्षित धक्का

## ( अंतिम भाग )

-----------------------------------------------

प्रशांत, अजित आणि विराट नकाशात दाखवलेल्या मार्गाने चालत होते.

जवळपास पंधरा मिनिटं झाडाझुडपांतून वेगवेगळी वळणे घेत ते त्या झोपडीजवळ पोहोचले. एका मोठ्या झाडाच्या बाजूलाच ती झोपडी बांधलेली होती. तिच्या अवतीभवती मात्र मोठमोठ्या झुडपांनी वेढा घातलेला होता.

तिघे झुडपे बाजूला करत झोपडीसमोर उभे राहिले.

विराटने हातातला कंदील समोर धरला. तर त्यांना धक्काच बसला. झोपडीच्या दाराला बाहेरून लॉक लावलेलं! आजोबा इथेही नव्हते!

प्रशांतला काही वेळ पायाखालची जमीन सरकल्यासारखं झालं. स्वतःला सावरत तो झोपडीच्या अजून जवळ जाऊन उभं राहिला. पुन्हा एकदा सगळ्या झोपडीवरून नजर फिरवली. आतमध्ये संपूर्ण अंधार होता.

मात्र आजोबा येऊन गेले असावेत. कारण झोपडीच्या आजूबाजूला स्वछता होती. थोड्यावेळेआधीच कोणीतरी साफसफाई केली असावी. म्हणजेच आजोबा इथे येऊन गेले असणार!

“विराट, मला वाटत की आजोबा इथे येऊन गेले असतील!” प्रशांत बोलला.

“कस काय? इथं तर कोणीच नाही!”

“परत चल.. लवकर!” प्रशांत घाईघाईने मागे फिरला.

“अरे पण.. अजित गोंधळून त्याच्याकडे पाहतचं होता. त्याला काहीतरी दिसलं किंवा समजलं असेल, या विचाराने विराट कंदील घेऊन पटकन त्याच्या मागे गेला. जाताना अजितने पुन्हा एकदा झोपडीवर नजर टाकली.

गुहेजवळ प्रचंड अंधार होता. प्रशांत कंदील घेऊन घाईघाईत त्या गुहेच्या प्रवेशापाशी येऊन उभा राहिला. कंदील विराटकडे सोपवत दोन्ही हात गुडघ्यावर ठेऊन तप दम खाऊ लागला. इतक्या थंडीतही त्याच्या चेहऱ्यावरून घाम ओघळत होता.

“पीटर आणि काका अजून आलेले दिसत नाहीत. अजित गुहेकडे पाहून बोलला.

“आत असतील”प्रशांत दम खात बोलला.

त्याने गुहा आतून पहिली नव्हती. पण बाहेरून दिसणाऱ्या आकारावरून गुहा आतूनही तेवढीच मोठी असणार यात काही शंका नव्हती. त्यामुळे पीटर आणि काका गुहेमध्ये जास्त आतमध्ये असतील, असा त्याचा अंदाज होता.

“चला मध्ये जाऊ” अजित मध्ये जाण्यास निघाला.

तिघे हळूहळू आत शिरले.

अजित कंदील घेऊन पुढं होता, तर विराट आणि प्रशांत आश्चर्याने गुहेवरून नजर फिरवत होते. आतलं दृश्य बघून प्रशांतला आश्चर्याचा धक्का बसला.

अजितने सगळं आधीच सगळं माहीत असल्याने तो थेट दाराजवळ येऊन उभा राहिला. हळूच दार उघडले.

विराट आणि प्रशांत त्याच्याकडे बघतच होते. दार उघडून अजित आत शिरला.

मध्ये सगळा अंधार. पीटर आणि चंद्राकाका अजून आलेले नव्हते.

"तो कोणाचा फोटो आहे?"विराटने कंदिलाच्या अंधुक प्रकाशात दिसणाऱ्या भिंतीवरील फोटोकडे बघत विचारलं. अजितने काही न बोलता कंदील त्या फोटोच्या दिशेने धरला. तो आजोबांचा फोटो होता. प्रशांत त्या फोटोच्या जवळ जाऊन न्याहाळू लागला.

"आजोबा.. म्हणजे पीटर बरोबर बोलत होता!.. प्रशांत फोटोकडे पाहून उद्गारला.

"हो. मघाशी मी पाहिला हा फोटो! म्हणून मला पीटर वर विश्वास वाटला"अजित बोलला.

"मग हे आधी का नाही संगीतलं? मी कशाला पीटरवर संशय घेतला असता.. फोटो बघून मला खात्री पटली नसती का?"प्रशांत चिडून बोलला.

"विसरलो मी"अजितला खजील झाल्यासारखं झालं. त्याने हे सगळं आधीच सांगितलं असतं, तर उगाच वाद झाला नसता आणि प्रशांतला सहज विश्वास बसला असता.

प्रशांतने कंदील अजितच्या हातातून घेतला. पूर्ण खोलीवर त्याने नजर टाकली. भिंतीवर बाकीच्या पेंटिंग असाव्यात असं दिसून येत होतं. कोपऱ्यातल्या बेड बघून प्रशांत चमकला. कंदील घेऊन तो अजून जवळ गेला. गादीवरून हात फिरवताच तो धुळीने भरला. प्रशांत गोंधळला.

“इथं एवढी धूळ कशी?”विराट बोलला. तसं अजितलाही काही तरी लक्षात आलं. ती अजून गंभीर झाला.

“काहीतरी गडबड आहे!” प्रशांत विचार करत उद्गारला.

“काय?”विराट गोंधळला.

“आजोबा इथं राहत असतील, तर इथं एवढी धूळ?.. प्रशांत डाव्या बाजूला वळला. बुकशेल्फ सुद्धा धुळीने माखलेली होती. जवळ जात त्याने पडलेली पुस्तके उचलली. त्यांच्यावरची धूळ साफ करत टेबलवर व्यवस्थित ठेवली.

“काही कळेनासं झालंय!.. काय चाललंय नक्की.. अजित पुरता गोंधळला होता.

“सगळ्यात पहिले पीटर आणि काकांना शोधावं लागेल.. चला” प्रशांत दाराकडे वळला.

दारातून बाहेर पडला तसा त्याला कंदिलाचा प्रकाश दिसला. त्याने कंदील समोर धरत पाहिले. पीटर आणि काका हसत त्याच्याकडे बघत होते.

“पीटर, आजोबा कुठं आहेत?”प्रशांतने दोघांकडे बघत विचारलं. दोघ एकमेकांकडे पाहून विचित्र हसले. प्रशांत गोंधळून त्यांच्याकडे बघतच होता.

“गेले आजोबा!” चंद्राकाका मोठ्याने विचित्र हसत बोलले. पीटरही मोठ्याने हसायला लागला. दोघांचं बदललेलं रूप पाहून सगळे थबकून त्यांच्याकडे बघायला लागले. नक्की काय चाललंय, ते असं का हसत आहेत?

“गेले म्हणजे? गेले म्हणजे काय?”प्रशांत आश्चर्य आणि गोंधळाने त्यांच्याकडे बघत ओरडला.

“पीटर, हे काय चाललंय, आजोबा कुठं आहेत?”अजित पुढं होत बोलला. पीटरने हास्य थांबवत रखरखत्या नजरेने प्रशांतकडे पाहिलं. कंदील खाली ठेवला. हळूच हात खिशात घालून त्यातून चाकू बाहेर काढला.

“जास्त बोलू नको! नाहीतर.. पीटरने मोठ्याने ओरडत चाकू प्रशांतच्या छातीजवळ धरला.

"हे.. काय.. प्रशांत घाबरला होता, मात्र आपली रखरखती नजर त्याने पीटरवर कायम ठेवली होती. अजित चपळाईने चाकू पीटरच्या हातातून घेण्यासासाठी धावला.. मात्र काकांनी तेवढ्याच चपळाईने त्याला जोरात धक्का दिला. अजित थेट गुहेच्या भिंतीवर जाऊन धडकला.

"गप्प बस!.. खाली गुडघे टेक!" काका रागाने प्रशांतवर डोळे विस्फारून ओरडले. त्यांचं रूप पाहून विराटने नकळत गुडघे खाली टेकले. प्रशांतने आपले थरथरते गुडघे खाली टेकले. पीटरने आणि काकांनी आपल्याला फसवलं, याचा त्याला प्रचंड राग येत होता. त्यांच्यावर वार करण्यासाठी त्याचे हात थरथरत होते.

अजितच्या डोक्यावर मार लागल्याने तो विव्हळू लागला. त्याच्याकडे पाहून काका पुन्हा मोठ्याने विकटतेने हसले.

"फसवल तुम्ही आम्हाला!.. ही तुम्ही फार मोठी चूक करताय!" विराट रागाने ओरडला.

"ये, गप्प बस साल्या!" काकांनी त्याच्याजवळ जात डाव्या गुडघ्यावर जोरात लाथ मारली. विराटच्या तोंडातून मोठी किंकाळी बाहेर पडली. त्याला पाहून प्रशांतचा संयम सुटला.

"काका.. बस्स.. सांगा आजोबा कुठं आहेत? तुम्ही काय केलं त्यांच्यासोबत?"प्रशांतने रागाने थेट काकांची गचंडी पकडली.

“ये सोड.. लिव हिम!” पीटरने त्याच्यावर चाकू उगारला.

“सोड.. नाहीतर आताच्या आता तिघांना हेलमध्ये पाठवेल!”

प्रशांतने काकांना जोरात धक्का देऊन बाजूला केले.

“खाली! "

नाईलाजाने प्रशांत पुन्हा गुडघ्यावर बसला. विराट आणि अजितचं व्हीवळण ऐकून त्याचा पारा चढत होता.

अजित डोकं धरून मागच्या भिंतीला टेकून बसला.

“नजर खाली!” काकांनी अजून एक चाकू बाहेर काढून प्रशांतवर रोखला.

प्रशांतने खाली बघताच काकांनी जोराने त्याच्या पोटात लाथ घातली. त्यांच्या ताकदीने प्रशांत थेट मागच्या दरवाज्याला जाऊन धडकला.

त्याची किंकाळी ऐकून पुन्हा दोघ मोठ्याने उपहासाने हसायला लागले.

“आजोबा.. सगळं समजेल साल्या तुला!” काका प्रशांत जवळ जाऊन उभे राहिले.

“तुझ्या आजोबाला जाऊन भेट आता!” काका त्याच्या चेहऱ्यासमोरून चाकू फिरवत म्हणाले.

“आता सांगायला पाहिजे अंकल.. सगळं सांगायला पाहिजे”पीटर बोलला. यावर काका मंदपणे हसले.

“मारून टाकलं आम्ही तुझ्या आजोबांना! "

काकांचा हसण्याचा आवाज सगळीकडून घुमायला लागला. अंगातले सगळे प्राण गेल्यासारखं प्रशांतला झालं.

“काय?... तुम्ही.. आजोबांना..!” प्रशांतचे डोळे भरून आले. आपण ऐकलं त्यावर त्याचा विश्वास बसेना. आजोबांचा हसरा चेहरा तरळू लागताच, हुंदका बाहेर पडला.

“साला, खजिना हडप करायला निघाला होता! संपवला एकदाचा!” काकांच्या बोलण्यात कुठेही पश्चात्ताप नव्हता.

“काय बिघडवलं होत त्यांनी तुमचं?.. का असं केलं.. विराट कळवळून बोलला. प्रशांतची स्थिती बघून त्याचे मन हेलावत होते.

“खजिना! या गुहेतला खजिना मिळवण्यासाठी करावं लागलं.. इतका जवळचा मित्र असून या जागेबद्दल काही सांगितलं नाही. कधी त्या खजिन्याबद्दल कळू दिलं नाही. त्याचंच फळ मिळालं त्याला!” काकांच्या चेहऱ्यावर एक वेगळंच स्मित उमटलं.

“खजिना मिळवण्यासाठी अंकल काहीही करायला तयार होते. पण तुझ्या ग्रँडपानी खजिना कुठं आहे, ते लवकर सांगितलं असतं, तर आम्हाला त्यांचा मर्डर करायची गरज नसती पडली!”

“हरामी आहे तुम्ही! लालची साले.. कारण नसताना माझ्या आजोबांचा जीव घेतला तुम्ही!” प्रशांत कळवळून जोरजोरात ओरडत होता. पण त्याचं रडणं, आक्रोश याचा काहीही फरक पीटर आणि चंद्राकाकांवर पडत नव्हता. त्याची मन हेलवणारी अवस्था बघून त्यांच्या मनाला अजून आनंद पोहोचत होता.

“हे पाप केलंय तुम्ही! पीटर, तू फक्त आजोबा नाही, मलाही फसवलं. तुझ्यावर विश्वास ठेवला, तर त्याचा गैरफायदा घेतला तू!” अजित संतापून ओरडला.

“हाहाहा.. मी गैरफायदा घेतला? तुम्ही माझ्यावर बिलिव्ह केला, ही तुमची मिस्टेक.. ज्या वेळी मला समजलं की तुम्ही ग्रँडपांना शोधताय, तेव्हाच ठरवलं, तुम्हाला पण आजोबांकडे पाठवण्याशिवाय पर्याय नाही!.. ज्या झोपडीत तुझ्या ग्रँडपांचा सांगडा सडतोय, तिथंच तुम्ही पण सडणार!” पीटर चाकू घेऊन प्रशांत समोर गुडघ्यावर बसला.

“पण आम्ही काय बिघडवलयं तुमचं? आम्हाला का त्रास देताय?.. लक्षात ठेवा, याची शिक्षा तुम्हाला नक्की भेटेल” अजित घाबरून बोलला.

“गप्प बस्स! कोण शिक्षा देणार आम्हाला? आं?.. तुम्हाला जिवंत ठेवलं, तर ही जागा आमच्या ताब्यातून जाईल. खजिना

पण.. मग का जिवंत ठेवू तुम्हाला?”काका चाकू घेऊन विराट जवळ गेले. पीटरकडे बघत त्यांनी इशारा केला. तसा पीटरने प्रशांतच्या अजून जवळ जात चाकू त्याच्या छातीवर धरला. पीटर आणि प्रशांत एकमेकांकडे खुन्नस देऊन बघत होते. दोघांच्या डोळ्यात संतापाची आग होती. हतबल असल्याने प्रशांतला काही करता येत नव्हते. अजित आणि विराटची देखील तीच अवस्था.

“तुला तर मी..!” प्रशांतने बळ एकटवून जोरात पीटरची कॉलर पकडली.

“तू काहीच करू शकत नाही प्रशांत! तुझी डेथ आता माझ्या हातात आहे!” पीटरने चाकूचं टोक प्रशांतच्या छातीवर टेलवलं. काकांनी जोरात विराटच्या गुडघ्यावर अजून एकदा लाथ मारली. वेदनेने जोरात किंचाळत त्याने आपला गुडघा पकडला. काकांनी विकटपणे हसत अजितकडे पाहिलं. डोक्यावर मार लागल्याने तो बेशुद्धअवस्थेत चालला होता. तोंडाने काहीतरी पुटपुटत बहुतेक तो सोडून देण्याची विनंती करत असावा.

काकांनी हातातला चाकू विराटच्या गळ्यावर टेकवला.

“संपला खेळ!”

काका आणि पीटरचे विकट हास्याने गुहा दणाणून गेली.

पुन्हा गंभीर शांतता पसरली. पीटरने प्रशांतच्या छातीच्या दिशेने चाकू उचलायला सुरुवात केली तेवढ्यात आवाज आला.

“थांबाss... पीटरने दचकून मागे पाहिले. गुहेच्या प्रवेशद्वाराशी कोण तरी हातात बंदूक घेऊन उभं होतं.

अंधाऱ्या प्रकाशात त्याचा चेहरा ओळखणं शक्य नव्हतं.

“क.. कोण?”काका घाबरून उभे राहिले. थरथरत्या हातांनी त्यांनी कंदील उचलून त्या व्यक्तीच्या जवळ नेला.

समोर उभ्या व्यक्तीचा चेहरा बघून त्यांचा चेहरा पांढरा पडला! हातपाय थंड पडले. चाकू थरथरणाऱ्या हातातून खाली पडला.

“कोण आहे काका?”पीटर घाबरत जवळ गेला.

कंदिलाच्या मंद प्रकाशात समोर दिसणारा चेहरा बघून तो जागच्या जागी खिळला. डोळ्यासमोर अंधार अजून गडद व्हायला लागला. चक्कर येऊन खाली पडणार असं वाटून मागे आधार शोधायला लागला.

“सु.. सुदर्शन.. तू.. तू!” ते दुसरं कोणी नसून आजोबा होते! प्रशांतच्या हतबल चेहऱ्यावर मोठं आश्चर्य पसरलं.

“आजोबा!” एका वेगळ्याच विलक्षण समाधानाने त्याचा चेहरा भरून गेला.

“हो मी!” आजोबा पुढं आले. आता पिवळ्या प्रकाशात त्यांचा चेहरा दिसत होता. चेहऱ्यावर गंभीर भाव.

“आजोबा.. तुम्ही.. प्रशांत भरल्या डोळ्याने आजोबांकडे बघत होता. एखाद्या लहान मुलाने आपल्या आईला पाहिल्यावर व्हावा एवढा आनंद त्याच्या चेहऱ्यावरून वाहत होता.

“प्रशांत!.. मोठ्या करुणेने त्याच्याकडे पाहत आजोबा उद्गारले. त्यांच्या गंभीर चेहऱ्यावर निखळ हास्य तरळलं. अगदी फोटोत असल्यासारखं.

आजोबांना कडकडून मिठी मारण्यासाठी इतक्या दिवसांपासून प्रशांतचे आतुर मन आता थांबायला तयार नव्हते. शक्य तितका जोर लावून तो उठण्याचा प्रयत्न करत होता. पण गुडघ्यावरचा मार त्याला असह्य होत होता. त्याची अवस्था बघून आजोबांच्या हृदयात कसेतरीचं झाले. त्यांची पावले प्रशांतच्या दिशेने वळली.

आपला हात त्यांनी आधारासाठी प्रशांतसमोर केला.

“बाळा.. मीच तुझा आजोबा.. आजोबांचा आवाज जड झाला. प्रशांत त्यांच्या हाताला धरून उभं राहण्याचा प्रयत्न करू लागला. दोघांनी एकमेकांकडे मोठ्या प्रेमळ नजरेने पाहिलं.

दोघांच्या डोळ्यातील अश्रू एकमेकांबद्दलचा विश्वास आणि प्रेमाची ग्वाही देत होते.

प्रशांतच्या मनात बोलण्यासाठी बरंच काही उसळून येत होतं. आपली भावना दर्शवण्यासाठी मात्र त्याला शब्द सापडत नव्हते.

“आजोबा.. एवढंच त्याच्या तोंडातून बाहेर पडलं.

आजोबांना त्याने कडकडून मिठी मारली. आपल्या भावना डोळयातून टपकणाऱ्या अश्रूंच्या रुपात आजोबांच्या मिठीत मोकळया होऊ लागल्या.

“माझ्या बाळा.. किती दिवसांपासून वाट पाहतोय तुझी..

त्या दोघांचं मिलन पाहून विराटची वेदना जणू कुठल्या कुठे पळून गेली. पाणावलेल्या डोळयांनी भावनिक क्षण तो डोळयात भरत होता.

पीटर आणि चंद्राकाका बधिर झाल्यासारखं त्यांच्याकडे बघत उभे होते.

“मला माहित होतं तुम्ही.. तुम्ही मला नक्की भेटताल..

आजोबांनी मिठी सोडवत मोठ्या मायेने प्रशांतच्या चेहऱ्यावरून हात फिरवला.

“ग्रँडपा.. तू.. तुम्ही.. जिवंत..!” पीटर स्वतःला सावरत म्हणाला.

आजोबांनी तुच्छतेने त्याच्याकडे नजर टाकली. चेहऱ्यावर ओसंडून वाहणारी माया गायब होऊन विलक्षण संताप त्यांच्या चेहऱ्यावर पसरला.

“तू गप्प बस पीटर! एक शब्द बोलला तर या बंदुकीने.. आजोबांनी खिशात ठेवलेली बंदूक बाहेर काढून पीटरवर रोखली. त्यांचा क्षणात बदललेला अवतार बघून पीटर घाबरून मागे झाला. त्यांचं असं रूप पाहून प्रशांत आश्चर्यचकित झाला. मात्र पीटरबद्दलचा त्यांचा संताप काही चुकीचा नव्हता.

आजोबांनी बंदूक खाली केली. त्यांची नजर अजितवर गेली. त्याच्या डोक्यातून रक्त वाहत होते. त्याची शुद्ध पूर्णपणे हरपली होती. त्याची अवस्था बघून आजोबा लगबगीने त्याच्याजवळ गेले. गुडघ्यावर बसून त्यांनी त्याच्या जखमेवरून हात फिरवला. जखम गंभीर होती.

“याला फार मार लागला आहे, लवकरात लवकर उपचार करावे लागतील”काकांनी विराटकडे पाहिले.

त्याच्या गुडघ्यातूनही रक्त वाहत होते. पण अजितची स्थिती फार खराब होती.

“तुम्हाला सगळ्यात पहिले उपचाराची गरज आहे.. प्रशांत, याला घेऊन ताबडतोब झोपडीवर जायला पाहिजे”आजोबा

अजितला उठवण्याचा प्रयत्न करू लागले. प्रशांत आणि विराट कसेबसे उभं राहू लागले.

त्या दोघांना पाहून काही वेळ विचार करत पीटर मदतीला पुढं आला. चंद्राकाका हतबल झाल्यासारखे उभे होते. डोकं बधिर होऊन आजूबाजूला काय चालू आहे याबद्दल त्यांना काही कल्पना नसावी.

पीटरने पुढं होत एका हाताने प्रशांतला उभं राहण्यास मदत केली, तर दुसऱ्या हाताने विराटला आधार दिला.

आजोबांनी एका हाताने अजितला पकडले. दुसऱ्या हातात कंदील पकडला. आजोबा गुहेतून बाहेर पडले. मागोमाग पीटर दोघांना आधार देत त्यांच्या मागोमाग.

"अंकल, आता आपण यांना हेल्प करण्याशिवाय काहीही करू शकत नाही. आपला खेळ संपला!" पीटर बोलून बाहेर पडला.

चंद्राकाकांनी आपली खाली पडलेली मान हळूच वर उचलली. डोळ्यातील पाणी टिपत ते देखील कंदील घेऊन बाहेर पडले. खाली पडलेला चाकू उचलण्याची त्यांची हिंमत झाली नाही.

झोपडीत चार- पाच कंदिलांचा पिवळसर प्रकाश पसरलेला होता. ही झोपडी गुहेपासून जवळच्या अंतरावर होती. जी आजोबांनी बांधलेली होती.

अजित पलंगावर झोपून होता. त्याला अजून शुद्ध आलेली नव्हती. आजोबा त्याच्या जखमेवर मलमपट्टी करून त्याच्याजवळ बसून त्याच्या डोक्यावरून मायेने हात फिरवत होते. खाली जमिनीवर प्रशांत पीटर आणि चंद्राकाकांपासून लांब बसून होता. विराट मोडक्या लाकडी खुर्चीवर. त्यालाही आजोबांनी मलमपट्टी केल्याने जरा बरं वाटत होतं.

“याला शुद्धीवर यायला वेळ लागेल. गंभीर जखम आहे”आजोबा मायेने त्याच्या चेहऱ्यावरून हात फिरवत बोलले.

प्रशांतने त्यांच्याकडे पाहिले. फारच थकलेला चेहरा, चेहऱ्यावरचे तेज कमी झाले होते. पण डोळ्यात अजूनही माया वाहत होती.

त्याच्या मनातील अनेक प्रश्न त्याच्या ओठांवर येऊन थांबत होते, पण ते बाहेर पडत नव्हते.

“ग्रँडपा.. पीटरचा गंभीर आवाज कानावर पडूनही आजोबांनी ऐकून न ऐकल्यासारखं केलं.

“वि आर सॉरी!.. आम्ही फार मोठी चूक केली”पीटर पश्चतापाने बोलला.

“आता माफी मागून काय उपयोग?”आजोबा कोरड्या आवाजात बोलले.

“आम्ही जे केलं, ते फार चुकीचं केलं. प्रशांत सोबतही आम्ही फार वाईट वागलो.. आणि तुमचा मर्डर करण्याचा प्रयत्न.. पीटरच्या चेहऱ्यावरून अश्रू ओघळायला लागले.

“तुम्ही माझ्यासोबत जे केलं ती चूक केली, पण तुम्ही आजोबांना मारण्याचा प्रयत्न केला, हे पाप आहे!” प्रशांत ओरडून बोलला. पीटर आणि चंद्राकाकांबद्दल त्याचा राग उफाळून येत होता.

“तुमची चूक कधीच माफ होऊ शकणार नाही. कधीच नाही!” आजोबा हळू आवाजात मात्र संतापून बोलले. त्यांच्या बोलण्यात विश्वासाला तडा गेल्याचे दुःखही होते.

“माफ कर सुदर्शन. एक मित्र म्हणून तर माफ कर”चंद्राकाका दुखावलेल्या आवजात म्हणाले.

आजोबांनी मात्र त्याकडे लक्ष दिलं नाही.

“तुम्ही सगळे थकलेले आहात. बाजूला काही फळे ठेवली आहेत. ती खाऊन झोपून घ्या”आजोबा एवढं बोलून झोपडीबाहेर पडले. त्यांना भरून आलेले डोळे पुसताना प्रशांतने पाहिले होते.

रात्रीचा जवळपास एक वाजला होता. आजोबा सोडून कोणाला झोप लागली नव्हती. सर्वांच्या मनात वेगवेगळे विचार सुरू होते. प्रत्येकाला वेगळ्या प्रकारचे दुःख सतावत होते.

प्रशांत पलंगावर उठून बसला. शेजारी आजोबा झोपलेले होते. कडाक्याची थंडी असूनही दोघ बाहेरील पलंगावर झोपले. आत अजितवर लक्ष ठेवायला विराट होता.

मधेच आजोबांना जाग आली. त्यांचे लक्ष प्रशांतकडे गेले. कसल्यातरी गहन विचारात तो मग्न होता.

“प्रशांत.. प्रशांतने काहीसं दचकून आजोबांकडे पाहिलं.

“आजोबा.. झोपले नाही?”

उत्तरादाखल आजोबा हळूच हसले. उठून बसले.

“मनातले विचार थांबत नाही ना?”आजोबांनी मायेने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला.

“बरेच प्रश्न सतावत आहेत. पीटर आणि चंद्राकाकांनी खरंच तुम्हाला मारण्याचा प्रयत्न केला होता?”

आजोबा अस्वस्थ झाले. चेहऱ्यावर प्रचंड उदासी पसरली.

“विश्वासघात सगळयात मोठं अस्त्र आहे बाळा”आजोबा बोलून पलंगावरून उठले. एका जागी उभं राहून वर आकाशात पाहू लागले. चांदण्यांनी आकाश व्यापून गेले होते. प्रशांत त्यांच्याजवळ उभा राहून आकाश न्याहाळू लागला.

“आपलं सर्वांचं आयुष्य आकाशासारखं आहे. कधी सुखाच्या प्रकाशाने उजळून जातं, तर कधी काळाकुट्ट भासू लागतं”आजोबा हळूच प्रशांतकडे पाहून हसले. प्रशांत शांतपणे त्यांच्याकडे बघत होता. आजोबांमध्ये लपलेला लेखक तो आज पहिल्यांदा पाहत होता.

आजोबांनी पुन्हा आपली नजर वर वळवली.

“पण ज्यांच्या आयुष्यात असं चांदणं असतं तेच खरे नशीबवान!” आजोबा उदासपणे उद्गारले.

“म्हणजे?”चांदण्यांचा संदर्भ आजोबा कशाशी जोडत आहेत, हे प्रशांतला कळले नाही.

“चंद्र म्हणजे आपण स्वतः असतो. त्याची शोभा वाढवायला, त्याच्या प्रकाशाला साथ द्यायला आपल्याला चांदण्यांची गरज

असते. कमीत कमी एक तरी. जास्त चांदणे अपल्याभोवती जमा व्हायला लागली, की आपला प्रकाश कमी वाटायला लागतो. आजोबांनी आपले डोळे मिटून मान खाली केली.

प्रशांतला आजोबांच्या बोलण्याचा अर्थ प्रशांतला समजला. त्याच्या मनात एक वेगळीच कालवाकालव झाली.

“तुमच्या आयुष्यातील चांदणं कोण आहेत आजोबा?” आजोबांनी अलगद डोळे उघडले. पलंगावर पाय मोकळे सोडून बसले. प्रशांत त्यांच्याशेजारी येऊन बसला.

“जेव्हा मी या जागी आलो, तेव्हा पीटर आणि चंद्रकांत. आता तुझ्याशिवाय दुसरं कोणी नाही. आजोबा शून्यात बघत बोलले.

“पीटरने का तुम्हाला धोका दिला?.. काय वैर होते त्याचे?” प्रशांतचा पीटरबद्दलचा राग दिसून येत होता.

“त्याची चूक म्हणजे त्याने चुकीच्या माणसावर विश्वास ठेवला.

“चंद्राकाका?”

“हं”

“चंद्राकाकांनी तरी असं का केलं? "

“पैशाचा मोह फार वाईट आहे बाळा. गैरसमज त्याहून वाईट”

प्रशांत विचारात पडला. रहस्यमय जागेबद्दल अजूनही अनेक प्रश्न त्याच्या मनात होते.

"रहस्यमयी जागी असलेल्या खजिना मिळवण्यासाठी त्यांनी हे सगळं केलं?"

आजोबांनी मंद हास्य ओठांवर कोरलं.

"खजिना! खजिना नावाचा प्रकार या जागेत नव्हताच!" प्रशांत गोंधळून आजोबांकडे पहायला लागला.

"ज्याच्यासाठी त्यांनी माझ्यावर हल्ला केला, ती माझी संपत्ती होती. दुसऱ्याची कमाई कोणालाही खजिन्यापेक्षा कमी वाटणार नाही, हेही तितकंच खरं"

प्रशांत अजून काही बोलणार तितक्यात विराट बाहेर आला.

"आजोबा.. अजित शुद्धीवर आला आहे"विराटच्या आवाजाने दोघांनी मागे वळून पाहिलं. आजोबा लगबगीने उठून आत गेले.

अजित डोळे उघडून इकडे तिकडे नजर फिरवत होता. काय झालं ते आठवण्याचा त्याचा प्रयत्न होता, पण त्याला ते शक्य होत नव्हतं.

आजोबा त्याच्या जवळ जाऊन बसले. प्रेमाने त्याच्याकडे पाहू लागले.

शेजारी विराट आणि प्रशांत येऊन उभे राहिले.

“कसं वाटतंय अजित?”प्रशांतने त्याच्याकडे पाहून विचारलं.

“बर आहे”बारीक आवाजात तो उत्तरला. त्याची नजर आजोबांवर खिळली. चेहरा निरखून पाहू लागला. मनातल्या मनात आजोबांचा पाहिलेला फोटो आणि आजोबांचा समोर असलेला चेहरा यांची जुळवाजुळव सुरू होती.

“हे आजोबा.. विराट त्याला असा गोंधलेला पाहून बोलला. अजित आजोबांकडे पाहतच राहिला.

“त्याला आता काही सांगू नका. डोक्यावर ताण पडणं चांगलं नाही त्याच्या”आजोबा मायेने अजितच्या चेहऱ्यावरून हात फिरवत बोलले.

“आजोबा!.. तुम्ही!” अजित डोळे विस्फारून त्यांच्याकडे पहायला लागला.

“आराम कर बाळा. डोक्याला ताण देऊ नको”आजोबा बोलून त्याला खायला काहीतरी द्यायला उठले. अजित आश्चर्यचकित आणि गोंधळलेल्या नजरेने विराट आणि प्रशांतकडे पाहतच राहिला.

सकाळी पक्ष्यांचा किलबिलाट कानावर पडताच प्रशांत जागा झाला. सूर्याचा मंद प्रकाश पसरू लागला होता.

तो पलंगावर उठून बसला. समोर असलेल्या छोट्या विहीरीतून आजोबा पाणी काढत होते. मदतीला विराट आणि पीटर होते. त्यांच्यापासून लांब चंद्राकाका शून्यात नजर लावून उभे होते.

आजोबांकडे बघून त्याच्या मनात वेगळेच दुःख उफाळून येऊ लागले. त्यांचा थकलेला चेहरा बघून काहीतरी चुकल्यासारखं वाटायला लागलं. आपण आजोबांजवळ यायला उशीर केला, अशी खंत त्याला सतावू लागली.

अजितला घडलेला प्रकार विराटने सांगितला होता. त्यामुळे त्याच्या मनात आजोबांबद्दल आदर वाटायला लागला. आपल्या नातूप्रमाणे त्यांनी आपल्यावर उपचार केले, हे ऐकून त्याचे मन भरून आल्यासारखे झाले.

आजोबा त्याची पुन्हा मलमपट्टी करायला त्याच्या जवळ येऊन बसले.

“आजोबा.. तुम्ही माझी एवढी काळजी घेतली, त्याबद्दल थँक्स!”

“ते माझं कर्तव्य आहे बाळा. तू प्रशांतला मदत करायला एवढं सहन केलंस. त्याबद्दल मी तुझा ऋणी आहे”आजोबा त्याच्या डोक्यावरील जखमेवर मलम लावत बोलले.

“पण.. ती रहस्यमय जागा.. तिथे रहस्य काय आहे?.. आणि तुम्ही त्याला स्वर्ग का म्हणालात?”अजितने उत्सुकतेने प्रश्न केला. आजोबा हळूच हसले.

“आता याबद्दल बोलायची वेळ नाही. तुला आरामाची गरज आहे”आजोबा सध्या बोलायचं टाळून विराटकडे मलमपट्टीसाठी वळले. प्रशांतने कापलेली फळे आणून अजितसमोर ठेवली.

“मला आता सगळं जाणून घेतल्याशिवाय चैन पडणार नाही आजोबा.. मला आताच सगळं ऐकायचयं”अजित अधीरतेने बोलला.

“आजोबा, आमच्या सगळयांच्या मनात अनेक प्रश्न पडलेले आहेत. त्यांची उत्तरे आता मिळायलाच हवीत”अजित पाठोपाठ विराटही आग्रहाने बोलला.

विराटची मलमपट्टी करून आजोबा शांतपणे खुर्चीत बसले.

“सुदर्शन.. चंद्राकाका बाहेरून आत येत बोलले. आजोबांनी त्यांच्याकडे पाहिलं सुद्धा नाही. चंद्राकाका हताशपणे आजोबांसमोर जमिनीवर बसले.

पीटर त्यांच्या बाजूला बसला.

“ग्रँडपा.. कमीत कमी प्रशांत सारखा तुमचा ग्रँडसन समजून तरी माफ करा.. माझ्याकडून फार मोठी मिस्टेक झाली”पीटरच्या बोलण्यात प्रचंड पश्चताप आणि दुःख दिसून येत होते.

“तुला प्रशांत सारखाचं समजला होता मी. तू विश्वासघात केला माझा!” आजोबा संतापून बोलले. डोळ्यात मात्र प्रचंड दुःख दिसत होते. दुःख आणि संताप अश्रूंच्या रूपाने बाहेर पडायला लागले.

“लोभापायी मी फार मोठी चूक केली.. मला माफ कर सुदर्शन, मला माफ कर”चंद्राकाका हुंदका देऊन रडायला लागले. त्यांना असं रडताना पाहून आजोबांच्या मनात काही क्षण कालवाकालव झाली.

“आता रडून काय उपयोग चंद्रकांत? तुला जवळचा मित्र मानून मी तुझ्यावर इतका विश्वास ठेवला आणि तू.. आजोबांनी पाणावलेल्या डोळ्यांनी काकांकडे पाहिलं.

“माझ्या संपत्तीवर डोळा ठेऊन मला मारून टाकण्याचा प्रयत्न केला!”

“तुझ्या संपत्तीवर नाही सुदर्शन, त्या गुहेतला खजिना , तिथे असलेल्या खऱ्या सोन्याच्या मुद्रा चोरण्यासाठी आम्ही हे सगळं केलं. मी माझी चूक मान्य करतो सुदर्शन.. मान्य करतो. काका मोठ्याने रडायला लागले. प्रचंड मनस्तापाची वेदना त्यांच्या बोलण्यात होती. त्यांना लहान मुलासारखं रडताना पाहून सगळ्यांच्या मनात कालवलं. प्रशांतच्या मनातून त्यांच्याबद्दलचा राग, संताप निवळला.

पीटर त्यांच्या पाठीवरून हात फिरवत त्यांना शांत करू लागला.

“त्या गुहेत कधीच कोणता खजिना नव्हता. ना मी कोणापासून माझी संपत्ती लपवण्याचा प्रयत्न केला. होता तो फक्त गैरसमज”

“खजिना नव्हता?”अजितने गोंधळून विचारलं. विराटही गोंधळला.

“पण, तुम्ही तुमच्या पुस्तकात लिहिलं आहे ते.. खजिना, सुख, स्वर्ग.. त्याचा या जागेशी काही संबंध दिसत नाही”विराटने शंका उपस्थित केली. आजोबा काही वेळ काही बोलले नाही.

खुर्चीतून उठत काकांना आधार देत ते खाली बसले.

“चूक सगळ्यांकडून होते चंद्रा. पण काही चुकांना माफी देऊनही त्या पूर्णपणे मनातून पुसल्या जात नाहीत”आजोबा काकांच्या पाठीवरून हात फिरवत म्हणाले. काकांनी आजोबांच्या खांद्यावर डोकं ठेऊन आपल्या भावनांची वाट मोकळी करून दिली.

“मी अंकलच्या म्हणण्यावरून नको त्या मिस्टेक केल्या.. मी खजिन्याच्या मोहाला बळी पडून तुमच्यावर अटॅक करून तुमचा मर्डर करण्याचा प्रयत्न केला.. मी हे करायला नको होतं. पीटरने आपल्या भावनांना वाट करून दिली.

“पैसा सगळ्यात मोठा मोह आहे पीटर. याला बळी पडून माणसं सर्व नाती विसरून जातात”आजोबा उदासपणे बोलले. त्यांच्या बोलण्याचा रोख दुसरीकडे होता, असं प्रशांतला वाटून गेलं.

“अंकलनी मला पैशांची लालच दाखवली आणि मी तुमचं सगळं प्रेम विसरून बसलो”

“तुम्हा दोघांना या जागेबद्दल सांगून मी मोठी चूक केली पीटर”आजोबा हताश होत बोलले.

“जेव्हा मला तू या गुहेत खजिना आहे असं सांगितलं, तेव्हाच माझं लालची मन मला स्वस्थ बसू देत नव्हतं. तू पीटरला खजिना सहज देऊन टाकशील या विचाराने मी पीटरला यात सामील केलं.. पण जेव्हा तू खजिना नाही असं म्हणायला लागला, तेव्हा माझ्या मनात तुला मारण्याचा कुविचार माझ्या मनात आला. या सगळ्याला माझी लालची वृत्ती जबाबदार आहे. या दुर्गुणामुळे माझं आयुष्य उध्वस्त झालं. पहिले माझा धंदा आणि आता.. काकांना आपल्या कर्मांचा प्रचंड पश्चाताप होत होता.

“मी तुला वेळीच सावध केलं होतं चंद्रकांत. या लोभापायी तुला मोठं नुकसान होईल, हे मी आधीच ओळखलं होतं”आजोबांनी काकांच्या डोळ्यातले अश्रू पुसले.

“मी तुझाही विश्वासघात केला आहे प्रशांत.. मी तुला फसवलं आहे.. खोटं बोलून तुला येड्यात काढलं. आय एम सॉरी”पीटरने भरल्या डोळ्यांनी प्रशांतकडे पाहिलं.

“माझ्या विश्वासाचा तू गैरफायदा घेतला पीटर. तुला मी कधीच माफ करणार नाही.. तू जे केलं ते पाप आहे!” प्रशांत संतापून बोलला.

“तुझ्याकडून ही अपेक्षा कधीच नव्हती पीटर, माझी इतकी जवळची मैत्रीही तू विसरलास”अजित दुःखी होत बोलला.

“अजित तुला मला फसवावं लागलं. तुलाही येड्यात काढावं लागलं. बट, माझ्याकडे दुसरा वे नव्हता. प्रशांत आणि विराट योगायोगाने आम्हाला भेटले. जेव्हा प्रशांतने ग्रँडपाबद्दल सांगितलं, आणि समजलं की तो त्यांना शोधायला निघाला आहे, मला दुसरं काही सुचलं नाही. तू काहीही करून ग्रँडपांना शोधशील, असं वाटून मी तुला फसवण्याचा प्लॅन केला. चंद्रा अंकलना हे सगळं सांगून, तुम्हाला मारण्याचा प्लॅन केला. सर्व खजिना तुम्ही ताब्यात करून घेतान या भीतीने आम्ही हा सगळा बॅड प्लॅन केला. अजितसोबतची मैत्रही मी विसरून गेलो. पण.. ग्रँडपा जिवंत आहेत, याची आम्हाला काही माहीत नव्हती. त्यामुळे आम्ही हे सगळं.. पीटरला आपण जे केलं त्याचा प्रचंड मनस्ताप होत होता. आजोबांनी त्याच्या डोक्यावरून मायेने हात फिरवत त्याला शांत केलं.

“नशीब चांगलं म्हणून मी तुमच्या हल्ल्यातून बचावलो. मागील एक वर्षांपासून तुम्हाला काही कळू नये म्हणून या झोपडीत राहत होतो. पण काल तुम्हा दोघांना पाहिलं. नकळत तुमचं बोलणं ऐकलं आणि तुमचा प्लॅन मोडून काढण्यासाठी गुहेत आलो. चंद्रकांत, तू या मुलांना मारायला सुद्धा मागे हटणार नाही, याचा मी कधी विचारही करू शकत नव्हतो”

आजोबांनी हतशपणे डोळे मिटले.

“या जागी सोन्याच्या मुद्रेने भरलेला खजिना आहे, हे खोटं होतं. याबद्दल मला इथं आल्यावरचं समजलं. पण, त्याचा मला तसूभरही पश्चताप नव्हता. मला ते पाहिजेच नव्हतं. पण मला हे पाहिजे होतं ते सगळं या जागेत आहे. माणूस ज्या सुखाच्या क्षणासाठी आयुष्यभर पैशांच्या मागे लागतो, ते सुख विनामूल्य या ठिकाणी मी अनुभवलंय. मानवी जगाच्या मोहजालापासून या शांत जागेतचं खरं समाधान आहे. सुख आहे. माणूस याच सुखासाठी जन्मभर मरमर करत असतो. पण तो हे विसरतो की त्या आलिशान जगापेक्षा अधिक सुंदर आयुष्य या निसर्गाच्या सान्निध्यात अनुभवलं जाऊ शकतं. आणि म्हणूनच मला ही जागा स्वर्गासमान आहे. माणसांच्या गोडगोड स्वार्थासाठी बोलणाऱ्या स्वभावपेक्षा इथल्या पक्षांच्या चिवचिवाटात मला आपलेपण जाणवते. इथली शांतता मला हवीहवीशी वाटते. जगातील सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे मनाचं समाधान. अहंकार, लालच, मत्सर, द्वेष या भावना एकांतात असल्यावर कधी आपल्याला छळत नाहीत. म्हणूनच ही जागा माझ्यासाठी स्वर्गासमान आहे!”

आजोबांचं बोलणं ऐकून सगळे विचारात पडले. सुन्न होऊन सगळे त्यांच्या बोलण्याचा गहन अर्थ शोधत होते. अजित आणि विराटला त्यांच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं.

“अजित, याच कारणामुळे मी या जागेला स्वर्ग समजतो. हे पुस्तकात लिहिण्यामागचा उद्देश हाच होता, की कोणीतरी मला शोधायला यावं. मला खात्री होती, ज्याला माझ्याबद्दल प्रेम असेल, तो कुठूनही इथपर्यंत पोहोचेल. प्रशांतने माझी ती इच्छा पूर्ण केली. आता मी सुखाने मरणाला सामोरं जायला तयार आहे!” आजोबा मंदपणे हसले.

“आजोबा.. शेवटचं वाक्य ऐकून प्रशांतच्या डोळयात टचकन पाणी आलं. त्याने ताडकन उठत आजोबांजवळ जात त्यांना घट्ट मिठी मारली.

“काहीही बोलू नका आजोबा, मी तुम्हाला सोडून जाणार नाही”

“माझ्या बाळा.. आजोबांनी त्याला मोठ्या प्रेमाने छातीशी कवटाळले.

आजोबा आणि नातूमधील प्रेम पाहून सगळ्यांना अजून भरून आले. अजितला आपल्या आजोबांची आठवण यायला

लागली. आपण केलेल्या मोठ्या चुकीच्या जाणिवेने चंद्राकाका आणि पीटरच्या माना खाली गेल्या होत्या.

“आजोबा, तुम्ही आता माझ्याबरोबर चला, आपल्या घरी”

आजोबांचा चेहरा गंभीर झाला. चेहऱ्यावर वेगळीच उदासी पसरली.

“आपलं घर!.. ज्या घरात आपलेपणा नाही, त्या घरात यायची माझी इच्छा होणार नाही, बाळा”

“मला माहित आहे, पप्पा आणि मम्मीने तुम्हाला फार त्रास दिला आहे, मी तुमच्या डायरीत सगळं वाचलं आहे.

“ओझं बनलो होतो मी त्यांच्यावर! वाढतं वय आणि लिखाणाची माझी न सुटणारी सवय, यामुळे माझा तिटकारा होता त्यांना.. फिरायची आवड जोपासून झाली आणि करत घरी परतायचं म्हणलं की मन उदास व्हायचं. शेवटी तिथून कायमचा निसटण्याचा निर्णय घ्यावा लागला. आता परत जायला माझं मन धजत नाही!” आजोबांनी आपल्या मनातील सल उघड केली. त्याने प्रशांतचे मन प्रचंड दुखावले गेले.

“नाही आजोबा. मी तुम्हाला घेऊन जाणार म्हणजे जाणार. मला आता फक्त तुमच्यासोबत रहायचं आहे”प्रशांत विनंती करत बोलला.

“तुला तुझे आजोबा सुखात राहावे असं वाटतं ना?”आजोबांनी भावनिक प्रश्न विचारताच, प्रशांतच्या मनात प्रचंड वेदना झाली.

“मी फक्त याच जागी सुखी राहू शकतो”

“आजोबा, मग माझं काय? तुम्ही माझा विचार का करत नाहीत.. मी तुमच्याशिवाय नाही राहणार आता”

प्रशांतची अवस्था बघून आजोबांना वाईट वाटत होतं. पण त्याचं म्हणणं मान्य करायला त्यांचं मन तयार नव्हतं.

“आजोबा, तुम्ही परत येणार नसाल तर ठीक आहे. पण मग आम्ही तुम्हाला सोडून जाणार नाही”विराट जड आवाजात बोलला.

“विराट बरोबर म्हणतोय, आम्ही इथं राहू आजोबा. तुमच्यासोबत”अजितने विराटच्या म्हणण्यात होकार दाखवला.

त्यांचं प्रेम पाहून आजोबांना अजूनच भरून आलं. डोळे पुसताना त्यांना स्वतःचा हुंदका जाणवला.

शेवटी प्रशांत आणि बाकीचे सगळे काही दिवस तिथं थांबायला तयार झाले.

या दिवसांत आजोबांनी सर्वांना आसपासच्या निसर्गाचे आणि जंगलाच्या काही भागाचे दर्शन घडवले होते. दुःखद वातावरण आता आनंदी बनलं होतं.

या सगळयात आजोबांनी आणि प्रशांतने पीटर आणि चंद्राकाकांना माफ केले होते. त्यांची उदारता पाहून पीटरला स्वतःबद्दल संताप होत होता. आपण केलेल्या चुकीची पुनरावृत्ती होणार नाही याचे वचनही त्याने आजोबांना दिले.

शेवटी तीन दिवसांनंतर विराट आणि अजितच्या आग्रहामुळे प्रशांतला परत जाण्याचा निर्णय मान्य करावा लागला. प्रशांतची आजोबांना सोडण्याची अजिबात इच्छा नव्हती. कायमचं इथेच राहावं, असं त्याला वाटायला लागलं. पण आजोबांनी त्याला समजावलं तेव्हा त्याने परत जाण्याचं ठरवलं.

परत जाण्याच्या दिवशी सगळे जण गुहेकडे आले होते. आजोबांनी बुकशेल्फ मधील आपली काही पुस्तके प्रशांतला देऊ केली. जी तो एक आठवण म्हणून स्वतःजवळ ठेवणार होता.

सर्व जण गुहेबाहेर आले तेव्हा झाडातून काही तरी आवाज झाला. तसे सगळे सावध झाले. इतक्या दिवसांत एकही प्राणी

त्यांना दिसला नव्हता, त्यामुळे काय असेल या भितीने सगळे एकमेकांकडे पाहू लागले.

आजोबा शांतपणे पुढं झाले. खिशातून बंदूक काढत त्यांनी हवेत गोळी चालवली. तसं झाडात असणारा प्राणी लांब पळून गेला. सगळे आजोबांकडे कुतूहलाने पाहतच राहिले.

“तर बंदूक यासाठी होती!” अजित आश्चर्याने उद्गारला. आजोबांनी हळूच हसून होकारार्थी मान हलवली. तसे सगळे जण किंचित हसले. पण आता परत जाण्याची वेळ आली आहे, या विचाराने प्रशांत मात्र मनातून उदास होता.

“पण आजोबा, गुहेच्या आतमध्ये तुम्ही खोली कशी बांधली?”विराटने प्रश्न विचारला. आजोबा त्याच्या प्रश्नावर पुन्हा हसले.

“त्याच्याच मदतीने ज्याने मला या जागेबद्दल सांगितले!” आजोबा हसत म्हणाले.

सगळे गोंधळात पडले. आजोबांना या जागेवर कोण घेऊन आलं होतं, याच उत्तर कोणालाच माहीत नव्हतं. कोणी त्याबद्दल विचारही केलेला नव्हता.

“कोण?”अजितने विचारलं. आजोबांनी पीटर आणि चंद्राकाकांकडे पाहिलं. त्यांना याबद्दल माहीत होतं.

“कळेलंच तुम्हाला”चंद्राकाका हसून म्हणाले.

आजोबांनी आपल्या खिशातून दोन घडी केलेली पत्रे बाहेर काढली. प्रशांतसमोर त्यांनी ती धरली.

“ही पत्रे”प्रशांतने ती हातात घेतली.

“कोणाची?”प्रशांतने विचारलं.

“एक रामदासचं आणि एक पंडित काकांचं”आजोबा दुःखी स्वरात बोलले. प्रशांतने पंडित काकांनी केलेली मदत आणि हॉटेलवर भेटलेल्या बाबांना म्हणजेच आजोबांचे मित्र रामदास यांना दिलेल्या वचनाबद्दल सांगितलं होतं.

प्रशांतने पत्रे हातात घेत खिशात टाकली.

“चला, निघायला पाहिजे आता”अजित हातातलं घड्याळ पाहत बोलला. त्याचं मन जड पडलं होतं, पण परत जावं लागणार होतं.

“रामदास बाबांना दिलेलं वचन पूर्ण होण्यासाठी सुद्धा नाही येणार तुम्ही?”प्रशांतने जड आवाजात विचारलं.

“मी सांगितलं प्रशांत, मला पुन्हा माणसांच्या जगात जायची इच्छा नाही. नको वाटते ती दुनिया! मला माझं उरलेलं आयुष्य या जागेत सुखाने घालवायचं आहे.. पण एक वचन दे.. आजोबांनी आपला तळहात पुढं केला.

“पुढच्या वेळी पंडित आणि रामदास दोघांना इकडं घेऊन येशील” आजोबांनी वचन मागितलं. प्रशांतने मोठ्या विश्वासाने त्यांच्याकडे पाहिलं.

“वचन!” त्यांचा हातावर हात ठेवत वचन दिलं.

डोळ्यात पाणी साचायला लागलं, तशी आजोबांनी त्याला कडकडून मिठी मारली. दोघांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

“पुन्हा लवकर ये बाळा. लवकर ये”

“नक्की येईन आजोबा”

त्या दोघांना पाहून अजितच्या डोळ्यात थेंब जमायला लागले. त्याने जाऊन आजोबांना मिठी मारली.

“आजोबा, तुम्हाला सोडून जाण्याची अजिबात इच्छा होत नाही. तुमच्याकडं बघून मला माझ्या आजोबांची आठवण येत आहे”अजित हुंदका देऊन रडायला लागला. विराटही येऊन त्यांच्या मिठीत सामावला.

“तुमची खूप आठवण येईल आजोबा”विराट भरून आलेल्या आवाजात बोलला.

पीटर पणावलेल्या डोळ्यांनी मान खाली घालून उभा होता.

आजोबांनी मिठीतून लांब होत मायेने अजितच्या डोक्यावरून हात फिरवला. अजितला अजूनच भरून आले.

“तू मैत्रीचं कर्तव्य फार चांगलं निभावलयं अजित.. तुझी आणि प्रशांतची मैत्री नशिबाची देन आहे. तिला शेवटपर्यंत निभवं”

“आणि तू विराट, तू प्रशांतला इच्छा नसतानाही साथ दिलीस, खूप चांगल्या प्रकारे मैत्री निभावलीस. तुझं कौतुक कमी आहे. यापुढेही तू प्रशांतला अशीच साथ देशील, याचा मला पूर्ण विश्वास आहे. आजोबांनी विश्वासाने विराटच्या खांद्यावर हात ठेवला.

आजोबांनी खाली नजर घालून उभ्या असलेल्या पीटरकडे पाहिलं.

“पीटर, बाळा”आजोबांनी त्याच्याजवळ जात त्याच्या खांद्यावर हात ठेवला. पीटर त्यांच्या गळयात पडत हुंदका देत रडायला लागला.

“सॉरी ग्रँडपा.. मी.. पुन्हा असं कधीच नाही करणार” आजोबांनी मोठ्या प्रेमाने त्याला छातीजवळ कवटाळले.

“पुन्हा असं करणार नाही, याची मला खात्री आहे, बाळ.. पुन्हा अशी चूक करू नकोस.

“नाही ग्रँडपा, नाही करणार परत” पीटर कितीतरी वेळ आजोबांच्या मिठीत रडत होता.

“सुदर्शन, मी केलेल्या कामाचा मला इतका पश्चताप होत आहे, की कदाचित मी तुला भेटू शकणार नाही. एक मित्र नाहीतर माणुसकीच्या नात्याने तरी मला माफ कर. काका रडत आजोबांच्या मिठीत पडले.

“चुकतात सगळे जण चंद्रा, पण पुन्हा ती चूक करू नकोस. लालची वृत्तीचा त्याग कर, यातच माझं समाधान आहे”

“मी तुझी चोरलेली संपत्ती.. दागदागिने सगळं या पोरांच्या नावावर करणार आहे. तेच प्रायश्चित आता मी करू शकतो”चंद्राकाका डोळे पुसत बोलले.

“त्यातील काही भाग, मी त्याच पैशातून बांधलेल्या शंकराच्या मंदिरात दान दे, मी तेच खर प्रायश्चित समजेल”आजोबांनी विश्वासाने काकांकडे पाहिलं.

“चल प्रशांत, नाईलाजाने का होईना आपल्याला जावं लागणार आहे”विराट उदास झालेल्या प्रशांतला बघून त्याला धीर देत म्हणाला.

“प्रशांत, तुला तुझ्या आईवडिलांसाठी परत जावं लागेल, त्यांना निराश करू नकोस, त्यांच्याशी माझ्यामुळं भांडूही नको. अभ्यासाकडे लक्ष दे”आजोबांनी प्रशांतला समजावून सांगितलं.

त्याने जड मनाने त्यांच्याकडे पाहिलं.

“मी तसं काही करणार नाही, आजोबा.. पुन्हा तुम्हाला भेटायला येईल तेव्हा त्यांना इकडे आणण्याचाही प्रयत्न करेन”

“ते येणार नाहीत, प्रशांत”आजोबा खिन्न मनाने बोलले.

प्रशांतने पुन्हा त्यांना मिठी मारली.

“मी लवकर परत येईल आजोबा.. लवकर.. पुन्हा भावुक होण्याआधीच तो जड पावलांनी मागे वळला.

“येतो आजोबा”बाकीच्या सर्वांनी पुन्हा एकदा आजोबांना मिठी मारत त्यांचा निरोप घेतला.

आजोबांना एकटं सोडून जण्याचं कोणाचंही मन तयार नव्हतं. राहून राहून सगळयांच्या नजरा मागे वळून त्यांच्याकडे पाहत होत्या.

पीटरने बसत गाडी चालू केली.

प्रशांत भरून आलेल्या डोळयांनी खिडकीतून आजोबांकडे पाहत होता. आजोबांच्या चेहऱ्यावर एक समाधानी हास्य होतं. त्यांची जी प्रसन्न मुद्रा पाहण्याचा प्रशांतने ध्यास घेतला होता. ते पूर्ण झालं होतं. गाडी चालू होऊन आजोबा नजरेआड होईपर्यंत प्रशांत भरलेल्या डोळयांनी त्यांच्याकडे पाहतच होता. मनातील वेदना असह्य होऊन त्याने डोकं दोन्ही हातांनी पकडून हुंदके द्यायला सुरुवात केली.

आजोबांना भेटून आता जवळपास एक महिना झाला होता. प्रशांतच्या समोर आजोबांनी त्याच्यासाठी दिलेलं पत्र उघडं पडलं होतं. जे आजोबांनी चंद्राकाकांना त्याला देण्यास सांगितलं होतं. त्यातील मजकूर गेल्या महिनाभरात त्याने कितीतरी वेळा वाचला होता. तरी त्याला त्यावर विश्वास बसत नव्हता, पण आजोबांनी पत्रात मगितलेल्या वचनाप्रमाणे त्याने अजितला याबद्दल काही कळू दिले नव्हते.

आजोबांना रहस्यमय जागेबद्दल सांगणारे दुसरे तिसरे कोणी नसून त्यांच्यासारखाचं कौटुंबिक त्रास सहन करणारे अजितचे आजोबा होते!

पण अजितला आपल्या एक वर्षांआधी स्वर्गवासी झालेल्या आजोबांबद्दलच्या या गोष्टीबद्दल जराही कल्पना नव्हती. आपले आजोबा आपल्या गावी सुखरूप आहेत, असा त्याचा भाबडा समज कायम होता.

********************************

**समाप्त.**

## कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?
खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!
थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.
ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.
एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग
दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग
थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय
कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?

ई साहित्यवर हजारहून अधिक दर्जेदार कथा.
आनंद घ्या. आनंद द्या.

9987737237
www.esahity.com
esahity@gmail.com